# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

▪ अमरावती, ▪ रविवार २१ डिसेंबर २०२५ ▪ मूल्य ४.०० ▪ पृष्ठे १०+४













## डॉ. शालिनीताई पाटील यांचे ९४ व्या वर्षी निधन



**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्राच्या ज्येष्ठ नेत्या, माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतदादा पाटील यांच्या पत्नी, माजी मंत्री, माजी खासदार डॉ. शालिनीताई पाटील यांचे शनिवारी दुपारी ३ वाजून ४८ मिनिटांनी माहीम मुंबई येथील ज्योती सदन या निवासस्थानी निधन झाले. त्या ९४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, दोन मुली, जावई, नातवंडे व परतवंडे असा परिवार आहे.

सत्यशोधक विचारांचे प्रणेते ज्योतिजीराव फाळके पाटील यांच्या त्या कन्या होत. त्यांनी कायद्याचे शिक्षण घेत वकिलीची पदवी घेतली होती. सांगली जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्ष म्हणून त्यांनी राजकीय कारकीर्दीस सुरुवात केली. विचारस्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि निर्भीड राजकीय भूमिका यासाठी ओळखल्या जाणाऱ्या डॉ. शालिनीताई पाटील यांनी आपल्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनात ☞(पान २ वर)

## आज २८८ नगरपरिषदा, नगरपंचायतींची मतमोजणी

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात सध्या निवडणुकीचे वारे वाहत आहे. २ डिसेंबरला नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणूकीसाठी मतदान पार पडले आहे. मात्र २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणूका पुढे ढकलल्या होत्या. यासाठी आज (२० डिसेंबरला) मतदान पार पडले. आता २ डिसेंबरसह आज झालेल्या मतदानाचा निकाल आज रविवारी जाहीर होणार आहे. या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले आहे. गुलाल उधळण्यासाठी कार्यकर्ते सज्ज आहेत.



निवडणूक आयोगाने राज्यातील २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार ०२ डिसेंबर २०२५ रोजी २६३ नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान झाले. आज २३ ठिकाणी मतदान झाले. रविवारी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू होणार आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी मतमोजणीची तयारी सुरू केली आहे. त्यामुळे आता निकालात कोणता पक्ष बाजी याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

नगरपंचायतींच्या निवडणुकीची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं दिलेला आहे. उच्च न्यायालयाच्या निकालानुसार, आज महाराष्ट्रभरातील २८८ नगरपरिषदा, नगरपंचायतींची मतमोजणी प्रक्रिया ☞(पान २ वर)

## बोगस मतदानासाठी आलेल्या १७४ महिलांवर गुन्हे

**ठाणे /वृत्तसंस्था-:** कल्याणमधील अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीमध्ये मोठी घडामोड घडली आहे. बोगस मतदानासाठी बाहेरुन आणण्यात आलेल्या १७४ महिलांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच या महिलांना ज्या मॅरेज हॉलमध्ये ठेवण्यात आलं होतं त्याच्या मालकावरही कारवाई करण्यात आली आहे. या मॅरेज हॉलच्या मालकाचं नाव कृष्णा रसाळ असं असून तो शिवसेना शिंदे गटाचा उमेदवार आहे.



अंबरनाथमध्ये एका सभागृहात बोगस मतदानासाठी शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराने २०० पेक्षा जास्त महिला आणल्याचा आरोप काँग्रेस आणि भाजपा केला होता. त्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. पोलिसांनी या सगळ्या महिलांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली. या प्रकरणी १७४ महिलांवर अंबरनाथ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आला आहे. तर यातील काही मुली या अल्पवयीन ☞(पान २ वर)

## 'मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढणार!

### काँग्रेसची मोठी घोषणा, केले गंभीर आरोप

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा बिगूल वाजला असून गेल्या चार वर्षांपासून रखडलेल्या या निवडणुकीसाठी आता सर्वच पक्ष कंबरकसून कामाला लागले आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांची जुळवा-जुळवही सुरू आहे. दरम्यान आज, काँग्रेस मुंबई महानगरपालिकेची निवडणूक स्वबळावर लढवेल, अशी घोषणा महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी केली आहे. तसेच, मुंबई महानगरपालिकेची निवडणूक गेल्या चार वर्षांपासून झालेली नाही. सुप्रिम कोर्टामुळे निवडणूक होत आहे. सरकारच थेट महानगरपालिका चालवत होतं. प्रत्येक गोष्टीत सरकार हस्तक्षेप करायचे. या लोकांची निवडणूक घेण्याची इच्छा नव्हती, निवडणूक प्रणालीचा स्वीकर करण्याची यांची इच्छा नव्हती, असा आरोपही चेन्निथला यांनी यावेळी केला. ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

चेन्निथला म्हणाले, 'आम्ही वर्षा गायकवाड आणि आमच्या सर्व वरिष्ठ नेत्यांच्या नेतृत्वात, प्रदुषणाविरोधात, रुग्णालयांतील परिस्थिती



संदर्भात, भ्रष्टाचारासंदर्भात, आंदोलने केली आहेत. गेल्या काही दिवसांत महानगरपालिकेत काय झाले आणि काय नाही झाले, हे जेनतेला माहीत आहे. सर्वसामान्यांना आजही त्रासांना सामोरे जावे लाग आहे. सर्वसामान्यांना, गरिबांना कुठल्याही प्रकारची मदत मिळत नाहीये. एवढा भष्टाचार वाढला आहे.'

'गेल्या चार वर्षांपासून निवडणूक झालेली नाही. सुप्रिम कोर्टामुळे ☞(पान २ वर)

## भाजप नेत्यांकडून सगळीकडेच भूखंड गिळण्याचे काम सुरू- आदित्य ठाकरे

**पुणे/प्रतिनिधी** : राज्यात बिल्डर आणि ठेकेदारांचे सरकार काम करत आहे. मुंबई असो, नाशिक असो किंवा पुणे असो सगळीकडेच भाजपचे नेते भूखंड गिळण्याचे काम करत आहेत. मग त्या भूखंडावर रहिवासी असोत किंवा नसोत, अशी टीका ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी केली.

नवी पेठेतील लोकमान्य नगरमधील म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासाचा मुद्दा मागील काही महिन्यांपासून गाजत आहे. रहिवाशांनी काही महिन्यापूर्वी स्थानिक आमदार हेमंत रासने यांच्या कार्यालयावर मोर्चा काढून यासंदर्भात रोष व्यक्त केला होता. या सर्व पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे यांनी शनिवारी रहिवाशांचा भेट घेऊन, आपण व आपला पक्ष शेवटपर्यंत रहिवाशांसोबत राहिल




असे आश्वासन दिले. यावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख सचिन आहिर, शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, माजी गटनेते अशोक हारनावळ आदींसह रहिवासी उपस्थित होते.

यावेळी माध्यमांशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, रहिवाशांनी वसाहतींचा स्वयंपुनर्विकास करण्याचा निर्णय घेऊन २०२२ पासून त्यांनी आपापले विकासक शोधले. मात्र, मे महिन्यात स्थानिक आमदारांनी मुख्यमंत्र्यांना पत्र देऊन याला स्थगिती आणली. क्लस्टरच्या माध्यमातून एक आवडता बिल्डर रहिवाशांवर लादला जात आहे. जे काय करायचे आहे ते स्थानिकांना विश्वासात घेऊन करणे गरजेचे आहे. रहिवाशांनी जर त्यांचे विकासक नेमले असतील तर मग स्थानिक आमदारांना काय अडचण आहे, हे त्यांनी स्पष्ट करावे, असेही ते म्हणाले. ☞(पान २

## नायगाव शिवारात आढळला वाघाचा मृतदेह

**वणी (यवतमाळ)** : वणी ते घुग्गूस मार्गावरील नायगाव शिवारात बेलोरा बसथांब्या समोरील रस्त्यालगतच्या झुडुपात पट्टेदार वाघ मृतावस्थेत आढळून आला. ही घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच शिरपूर पोलीस आणि वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. वाघाचा मृत्यू नेमका कसा झाला, याबाबतचे गुढ अद्याप कायम आहे.



वणी तालुक्यातील नायगाव कोळसा खाण परिसरात नवीन पेट्रोलपंपाच्या समोरील पडीत जमिनीवरील झुडुपात एक वाघ मृतावस्थेत पडून असल्याचे काही लोकांच्या निदर्शनास आले. यासंदर्भात पोलिस व वनविभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली. माहिती मिळताच, शिरपूरचे ठाणेदार संतोष मनवर, वणीच्या सहाय्यक वनसंरक्षक संगीता कोकणे, वनपरिक्षेत्र अधिकारी सुजाता विरकर व त्यांची चमू घटनास्थळी दाखल झाली. यावेळी मृत वाघाला पाहण्यासाठी घटनास्थळी नागरिकांची प्रचंड गर्दी झाली होती. काही वेळानंतर यवतमाळचे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) डॉ.किशोर मानकर, ☞(पान २ वर)






## 'आसामला 'पूर्व पाकिस्तान'चा भाग बनवण्याचा कट'

### पंतप्रधान मोदींचा गुवाहाटीतून काँग्रेसवर मोठा हल्ला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आसाममधील गुवाहाटी येथे एका जाहीर सभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी काँग्रेसवर अत्यंत तिखट शब्दांत हल्ला चढवला. 'काँग्रेस सरकारच्या काळात आसाम आणि ईशान्य भारताचा विकास त्यांच्या अजेंड्यातच नव्हता, उलट आसामला 'पूर्व पाकिस्तान'चा भाग बनवण्याचे कट कारस्थान रचले जात होते,' असा खळबळजनक आरोप पंतप्रधान मोदी यांनी केला आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, 'काँग्रेसच्या सरकारांमध्ये बसलेले लोक विचारायचे, आसाम आणि ईशान्येकडे जातंच कोण? आसाममध्ये आधुनिक विमानतळ, रेल्वे आणि हायवेची काय गरज आहे? असा विचार ते कायचे. याच संकुचित विचारामुळे काँग्रेसने अनेक दशके या संपूर्ण प्रदेशाची उपेक्षा केली. काँग्रेसने ६-७ दशकांत केलेल्या चुका आता आपले सरकार एक-एक करून सुधारत आहे.'

मोदी पुढे म्हणाले, 'माझ्यासाठी आसामचा विकास ही केवळ गरज नाही, तर एक जबाबदारी आणि उत्तरदायित्व आहे.

गेल्या ११ वर्षांत ईशान्य भारतासाठी लाखो कोटींच्या प्रकल्पांची पायाभरणी झाल्याचे त्यांनी नमूद केले. सरकारी नोकऱ्यांमधील भ्रष्टाचाराचा उल्लेख करताना ते म्हणाले, 'काँग्रेसच्या काळात आसाममध्ये वशिल्याशिवाय (चिठ्ठी आणि खर्च) नोकरी मिळणे अशक्य होते, पण आज हजारो तरुणांना



पारदर्शकपणे सरकारी नोकऱ्या मिळत आहेत.'

**हिंसाचाराकडून औद्योगिक विकासाकडे -**

'ज्या भागात एकेकाळी हिंसाचार आणि रक्तपात व्हायचा, तेथे आज ४जी आणि ५जी तंत्रज्ञान पोहोचले आहे. ज्या जिल्ह्यांची ओळख हिंसाग्रस्त जिल्हे असा होता, ते जिल्हे आज आकांक्षी जिल्हे म्हणून ओळखले जात आहेत. भविष्यात हेच जिल्हो 'इंडस्ट्रियल कॉरिडॉर' बनतील. आज ईशान्य भारताबाबत संपूर्ण देशात एक नवा विश्वास निर्माण झाला आहे,' असेही मोदी म्हणाले.




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख क्रीडा महोत्सवाचा समारोप

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सव निमित्त श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती,येथे श्री शिवाजी शिक्षण संस्था अंतर्गत डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख क्रीडा महोत्सव स्पर्धेचे आयोजन गुरुवार दिनांक १८ डिसेंबर व शुक्रवार दिनांक १९ डिसेंबर रोजी शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे करण्यात आले होते.या महोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रम शुक्रवार दिनांक १९ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये पार पडला.



सदर स्पर्धेचे समारोपीय समारंभाच्या वेळी हर्षवर्धन देशमुख अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, दिलीपबाबु भं. इंगोले कोषाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, कार्यक्रमाचे समारंभाध्यक्ष

ॲड. गजाननराव के. पुंडकर उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती प्रमुख अतिथी

ॲड.जयवंत उपाय भैय्यासाहेब वि. पाटील (पुसदेकर) उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती प्रा. सुभाष बनसोड कार्यकारणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती मा. प्रा. भैय्यासाहेब मेटकर व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ तुषार शेळके

(१९ व्या आशियाई खेळात रजत पदक विजेता) एच डी भोगे आंतरराष्ट्रीय तिरंदाज खेळाडू सुभाष पावडे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य बबनराव चौधरी त्याचप्रमाणे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे शालेय विभागाचे उपव्यवस्थापक मा. पंडित एस पंडागळे, तसेच स्थानिक श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्वप्रथम डॉ. पंजाबराव उपाध्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला हारर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी पाहुण्यांचे स्वागत फुलझाड देऊन करण्यात आले. त्यानंतर श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी याप्रसंगी सर्वप्रथम सर्व विजेत्या चंमुचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे दिलीपबाबु भं. इंगोले कोषाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, यांनी याप्रसंगी खेळाडूंनी खेळाच्या मैदानात सर्वोत्तम कामगिरी केल्याबद्दल खेळाडूंना पुढील वाटचालीच्या शुभेच्छा व आशीर्वाद याप्रसंगी दिला. त्यानंतर कार्यक्रमाचे समारंभाध्यक्ष ॲड गजाननराव के. पुंडकर यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करताना क्रीडा स्पर्धेमध्ये ग्रामीण क्षेत्रातील मुलांना प्रोत्साहन देऊन त्यांच्यातील कलागुणांना वाव दिला पाहिजे असे प्रतिपादन करून खेळाडूंना पुढील आयुष्याच्या वाटचाली करता शुभेच्छा दिल्या.

(१९ व्या आशियाई खेळात रजत पदक विजेता) एच डी भोगे आंतरराष्ट्रीय तिरंदाज खेळाडू यांनी याप्रसंगी खेळाडूंना मार्गदर्शन करताना शिवाजी शिक्षण संस्थेमध्ये श्री शिवाजी शारीरिक शिक्षण संस्था मध्ये शिकत असताना आपले विद्यार्थी दशेची पार्श्वभूमी या ठिकाणी स्पष्ट केली व श्री शिवाजी शिक्षण संस्थेने आम्हा दोघांना अगणित मदत केली त्यामुळे आम्ही आशिया स्पर्धेपर्यंत आज पोचू शकलो याचा आम्हाला आयुष्यात कधीच विसर पडणार नाही असे आपले व्यक्तिगत मत या ठिकाणी त्यांनी स्पष्ट केले. प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे यांनी आपले प्रास्ताविक भाषण केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात महाविद्यालयातील क्रिडा खेळाडू व स्पर्धे संबंधित ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली तसेच स्पर्धा घेण्यामागचा उद्देश विशद केला. यानंतर लगेचच शिवाजी शिक्षण संस्थे अंतर्गत येणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून सहभागी झालेल्या १७ व १९ वयोगटातील मुले व मुली च्या झालेल्या कबड्डी हॉलीबॉल, व खोखो या खेळाच्या स्पर्धेमधून विजेत्या व उपविजेत्या टीमचा बक्षीस वितरण समारंभ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पार पडला. सदर स्पर्धेमध्ये नागपूर विभागाने सर्वात जास्त स्पर्धेमध्ये अव्वल दर्जा प्राप्त करून जनरल चॅम्पियनशिपचा मान मिळवला.

कार्यक्रमाचे संचालन महाविद्यालयाचे प्रा. जितेंद्र राऊत यांनी केले व आभार प्रदर्शन श्री शिवाजी मराठा हायस्कूल चे मुख्याध्यापक प्रा. संदीप इंगोले यांनी केले.

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख क्रीडा महोत्सव स्पर्धेच्या समारोपीय व बक्षीस समारंभाच्या प्रसंगी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व खेळाडू विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित होते. श्री शिवाजी क्रीडा महोत्सव स्पर्धा चे आयोजन यशस्वीरित्या संपन्न करण्याकरता श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य वी.गो ठाकरे श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य तथा स्पर्धेच्या आयोजन समितीचे सचिव डॉ. सुभाष गावंडे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे शालेय विभागाचे उपव्यवस्थापक पंडित पंडागळे व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारीनी अथक परिश्रम घेतले.

# नांदगाव पेठ खून प्रकरणाचा पर्दाफाश; आरोपी जेरबंद

## -बालक-बालिकांचाही सहभाग उघड

**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या मंथन पाळनकर या तरुणाच्या निर्घृण हत्येचा गुन्हे शाखेने वेगाने छडा लावत मुख्य तीन आरोपींना अटक केली आहे. यासोबतच एका विधिसंघर्षग्रस्त पुरुष बालकासह दोन विधिसंघर्षग्रस्त बालिकांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. याच घटनेनंतर राजापेठ परिसरात दहशत माजवणाऱ्या जमावावरही पोलिसांनी कारवाई करत अवघ्या पाच तासांत १७ जणांना जेरबंद केले. या संयुक्त कारवाईमुळे शहरातील कायदा-सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्यांचे मनसुबे उधळून लावले आहेत.

दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी ओम रविंद्र पाळनकर (वय १६, रा. सातुर्णा, अमरावती) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, जुन्या वादातून आरोपींनी त्यांचे भाऊ मंथन रविंद्र पाळनकर (वय १९) यांना वाळकी डॅम येथे बोलावले. तेथे डोके, मान व पाठीवर चाकूने सपासप वार करत त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या खळबळजनक घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली होती.

या प्रकरणी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम १०३(१), १९१(२), १९१(३), १९०, ६१(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा व नांदगाव पेठ पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. अखेर संतोष पांडुरंग गाते (२४, रा. राजापेठ), सुजल दीपक शर्मा (२३, रा. गोपाल नगर) आणि सुजल पुरुषोत्तम जायभाये (२८, रा. गोपाल नगर) यांना अटक करण्यात आली. यांच्यासह एका विधिसंघर्षग्रस्त पुरुष बालक व दोन विधिसंघर्षग्रस्त महिला बालिकांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास नांदगाव पेठ पोलीस ठाणे करीत आहे.दरम्यान, या खुनाच्या घटनेनंतर संतप्त झालेल्या २० ते २५ जणांच्या जमावाने राजापेठ हद्दीतील केडिया नगर व शंकर नगर परिसरात लाठ्या-काठ्यांसह वाहनांची तोडफोड करत दहशत माजवली होती. सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम १९०, १९१, १०९, ३११, ३१०, ३२४, ३५१, ३५२, ६१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

# १ व १० वरील उर्वरित

## डॉ. शालिनीताई पाटील

वेगळी छाप उमटवली. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या निकटवर्तीय म्हणून ओळख असलेल्या डॉ. शालिनीताई पाटील यांनी खासदार व आमदार म्हणून प्रभावी कामगिरी बजावली. राज्याच्या महसूल मंत्री म्हणून त्यांची कारकीर्द विशेष गाजली.

दिवंगत शालिनीताई पाटील यांनी १९८५ मध्ये सांगली जिल्ह्यातून सातारा जिल्ह्याकडे राजकीय मार्गक्रमण केले. काही काळ त्या सातारारोड पाडळी स्टेशन या मूळगावी वास्तव्यास होत्या. चिमणगावच्या माळावर श्री जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याची उभारणी करणे हा त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा ठरला. या कारखान्यासाठी परवाना मिळवताना त्यांनी सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा दिला.

१९९९ मध्ये त्यांनी विधानसभेचे माजी सभापती व काँग्रेसचे दिग्गज नेते शंकरराव जगताप यांचा पराभव करत त्यांच्या २५ वर्षांच्या संसदीय कारकीर्दीला पूर्णविराम दिला. यानंतर त्यांनी कोरेगाव तालुक्यात स्वतःचा कारखाना गट उभा केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर त्यांनी खासदार शरद पवार यांच्याशी जुळवून घेत राष्ट्रवादीतून कोरेगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवून विजय मिळवला. २००४ मध्ये त्यांनी पुन्हा विधानसभा निवडणुकीत विजय संपादन केला.

आर्थिक निकषावर आरक्षण : वादळी पण ठाम भूमिका

आर्थिक निकषावर आरक्षण या विषयावर पक्षश्रेष्ठी शरद पवार यांना न जुमानता त्यांनी आक्रमकपणे भूमिका घेतली. ती राष्ट्रवादीसाठी अडचणीची ठरली. त्यानंतर त्यांच्यात दरी पडली. यानंतर डॉ. शालिनीताई पाटील यांनी 'क्रांतिसेना' या स्वतंत्र पक्षाची स्थापना केली. यातून त्यांनी आर्थिक निकषावर आरक्षणाची भूमिका घेत मागासवर्गीय समाजाच्या विद्यमान आरक्षण धोरणावर आक्षेप नोंदवला.

## आज २८८ नगरपरिषदा

पार पडणार आहे. राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निकालाबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं महत्त्वाचा निकाल दिलेला आहे. काही नगरपरिषदांबाबत न्यायालयीन प्रक्रिया प्रलंबित असल्यानं राज्यातील जवळपास २० नगरपरिषदांची मतदान प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली होती. ही निवडणूक २० डिसेंबरला पार पडली. त्यामुळे सर्व निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत. अन्यथा २० नगरपरिषदांच्या निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली होती. उच्च न्यायालयाच्या खंडपीठानं सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचा निकाल एकाच दिवशी म्हणजे, २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे निर्देश दिलेले होते.

## बोगस मतदानासाठी आलेल्या

असल्याची माहिती समोर आली आहे. मतदानावर प्रभाव टाकण्यासाठी केलेली बेकायदेशीर गर्दी ,बोगस कागदपत्रांच्या आधारे मतदान करण्याची तयारी या कालमांतर्गत अंबरनाथ पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

या महिला भिवंडी येथील शांतीनगर परिसरातून बोगस मतदानासाठी आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मात्र या महिलांना भिवंडी येथून कुणाच्या सांगण्यावरून बोगस मतदानासाठी आणण्यात आलं होतं, यामागचा सूत्रधार कोण याचा सखोल तपास अंबरनाथ पोलीस करत आहेत.

सध्या या महिलांवर गुन्हे दाखल करून त्यांना नोटीस देऊन सोडण्यात आलं आहे. मात्र या महिलांचे भिवंडीचे जे कनेक्शन आहे त्या संदर्भात सखोल तपास करून जी माहिती पुढील त्याप्रमाणे कारवाई केली जाईल. शिवाय ज्या कृष्णा मॅरेज हॉलमध्ये या सगळ्या महिला थांबल्या होत्या, त्याचे मालक आणि शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार कृष्णा रसाळ यांच्यावर देखील कारवाई केल्याची माहिती पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली.

अंबरनाथच्या मातोश्री नगर परिसरात पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला. भाजप मतदारांना पैसे वाटत असल्याचा आरोप शिंदेंच्या शिवसनेनं केला होता. यानंतर या परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. त्यामुळे कार्यकर्त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. तसंच घटनास्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त असल्याचंही पहायला मिळालं.

## 'मुंबई महानगरपालिका

निवडणूक होत आहे. निवडणुक का झाली नाही? सरकारच थेट महानगरपालिका चालवत होतं. प्रत्येक गोष्टीत सरकार हस्तक्षेप करायचे. आपल्या संविधानातही ॲमेंडमेंड झाली आहे. तरीही या लोकांची निवडणूक घेण्याची इच्छा नव्हती, निवडणूक प्रणालीचा स्वीकर करण्याची यांची इच्छा नव्हती. यांना थेट मुंबई महानगरपालिका चालवायची हती,' असा आरोपही काँग्रेस नेते रमेश चेन्निथला यांनी यावेळी केला. तसेच, 'जर सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला नसता तर, येणारी पाच वर्षेही अशीच गेली असती. यामुळे आम्ही सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानतो. सर्वोच्च न्यायालयाने व्हरडिक्ट दिले म्हणून ही निवडणूक होत आहे,' असेही चन्निथला म्हणाले.

स्वबळाची घोषणा -

चेन्निथला पुढे म्हणाले, 'यामुळेच काँग्रेस पक्षाने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे, आम्ही भाजप विरोधात लढणार, आम्ही ठाकरेंच्या शिवसेने विरोधातही लढणार. तसेच, खऱ्या देशभक्तांनी आणि सेक्यूलर लोकांनी एकत्रितपणे काँग्रेस सोबत यायला हवे. आम्ही ही महानगरपालिका चांगल्या पद्धतीने चालवण्याचे काम आम्ही करू. आम्ही आमचा जाहीरनामा आपल्यासमोर सादर करू.' तसेच, मी मुंबईच्या जनतेला निवेदन करतो की, काँग्रेसला एकदा संधी द्या. आम्ही महानगरपालिका चांगल्या प्रकारे चालवण्याचा प्रयत्न करू, असे आवाहनही चेन्निथला यांनी यावेळी केले.

## भाजप नेत्यांकडून सगळीकडेच

खरे तर सत्ताधारी भाजपचे नेते सगळीकडे भूखंड गिळण्याचे काम करत आहेत. वेताळ टेकडी असेल किंवा जैन बोर्डींग असेल, सर्व बिल्डर, ठेकेदार व व्यावसायिकांसाठी सुरू आहे. जैन बोर्डींगमध्ये विषयात कोण होते, बिल्डर कोणाचा आहे, हे सर्वांना माहिती आहे. नंतर हे प्रकरण मुख्यमंत्र्यांनी मीटवल्याचे दाखवण्यात आले. भाजपचे स्थानिक आमदार व शहराध्यक्ष यांच्यात मतभेद नाही, ते सेटींगचे राजकारण आहे, असेही आदित्य ठाकरे म्हणाले.

## नायगाव शिवारात आढळला

पांढरकवडाचे उपवनसंरक्षक यशवंत बहाळे, सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव) विशाल चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो) वंदना धांडे, मानद व वन्यजीवरक्षक रमजान विराणी हेदेखिल घटनास्थळी दाखल झाले. या सर्व अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. त्यानंतर वाघाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रवाना करण्यात आला. शवविच्छेदनानंतर शनिवारी दुपारी वाघावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वाघाच्या मृत्यूचा तपास सहाय्यक वनसंरक्षक संगीता कोकणे व वनपरिक्षेत्र अधिकारी सुजाता विरकर करित आहेत.

तीन वर्षांपासून वाघाचा वावर

गेल्या तीन वर्षांपासून शिंदोला सिमेंट माईन्स, मुंगोली, कोलगाव, निलजई कोळसा खाण परिसरात पट्टेदार वाघांचा वावर असल्याचे अनेकदा दिसून आले. निलजई येथील कोळसा खाण परिसरात डिसेंबर २०२२ मध्ये केशवराव नांदे या कामगारावर वाघाने हल्ला करून जखमी केल्याची घटना घडली होती. तेव्हापासून कोळसा खाण परिसरात, शेतात अनेकांना पट्टेदार वाघ आढळून येत आहेत. तथापि, वाघाने मानवांवर हल्ला चढविल्याच्या घटना घडल्या नाही. या घटनेमुळे पुन्हा एकदा खाण कामगार, शेतकरी, शेतमजुरात वाघाची भीती निर्माण झाली आहे.

## १२ नगराध्यक्षांसह २७८ सदस्यांच्या

मतमोजणीसाठी ७४ फेऱ्या होणार असून प्रत्येक टेबलवर तीन कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. जिल्ह्यातील अचलपूर, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, वरूड, चांदूर रेल्वे, चिखलदरा, चांदूरबाजार, शेंदूरजना घाट, धामणगाव रेल्वे, मोर्शी, नांदगाव खंडेश्वर आणि धारणी या नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी निवडणुका पार पडल्या आहेत. दि.२ डिसेंबर रोजी ११ नगराध्यक्ष पदांसह २४४ सदस्य पदांसाठी मतदान झाले होते. अंजनगाव सुर्जी येथील निवडणूक काही कारणास्तव रखडली होती, ती शनिवारी शांततेत पार पडली. अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत नगराध्यक्ष पदासह २८ सदस्य पदांसाठी, तर अचलपूर, दर्यापूर, वरूड आणि धारणी नगरपरिषदेत सदस्य पदांसाठी मतदान झाले. येथे एकूण ३५ जागांसाठी २०९ उमेदवार निवडणूक रिंगणात होते.

न्यायालयाच्या आदेशानुसार आता १२ नगराध्यक्ष पदांसह सर्व सदस्य पदांसाठी आज मतमोजणी सुरू होणार आहे. या मतमोजणीकडे संपूर्ण जिल्ह्यासह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून, या निकालातून जिल्ह्यातील स्थानिक राजकारणाची पुढील दिशा निश्चित होणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

**मतमोजणी ची व्यवस्था-** अचलपूर,अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, वरुड, चांदुर रेल्वे,चिखलदरा,चांदूरबाजार,शेंदुजना घाट,धामणगाव रेल्वे,मोर्शी,नांदगाव खंडेश्वर,धारणी येथे मतमोजणीची व्यवस्था करण्यात आली आहे.

## अंजनगाव सुर्जी नगरपालिकेत

काही मतदान केंद्रांवर मतदानाची प्रक्रिया सायंकाळी सात वाजेपर्यंत सुरू होती. सुर्जी अंजनगाव येथील श्रीनाथ विद्यालयात प्रभाग क्रमांक ७ चे मतदान पार पडले. मतदान संपल्यानंतर ईव्हीएम मशीन सील करण्यात आली. त्यानंतर शिवसेना (उबाठा) पक्षाच्या उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी ईव्हीएम सील झाल्यानंतरही काही वेळ मतदान केंद्रात उपस्थित असल्याचे निदर्शनास आले. इतर पक्षांच्या प्रतिनिधींनी यावर आक्षेप घेतला.

या प्रकारानंतर काही वेळातच मतदान केंद्राबाहेर नागरिकांची गर्दी वाढू लागली. पाहता पाहता शहरात ईव्हीएम मशीन चोरीला गेल्याची अफवा वेगाने पसरली. या अफवेमुळे श्रीनाथ विद्यालयासमोर मोठा जमाव जमला.

घटनेची माहिती मिळताच निवडणूक निर्णय अधिकारी आणि पोलीस ताफा तात्काळ घटनास्थळी दाखल झाला. त्यांनी जमाव पांगवून उपस्थितांच्या शंका दूर केल्या आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. ईव्हीएम मशीन सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ही अफवा असल्याचे सिद्ध झाले.

## अपघातात आमदार संजय खोडके

असल्याची माहिती असून, त्यामुळे या प्रकरणी कोणतीही तक्रार दाखल करण्यात आली नाही. रात्री उशिरापर्यंत गाडगेनगर पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद झालेली नव्हती. अपघाताची माहिती मिळताच राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, विविध राजकीय नेते, कार्यकर्ते व नागरिकांनी रुग्णालयात धाव घेत आमदार खोडके यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्यांच्या लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. व्हिडीओ संदेशात आमदार संजय खोडके म्हणाले की, 'अपघातानंतर माझ्या सोबत असलेल्या मित्रांनी, कार्यकर्त्यांनी व हितचिंतकांनी तातडीने मदत केली. त्यांच्या सहकार्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. मी सुरक्षित असून लवकरच नियमित कामकाजाला सुरुवात करेन.' तसेच २१ डिसेंबर रोजी सांस्कृतिक भवनात होणारा कार्यकर्ता मेळावा यशस्वी करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

## बहीरम यात्रेच्या नावाखाली

वॅगनआर कार तसेच मोबाईल फोन असा एकूण ८ लाख ४४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत आरोपीने हा गुटखा बहीरम यात्रेमध्ये विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली असून, हा माल करजगाव येथील अब्दुला हुसेन याचा असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी घनश्याम पंजाबराव दंदे यांच्या तक्रारीवरून शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुटखा तस्करीचे संपूर्ण नेटवर्क उघडकीस आणण्यासाठी पुढील तपास सुरू आहे. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, सहायक पोलीस अधीक्षक (अचलपूर उपविभाग) डॉ. शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शिरजगाव कसबा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी महेंद्र गवई यांच्यासह अमोल कपले, मोहित चौधरी, अजय कुमरे, राजेंद्र घुले, वैभव मांडवगणे, योगेश राखोडे, दिनेश धर्मे व योगेश बर्वे या पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

## आज सकाळी 'हॅपी स्ट्रीट'

दि. २१ व २८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत वेलकम टी पॉइंटकडून बियाणी चौकाकडे जाणारी एकतर्फी वाहतूक बंद राहणार आहे. या कालावधीत वाहनचालकांसाठी वेलकम टी पॉइंट–पंचवटी चौक–कांता नगर चौक किंवा प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) मार्ग हा पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे. दरम्यान, ही वाहतूक बंदी रुग्णवाहिका, अग्निशामक दल तसेच अन्य अत्यावश्यक सेवेच्या वाहनांना लागू राहणार नाही. वाहतूक परिस्थितीनुसार वाहने थांबविणे किंवा वळविण्याचे सर्व अधिकार वाहतूक विभागाकडे राहतील. तसेच आपत्कालीन परिस्थितीत सहायक पोलीस आयुक्त (वाहतूक) यांना वाहतूक नियमनात आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार असतील. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायदा १९८८ व महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी दिलेल्या वेळेत वाहतूक निर्बंधांचे काटेकोर पालन करून पोलीस व वाहतूक विभागास सहकार्य करावे, असे आवाहन सहायक पोलीस आयुक्त (वाहतूक) संजय खताळे यांनी केले आहे.

## मतदान टक्केवारी वाढविण्याकरिता

यांच्या मार्गदर्शनात sveep विभागाच्या वतीने श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय येथे मतदानाची शपध हा उपक्रम राबविला गेला. यामध्ये ५०० विद्यार्थ्यांना मतदानाची शपध देण्यात आली.तसेच मतदान करणे का आवश्यक आहे याबदल माहिती देऊन मतदानाचे महत्व या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहचण्याचाच प्रयत्न केला जातं आहे. याकरिता sveep नोडेल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी डॉ प्रकाश मेश्राम, पंकज कुमार सपकाळ सहाय्यक कार्यक्रम अधिकारी,साबळे सर प्रभारी प्राचार्य, योगेश पखाले शाळा निरीक्षक, कैलास कुलट, उज्वल जाधव, योगेश राणे, संजय बेलसरे, निजामउद्दीन काझी, शुभांगी सुने, सुषमा दुधे, सुमेश वानखडे हे उपस्थित होते.

## गुंड-बदमाशांवर थेट कारवाई

स्पष्ट आदेश देण्यात आले की, शहरात आतंक माजविणाऱ्यांना घरात घुसून बाहेर काढा आणि बेड्या ठोका. पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, आयुक्त ओला यांच्या आदेशानंतर पोलिसांनी दहशतीत सहभागी असलेल्या आरोपींना थेट त्यांच्या घरातून उचलत अटक केली. आतापर्यंत डझनभराहून अधिक गुंडांना ताब्यात घेण्यात आले असून, ही मोहीम अजूनही सुरू आहे. 'सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड होणार नाही. शहरात दादागिरी, गुंडगिरी किंवा दहशत माजविण्याचा प्रयत्न झाला, तर क्षणात कारवाई केली जाईल. गुन्हेगारांना कोणत्याही परिस्थितीत माफी नाही,' असा स्पष्ट संदेश आयुक्त ओला यांनी दिला आहे.

**रात्रीभर सीपी रस्त्यावर; गुन्हेगारांत खळबळ-** पोलीस आयुक्त राकेश ओला हे स्वतः रात्रभर राजापेठ परिसरात ठाण मांडून परिस्थितीवर नजर ठेवून होते. त्यांच्या थेट उपस्थितीमुळे पोलिस दलात जोश संचारला असून, गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धसका निर्माण झाला आहे. शहरात शांतता राखण्यासाठी गुन्हे शाखा व स्थानिक पोलिसांना २४ तास सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले असून, पुढील काळातही अशीच कारवाई सुरू राहणार असल्याचे स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत.

## महापालिकेच्या मालमत्ता कर

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शिबिरास भेट देऊन वसुलीच्या कामकाजाचा आढावा घेतला. अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे कौतुक केले. भविष्यातही अशा प्रकारची कर वसुली शिबिरे सातत्याने आयोजित करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मालमत्ता करातून मिळणारा महसूल शहरातील रस्ते, स्वच्छता, ड्रेनेज, आरोग्य सेवा तसेच इतर नागरी सुविधांसाठी वापरण्यात येतो. त्यामुळे नागरिकांनी वेळेत मालमत्ता कर भरून शहराच्या विकासात सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

आज झालेल्या १.९६ कोटी रुपयांच्या वसुलीमुळे अमरावती महापालिकेच्या विकासकामांना आर्थिक बळ मिळणार असून आगामी काळात महसूल वाढीसाठी आणखी प्रभावी उपाययोजना राबविण्यात येणार असल्याचे मनपा प्रशासनाने सांगितले.

## राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या

१९ वर्षांखालील मुलेमध्ये कृष्णा शिंदे (पुणे विभाग) - ६५५ गुण, साईराज हनमे (पुणे विभाग) - ६५४ गुण, अभिराज मानमोडे (अमरावती विभाग) - ६५० गुण, अभ्युदय पखाले (क्रीडा प्रबोधिनी) - ६४९ गुण. १९ वर्षांखालील मुलीमध्ये वैष्णवी पवार (पुणे विभाग) - ६५५ गुण, तनुश्री श्रीनाथ (अमरावती विभाग) - ६१० गुण, गार्गी चव्हाण (पुणे विभाग) - ५८२ गुण, समीक्षा देशमुख (पुणे विभाग) - ५७९ गुण. सायंकाळच्या सत्रात मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पदके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या प्रसंगी आंतरराष्ट्रीय खेळाडू कुमकुम मोहोड हिचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच स्पर्धेचे तांत्रिक कामकाज पाहणाऱ्या ३० पंचांचाही गौरव करण्यात आला. उपजिल्हाधिकारी श्रद्धा उदावंत, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटूरवार, वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी स्वाती बाळापुरे, राज्य क्रीडा मार्गदर्शक अमर जाधव, निवड समिती सदस्य शुभांगी रोकडे, महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदूरकर, प्रशिक्षक प्रविण शर्मा, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, क्रीडा अधिकारी अनिल इंगळे आदी या सोहळ्याला उपस्थित होते. निवड झालेला १७ वर्षांखालील संघ ६ ते १० जानेवारी २०२६ दरम्यान झारखंड येथे, तर १९ वर्षांखालील संघ १४ ते १८ जानेवारी २०२६ दरम्यान मणिपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होईल.

## चिमुकल्यांनी रांगोळी व

पालक व विद्यार्थ्यांना मतदानाची शपथ सुद्धा देण्यात आली.

यावेळी स्वीप उपक्रमांतर्गत नियंत्रण अधिकारी तथा मनपा शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, शाळा निरीक्षक योगेश पखाले, सदस्य पंकज सपकाळ ,कैलास कुलट ,संजय बेलसरे, निजामुद्दीन काजी, सुषमा दुधे, शुभांगी सुने,उज्वल जाधव,विशाल वालचाळे , सोमेश वानखडे , शाळेचे मुख्याध्यापक गोपाल कांबळे, चित्रा खोब्रागडे , सय्यद हमजा व शिक्षक हे प्रामुख्याने उपस्थित होते.

**जिल्हा परिषद, बांधकाम विभाग वाशिम**
**निविदा सुचना क्र.०७ (२०२५-२०२६)**

अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांचे वतीने कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद वाशिम हे कामांच्या ब-१ दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या महाटेंडर या संकेत स्थळावर योग्य त्या प्रवर्गातील कंत्राटदाराकडुन मागविण्यात येत आहे. कामाची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाची आहे. निविदेचा विस्तृत नमुना **www.Mahatenders.com** संकेतस्थळावर दिनांक १९/१२/२०२५ ते २७/१२/२०२५ रोजी पर्यत पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**बांधकाम विभाग, जि.प.वाशिम**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ रविवार, २१ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# मतमोजणीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज; जिल्हाधिकाऱ्यांची मतमोजणी केंद्रांना भेट

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

**जिल्ह्यातील नगरपरिषद वाशिम व रिसोड नगरपरिषदेतील दोन प्रभागासाठी दि. २० डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. आणि नगरपरिषद कारंजा , मंगरूळपीर व नगरपंचायत मालेगाव सार्वत्रिक निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान झाले असून मतमोजणी रविवारी (दि. २१) डिसेंबर रोजी सकाळी १० वाजेपासून सुरू होणार आहे. मतमोजणीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून, कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रचंड पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.**



■ ९९० पोलिसांचा चोख बंदोबस्त
■ ७५५ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती
■ सकाळी १० वाजता पासून होणार मतमोजणी प्रक्रियेला प्रारंभ

नगर परिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया पार पडली असून मतमोजणी प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासन पूर्णतः सज्ज झाले आहे. मतमोजणी कामकाज सुरळीत, पारदर्शक व शांततेत पार पडावे, या उद्देशाने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी मतमोजणी होणाऱ्या वाशिम, रिसोड व मालेगाव येथील ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी केली.ष्या पाहणीदरम्यान मतमोजणी केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था, प्रवेश– निर्गम मार्ग, सीसीटीव्ही यंत्रणा, अग्निशमन सुविधा, वीजपुरवठा, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच आपत्कालीन परिस्थितीतील नियोजन यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मतमोजणी प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देत प्रत्येक बाबतीत दक्षता बाळगण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

वाशिम नगरपरिषदसाठी कोरोनेशन क्लब हॉल येथे मतमोजणी प्रक्रिया पार पडणार असून १२ टेबल व २ टेबलवर पोस्टल बॅलेटची ८ फेरीमध्ये मतमोजणी होणार आहेत.रिसोड नगरपरिषदसाठी तहसील कार्यालय रिसोड येथे मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. ११ टेबल व १ टेबलवर पोस्टल ५ पाच फेऱ्यांमध्ये मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.मंगरूळपीर नगरपरिषदसाठी तहसील कार्यालय मंगरूळपीर येथे मतमोजणी प्रक्रिया पार पडणार असून ८ टेबल व २ टेबलवर पोस्टल बॅलेटची ४ फेऱ्यांमध्ये मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

कारंजा नगरपरिषदसाठी कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकरी भवन येथे १३ टेबलवर व २ टेबलवर पोस्टल बॅलेटची ८ फेऱ्यांमध्ये मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. मालेगाव नगरपंचायती तहसील कार्यालय करिता १२ टेबलवर व १ पोस्टल बॅलेटची २ फेरीमध्ये मतमोजणी प्रक्रिया होणार आहे. वाशिम नगरपरिषदेंतर्गत अध्यक्ष १ पदासाठी एकुण ८ उमेदवार व १६ प्रभागातील ३२ सदस्य पदासाठी एकुण १७२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. रिसोड नगरपरिषदेंतर्गत अध्यक्ष १ पदासाठी एकुण ५ उमेदवार व ११ प्रभागातील २३ सदस्य पदासाठी एकुण ९६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. कारंजा नगरपरिषदेंतर्गत अध्यक्ष १ पदासाठी एकुण १२ उमेदवार व १५ प्रभागातील ३१ सदस्य पदासाठी एकुण १२७ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. मंगरूळपीर नगरपरिषदेंतर्गत अध्यक्ष १ पदासाठी एकुण ५ उमेदवार व १० प्रभागातील २१ सदस्य पदासाठी एकुण ८६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. मालेगाव नगरपंचायती अंतर्गत अध्यक्ष १ पदासाठी एकुण ५ उमेदवार व १७ प्रभागातील १७ सदस्य पदासाठी एकुण ६६ उमेदवार निवडणूक रिंगणात असुन अध्यक्ष पदासाठी ३५ उमेदवार व सदस्य पदासाठी ५४७ अश्या एकूण ५८२ उमेदवारांच्या भाग्याचा फैसला होणार आहे.

मतमोजणीदरम्यान कायदासुव्यवस्था अबाधित ठेवणे, उमेदवार व प्रतिनिधींना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच सर्व नियमांचे काटेकोर पालन करणे यावर विशेष भर देण्यात आला. कोणतीही गैरसोय अथवा अडथळा निर्माण होऊ नये यासाठी संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देश केले. वाशिम मतमोजणीसाठी पोलीस उपअधीक्षक १, पोलीस निरीक्षक २, सहायक पोलीस निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक १३, अंमलदार १६६, होमगार्ड १६० व १ स्ट्रायकिंग तुकडी रिसोड मतमोजणीसाठी पोलीस उपअधीक्षक १, पोलीस निरीक्षक २, सहायक पोलीस निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक ८, अंमलदार ९३, होमगार्ड ११० व १ स्ट्रायकिंग तुकडी मालेगाव मतमोजणीसाठी पोलीस उपअधीक्षक १, पोलीस निरीक्षक १, सहायक पोलीस निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक ५, अंमलदार ७०, होमगार्ड ६० व १ स्ट्रायकिंग तुकडी मंगरूळपीर मतमोजणीसाठी पोलीस उपअधीक्षक १, पोलीस निरीक्षक २,सहायक पोलीस निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक ५, अंमलदार ७५, होमगार्ड ६० व १ स्ट्रायकिंग तुकडी कारंजा मतमोजणीसाठी पोलीस उपअधीक्षक १, पोलीस निरीक्षक २,सहायक पोलीस निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक ६, अंमलदार ९५, होमगार्ड ६० असे एकूण ९९० व १ स्ट्रायकिंग तुकडी असा पोलीस बंदोबस्त मतमोजणी प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासनाच्या तयारीमुळे मतमोजणी प्रक्रिया शांततापूर्ण, निष्पक्ष व वेळेत पूर्ण होण्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सुर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

स्थानिक अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय येथे दि.१२ डिसेंबर रोजी सुर्यपुत्र भैय्यासाहेब उर्फ यशवंत आंबेडकर यांची १०० वी जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी जयंती कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी संदिप डोंगरे होते.तर प्रमुख उपस्थिती म्हणून दैनिक लोकमत चे वाशीम आवृत्ती उपसंपादक प्रमोद खडसे, डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, समाजभूषण पुरस्कार प्राप्त प्रविण पट्टेबहादूर, वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार, समता सैनिक दलाच्या कंपनी कमांडर कविता डोंगरदिवे, भगवान पडघान यांची उपस्थिती होती. सुरूवातीला उपस्थित मान्यवरांनी भैय्यासाहेब उर्फ यशवंत आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.

## श्री संत गाडगे बाबांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

शहरात थोर समाजसुधारक श्री संत गाडगे बाबा यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त शासकीय कार्यालये, सामाजिक संघटना, राजकीय पक्ष तसेच विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

शहरातील बजरंग पेठ येथील श्री संत गाडगे बाबा स्मारकात, श्री संत गाडगे बाबा विचार मंच व कारंजा तालुका धोबी (परीट) समाज संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने बाबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास हार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके, विचार मंचचे अध्यक्ष संतोष धोंगडे, बहुउद्देशीय सांस्कृतिक संस्थेचे अध्यक्ष रवि शहाकर, भाजप शहराध्यक्ष अमित संगेवार, प्रसन्ना पळसकर, सास संस्थेचे अध्यक्ष श्याम सवाई, अमोल रुईवाले, फरहान खान, अतुल चिमेगावे, संजय कडोळे, रोहित महाजन, सुधीर घोडसाळ, गाडगे बाबा पतसंस्थेचे अध्यक्ष विश्वनाथ राऊत, विनोद सोनोने, संदेश जिंतुरकर, संदीप कुऱ्हे, जिग्नेश लोडाया यांच्यासह विविध संस्था व गाडगे बाबा अनुयायी उपस्थित होते.

यावेळी संत गाडगे बाबांच्या स्वच्छता, सेवा व समाजप्रबोधनाच्या विचारांना उजाळा देण्यात आला. तसेच शहरातील ब्लू चिप कॉन्व्हेंट व इतर विद्यालयांच्या वतीने स्वच्छतेचा संदेश देणारी रॅली काढण्यात आली. वेदांत पब्लिक स्कूलमध्ये सुद्धा संत गाडगे बाबांच्या प्रतिमेस हार अर्पण करून विद्यार्थ्यांनी अभिवादन केले.

संपूर्ण शहरात या निमित्ताने सामाजिक जाणीव व स्वच्छतेचा संदेश पोहोचला असून संत गाडगे बाबांचे विचार आत्मसात करण्याचा संकल्प नागरिकांनी व्यक्त केला.

## कारंजा शहर पोलीसांची झटपट कारवाई २.६२ लाखांचा कॅनॉन कॅमेरा हस्तगत



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

कारंजा शहरात घडलेल्या महागड्या कॅमेऱ्याच्या चोरीच्या घटनेचा कारंजा शहर पोलीसांनी अवघ्या काही तासांत उलगडा करत आरोपीस अटक करून चोरीचा मुद्देमाल हस्तगत केल्याने पोलीस दलाच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे.

कारंजा लाड येथील रहिवासी शंतनू सुधाकर रोकडे यांनी पोलीस स्टेशन कारंजा शहर येथे दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी आनंद हॉटेल, सावरकर चौक, कारंजा येथे अज्ञात चोरट्याने त्यांच्या मालकीचा कॅनॉन कंपनीचा कॅमेरा व लेन्स (अंदाजे किंमत २,६२,०००/-) चोरून नेला होता. या प्रकरणी दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता (अप. नं. ७३६/२५, कलम ३०३(२) BNS). गुन्ह्याचा तपास मा. पोलीस निरीक्षक शुक्ला यांनी हाती घेतला. तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे आयुष किरण सोने (वय २१, रा. विद्याभारती कॉलनी, कारंजा) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीस गेलेला कॅमेरा व लेन्स असा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## होमगार्ड जवान तौफिक नौरंगाबादी यांची विद्यापीठस्तरीय कुस्ती स्पर्धेत दमदार कामगिरी



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

कारंजा शहर पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेले होमगार्ड जवान तौफिक अमजत नौरंगाबादी यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठस्तरीय कुस्ती स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावून कारंजा शहराचे नाव उज्ज्वल केले आहे.

या उल्लेखनीय यशासोबतच त्यांनी कलर कोट मिळवून राष्ट्रीय स्तरावरील कुस्ती स्पर्धेसाठी पात्रता मिळवली असून, ही कारंजा शहरासाठी अभिमानास्पद बाब

**कारंजा शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा**

आहे. त्यांच्या या यशामुळे क्रीडाक्षेत्रात कारंजा शहराची ओळख अधिक भक्कम झाली आहे. त्यांच्या जिद्द, मेहनत आणि शिस्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशाबद्दल होमगार्ड पथक मंगरूळपीर यांच्या वतीने तौफिक नौरंगाबादी यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्यांना उज्ज्वल यशाच्या शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## संत गाडगे महाराज पुण्यतिथीनिमित्त बालविकास मंदिर प्राथमिक शाळेत स्वच्छता रॅलीचे आयोजन



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

येथील तहसील कार्यालया जवळ बोरगाव रोड वरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथ शाळा मालेगाव येथे कर्मयोगी संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले. सदर रॅली ची सुरुवात कर्मयोगी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेची पूजन करून व हार अर्पण करून करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना संत गाडगे महाराज यांनी सांगितलेल्या स्वच्छतेविषयी विचार व इतर गोष्टींवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.सदर रॅली ची सुरुवात बालविकास मंदिर शाळेपासून ते मालेगाव शहरातील तहसील कार्यालय,बस स्टँड ,मुख्य बाजारपेठ, पंचायत समिती, नगरपंचायत, स्वामी समर्थ केंद्र व गांधीनगर इत्यादी ठिकाणाहून काढण्यात आली. या रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छता विषयक संदेश व सामाजिक जनजागृती संदेश असे हॅन्ड पोस्टर विद्यार्थ्यांनी तयार करून आणली होती. व संत गाडगे महाराज यांची वेशभूषा विवेक गायकवाड व पवन सावळकर या विद्यार्थ्यांनी साकारली होती. विद्यार्थ्यांनी काढलेल्या या स्वच्छता रॅलीमुळे सामाजिक प्रबोधना बरोबरच स्वच्छतेचा एक चांगला संदेश यामधून लोकांपर्यंत पोहोचविला जातो. सदर रॅलीला गटशिक्षणाधिकारी परांडे साहेब , गटविकास अधिकारी कंकाळ साहेब व तसेच कार्यालयातील कर्मचारी यांनी भेट दिली.सदर रॅली साठी मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे यांनी केले.व आयोजन योगेश वाळूकर यांनी केले. सदर रॅलीच्या यशस्वीतेसाठी शाळचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांनी मोलाचे सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडला.

## विद्यार्थ्यांचा वर्धा जिल्ह्यात कृषी अभ्यास दौरा उत्साहात संपन्न



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

वेदांत पब्लिक स्कूल, पोहा येथील इयत्ता ३ री ते ५ वीच्या विद्यार्थ्यांचा कृषी अभ्यास दौरा (ुंद ऊदले) वर्धा जिल्ह्यातील ताई यांच्या मळयात अत्यंत उत्साहात आणि ज्ञानवर्धक वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांना शेतीविषयक प्रत्यक्ष अनुभव देणे आणि कृषी जीवनाची ओळख करून देणे हा या अभ्यास दौऱ्यामागील मुख्य उद्देश होता.

या दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध पिकांची लागवड, सेंद्रिय शेतीचे महत्त्व, पाणी व्यवस्थापन, खतांचा योग्य वापर तसेच आधुनिक शेती अवजारांची माहिती प्रत्यक्ष पाहून व समजून घेतली. ताई यांनी मळ्यातील दैनंदिन कामकाजाची सविस्तर माहिती देत शेतीचे जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व विद्यार्थ्यांना प्रभावीपणे समजावून सांगितले.

विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्सुकतेने प्रश्न विचारत शेतीविषयी नवनवीन गोष्टी जाणून घेतल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शेतकऱ्यांच्या कष्टांची व योगदानाची जाणीव झाली तसेच निसर्गाशी नाते दृढ झाले.

या कृषी अभ्यास दौऱ्याचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक विजय मालवे यांच्या मार्गदर्शनाखाली व शिक्षकांच्या सहकार्याने करण्यात आले. पालकांनीही या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले.

## झाले इलेक्शन जपा रिलेशन

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

■ आजपासून मालेगाव च्या नवीन अध्यायाला सुरवात
■ किती विकास होईल हे येणारा काळच ठरवेल

नगर पंचायत निवडणूक मतदान २ डिसेंबर रोजी पार पडली असून २१ डिसेंबर रोजी मतमोजणी झाल्यानंतर आज मालेगाव शहराला नवे नगरसेवक नगराध्यक्ष मिळणार आहे. मतदान प्रक्रियेमध्ये अनेक जण आपापल्या परीने विजयाची गणिते लावत असून असून विजय आपलाच होईल अशी प्रत्येकाची अपेक्षा आहे.

आज २१ डिसेंबर रोजी प्रत्यक्ष मतमोजणी होऊन तहसील कार्यालयात निकाल जाहीर होणार आहे. जनतेचा कौल मान्य करून झाले इलेक्शन जपा रेशन चा सामाजिक संदेश शहरभर फिरण्याची आवश्यकता आहे

निवडणूक प्रक्रियेत अनेक उमेदवारांनी आपापल्या परीने गणिते मांडली असून आपापल्या विजयाचा दावा केला आहे.मात्र आज होणाऱ्या मतमोजणीनंतर मालेगाव शहराचे शिलेदार ठरणार आहेत. या निवडणुकीत काँग्रेस उमेदवार गणेश अहिर भारतीय जनता पार्टीचे उमेदवार नागेश बळी



शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार ओमप्रकाश खुरसडे, वंचित आघाडीचे उमेदवार रहमान शाह, राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सौ उषा जाधव, हे पाच नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असून निवडणूक मैदानात पाचही उमेदवारांनी आपली संपूर्ण ताकद पणाला लावली आहे.

निवडणूक झाली मात्र विजयाची माळ कोणाच्या गळ्यात पडते हे आज जरी समजणार असले तरी झाले इलेक्श जपा रिलेशन या युक्तीप्रमाणे सगळ्यांनी विजय मान्य करून पुढील पाच वर्षात एकमेकांना सहकार्य करून गावचा विकास कसा साधता येईल याकडे एकजुटीने मदत करण्याची गरज आहे कोणी आपल्याला मतदान दिले कोणी दिले नाही याची गणिते लावत बसण्यापेक्षा जे झाले ते मान्य करावे अशी सगळीकडे चर्चा आहे.

**किती विकास होईल हे येणारा काळच ठरवेल :** बरेच लोक निवडून येण्याच्या अगोदर आम्ही असा विकास करू असे म्हणून जाहीरनाम्यात प्रसिद्ध केले होते मात्र शहराचा खरा विकास किती आणि कसा होईल हे येणारा काळच ठरवेल.

## डॉ. जयश्री गुट्टे यांच्याकडून शैक्षणिक साहित्य वाटप
### आ. श्याम खोडे यांच्या जन्मदिनानिमित्य उपक्रम



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

सामाजिक कामात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा चिटणीस डॉ. जयश्री गुट्टे यांनी वाशिम मंगरूळनाथ विधानसभेचे आमदार श्याम खोडे यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबा महाली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप केले. या वेळी भाजप महिला मोर्चा शहराध्यक्ष हेमलता रुपेश विसपुते यांच्यातर्फे पाणी बॉटल, कार्यकर्ता रूपाली देशमुख यांच्यातर्फे बिस्कीटचे पुडे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक केशवराव खासबागे, बुंदे सर, भोयर, राजेश देशमुख, आळणे, रेखाताई वानखेडे , उज्वला (देबाजे) मोरे उपस्थित होते.

## महिलांनी व्यवसाय क्षेत्रात पुढे यावे - आ. शाम खोडे

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

आज महिला प्रत्येक क्षेत्रात पुढे येत आहे देशातील पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी महिलांकरिता विविध योजना सुरू केलेले आहेत. लाडकी बहीण योजना असो किंवा महिला सशक्तीकरण पर्व असो या क्षेत्रात त्यांना बळ देण्याचे काम करीत आहे आज वाशिम येथील राजस्थानी समाजातील महिला मंडळांनी १८ वर्षापासून शॉपिंग मेळाव्याच्या माध्यमातून महिलांना पुढे आणण्याचे काम केले आहे व्यवसाय क्षेत्रात हे कार्य प्रेरणादायी आहे महिलांनी व्यवसाय क्षेत्रात पुढे यावे असे आव्हान भाजपा आमदार शाम खोडे यांनी केली आहे. स्थानिक महेश भवन येथे अखिल भारतीय मारवाडी महिला सभेला त्या वतीने भव्य शॉपिंग मेळावा आयोजित करण्यात

**मारवाडी महिला संमेलनाच्या शॉपिंग मेळाव्याला भव्य प्रतिसाद**



आला याप्रसंगी उद्घाटक मधून त्यांनी वरील प्रतिपादन केले . उद्घाटन समारंभाला मंचावर आमदार खोडे यांच्या समवेत उद्योजक अनिल केंदळे, मजी नगराध्यक्ष अशोक हेडा,सौ. पुनम हैडा, सुनील मालपाणी, मारवाडी महिला संमेलनाच्या अध्यक्ष सौ. पूनम लड्डा उपस्थित होत्या यावेळी सर्व मान्यवर यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला, सोबत सर्व पत्रकार व मेळाव्याला मदत करणाऱ्या व्यक्तीलाही सन्मानित करण्यात आले, यावेळी सुनील मालपाणी यांनी महिलांच्या प्रगतीचे अनेक उदाहरणे दिली नोटबंदी काळात महिलांनी घरात लपवलेल्या नोटांचे किस्से ही त्यांनी सांगितले या माध्यमातून बचत हा संदेश त्यांनी दिला माजी नगराध्यक्ष हेडा यांनी गत अठरा वर्षापासून आपण या महिला संघटनेच्या कार्याला जाणुन आहोत सर्वांना सोबत घेऊन हा यज्ञ त्यांनी पुढे दिला आहे असे सांगितले. अध्यक्ष सौ पूनम हैडा यांनी आज शॉपिंग मेळावाला जे यश मिळत आहे ते सर्व टीम वर्क मुळे शक्य झाली आहे हे कोणत्याही एका व्यक्तीचे यश नाही सर्व पदाधिकारी यांचे यश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले मग्यवराच्या हस्ते फीत कापून रीतसर मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले कार्यक्रमाचे संचालन सौ. भाग्यश्री बियाणी, सौ. इनानी यानी केले सदर शॉपिंग मेडाव्यात जवळपास ६० स्टॉल लागलेले आहेत सर्व नागरिकांनी महिलांनी शॉपीगं भेट द्यावे असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २६ ■ रविवार, २१ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# नगरपालिका : मतांचा पिटारा आज उघडणार

## गुलाल, हार कोणाच्या गळ्यात ?

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील सहा नगरपालिकांचा राजकीय फैसला आज होणार असून, मतमोजणीच्या रणधुमाळीत कोणाचा विजय होणार आणि कोणाला पराभवाची चव चाखावी लागणार, हे काही तासांत स्पष्ट होणार आहे. प्रत्येक पक्ष आमचीच सत्ता असा दावा करत असला तरी प्रत्यक्षात मतदारांनी कोणाला कौल दिला आहे, हे आज उघड होणार असल्याने राजकीय वर्तुळात प्रचंड तणाव आणि उत्सुकता निर्माण झाली आहे.

वर्धा जिल्ह्यातील वर्धा, देवळी, पुलगाव, आर्वी, हिंगणघाट आणि सिंदी (रेल्वे) या सहा नगरपालिकांसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली आहे. काही नगरपालिकांच्या निवडणुका पुढे ढकलल्यामुळे निकालही रखडले होते. मात्र शनिवारी उर्वरित ठिकाणी मतदान झाले असून, त्यासह सर्व सहा



नगरपालिकांचे निकाल आजच जाहीर होणार आहेत. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष आजच्या मतमोजणीकडे लागले आहे.

मतमोजणीसाठी प्रशासनाने कडेकोट तयारी केली असून, सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. दुपारी ३ वाजेपर्यंत चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत सर्वच पक्षांकडून विजयाचे दावे केले जात आहेत. मात्र 'मतदार राजा' कोणाच्या बाजूने उभा राहिला आहे, हे निकालानंतरच ठरणार आहे.

### विजयाची खात्री, तरीही छातीत धडधड

आज मतदानाचा पिटारा उघडणार असल्याने उमेदवार, कार्यकर्ते आणि समर्थकांची छातीत धडधड वाढली आहे. अनेकांनी देव पाण्यात ठेवत आपलाच उमेदवार विजयी व्हावा यासाठी प्रार्थना सुरू केली आहे. सहाही नगरपालिकांमध्ये अत्यंत चुरशीची लढत झाल्याने प्रत्येक फेरीत चढ-उतार पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चेनुसार अध्यक्ष पदासाठी वर्धा नगरपालिकेत काँग्रेसला, तर आर्वी, हिंगणघाट, पुलगाव आणि सिंदी (रेल्वे) येथे भाजपला आघाडी मिळण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. देवळीमध्ये मात्र कोण बाजी मारणार, हे सांगणे कठीण मानले जात आहे. मात्र हे सारे अंदाज फोल ठरणार की खरे, याचा निर्णय आज दुपारपर्यंत मतदारांसमोर येणार आहे. एकीकडे विजयाचे दावे, तर दुसरीकडे पराभवाची भीती या द्वंद्वातूनच आज वर्धा जिल्ह्याच्या राजकारणाची दिशा ठरणार आहे. गुलाल कोण उधळणार आणि कोणाच्या गळ्यात बुका पडणार, याचा रोखठोक फैसला आज मतमोजणीच्या टेबलावर होणार आहे.

# संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

## -डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात कार्यक्रम

### -अतुल वांदिले, अनिल जवादे यांची प्रमुख उपस्थिती

**वर्धा । जनमाध्यम :** येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात आज थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले तसेच विदर्भ विकास आघाडीचे नेते अनिल जवादे यांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



संत गाडगेबाबा यांनी समाजातील अंधश्रद्धा, अस्वच्छता व अनिष्ट प्रथा दूर करण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. स्वच्छता, शिक्षण व सामाजिक समतेचा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून समाजापुढे ठेवला, असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. त्यांच्या विचारांची आजच्या काळात अधिक गरज असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमावेळी संत गाडगेबाबा यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेण्यात आला. ग्रामीण भागातील जनजागृती, स्वच्छतेचे महत्व आणि सामाजिक बांधिलकी याबाबत त्यांनी दिलेले योगदान प्रेरणादायी असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम शांततेत व सुसंस्कृत वातावरणात पार पडला.

# देवळी नगरपरिषद निवडणूक : तिहेरी रणसंग्राम, प्रतिष्ठेची लढाई रंगात

**देवळी जनमाध्यम :** देवळी नगर परिषदेच्या निवडणुकीने संपूर्ण तालुक्याचे राजकीय वातावरण ढवळून निघाले असून येथे सध्या तिहेरी रणसंग्रामाचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. गेल्या ३५ वर्षांपासून देवळी नगरपरिषदेत माजी खासदार रामदास तडस यांचे वर्चस्व राहिले आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक ही केवळ नगराध्यक्षपदापुरती मर्यादित न राहता भाजपसाठी 'सत्ता टिकवायची की हातातून जायची' अशा प्रतिष्ठेची ठरली आहे.



देवळी नगराध्यक्षपदासाठी एकूण पाच उमेदवार रिंगणात असले तरी प्रत्यक्ष लढत भाजपच्या शोभा तडस, काँग्रेसचे सुरेश वैद्य आणि अपक्ष उमेदवार किरण ठाकरे यांच्यातच होत आहे. माजी खासदार रामदास तडस यांच्या पत्नी शोभा तडस यांना भाजपने उमेदवारी दिल्याने ही लढत अधिकच चुरशीची बनली आहे. दुसरीकडे, काँग्रेसने सुरेश वैद्य यांच्या माध्यमातून थेट आव्हान उभे केले असून अपक्ष उमेदवार किरण ठाकरे यांनीही तिसऱ्या आघाडीप्रमाणे निवडणूक पूर्णपणे रंगतदार केली आहे.

प्रचाराच्या काळात देवळीतील राजकीय वातावरण तापले होते. तिन्ही प्रमुख उमेदवारांच्या प्रचार रॅली, जाहीर सभा, घरोघरी भेटी आणि संपर्क मोहिमांना मोठा प्रतिसाद मिळाला. प्रत्येक पक्ष व उमेदवाराने आपली ताकद दाखवून देण्याचा प्रयत्न केला. मात्र, मतदानानंतरही मतदारांचा कौल नेमका कोणाच्या बाजूने आहे, हे अद्याप गुलदस्त्यातच आहे.

या निवडणुकीला बड्या नेत्यांचीही छाया लाभली. भाजपकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी देवळीत सभा घेत भाजपची ताकद दाखवली. काँग्रेसकडून माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी प्रचारसभा घेत पक्ष कार्यकर्त्यांमध्ये जोश भरला. तर अपक्ष उमेदवार किरण ठाकरे यांच्यासाठी बच्चू कडू आणि रविकांत तुपकर यांनी सभा घेत स्वतंत्र राजकारणाची धार अधिक तीव्र केली.

दरम्यान, सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार मतदान पार पडल्याने काही ठिकाणी नाराजीचे सूरही उमटले. मात्र, या सगळ्याचा अंतिम निकालावर नेमका काय परिणाम होणार, याबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे. तिहेरी लढतीमुळे मतांचे विभाजन होण्याची शक्यता असून प्रत्येक फेरीत चुरशीचा सामना होणार, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

एकीकडे भाजप आपले पारंपरिक वर्चस्व कायम ठेवण्यासाठी सज्ज आहे, तर काँग्रेस सत्ताबदलाचा दावा करत आहे. अपक्ष उमेदवारानेही दोन्ही प्रमुख पक्षांची झोप उडवली आहे. त्यामुळे देवळी नगरपरिषद निवडणूक ही यंदाच्या जिल्ह्यातील सर्वाधिक लक्षवेधी आणि चुरशीची निवडणूक ठरली आहे.

आता सर्वांचे लक्ष आज होणाऱ्या मतमोजणीकडे लागले असून देवळीच्या सत्तेचा कौल कोणाच्या बाजूने लागतो, हे काही तासानंतर मिळणार आहे,

# भा.ज.पा. जिल्हा सचिवपदी संजय जैस्वाल यांची निवड

**सेलु जनमाध्यम :** माजी पंचायत समिती सदस्य संजय मोतीलालजी जैस्वाल यांची भा.ज.पा. पक्षाला भविष्यातील संघटनात्मक कौशल्याचा फायदा होईल, याचा विचार करून आज दि. २० डिसेंबर रोजी जिल्हा सचिव पदावर निवड करण्यात आली आहे. या निर्णयानंतर कार्यकर्त्यांकडून व चाहत्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला आहे.



यावेळी संजय जैस्वाल यांना मा. जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित होते जिल्हा अध्यक्ष संजय गाते, सेलु तालुका अध्यक्ष प्रफुल्ल खोडे, शहर अध्यक्ष ओमदेव सावरकर, जनता युवा मोर्चाचे गोलु कामीनकर यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित कार्यकर्त्यांनी संजय जैस्वाल यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाज अधिक दृढ करण्याची अपेक्षा व्यक्त केली. नियुक्ती पत्र मिळाल्यानंतर संजय जैस्वाल यांनी आपले मनोगत व्यक्त करत भा.ज.पा. पक्षाच्या विकासासाठी आणि कार्यकर्त्यांच्या सहकार्याने जिल्हा स्तरावर नवनवीन ऊर्जेसह काम करण्याचे आश्वासन दिले.

# पुलगाव पोलिसांची कारवाई : डिझेल व बॅटरी चोरीप्रकरणी दोघांना अटक

**पुलगाव जनमाध्यम :** कवठा मलकापूर शिवारातील टॉवरमधून डिझेल व बॅटरी चोरीप्रकरणी पुलगाव पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरात सुरू असलेल्या चोऱ्यांच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार आहे.



फिर्यादी अमोल देविदास गुजर (रा. सुवर्णनगर, यवतमाळ) यांनी पोलीस स्टेशन पुलगाव येथे तक्रार दाखल केली होती. कवठा मलकापूर शिवारातील खुल्या जागेत असलेल्या टॉवरमधून एक बॅटरी व डिझेल असा सुमारे ९,५०० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे तक्रारीत नमूद होते. त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला.

सदर गुन्ह्याचा तपास डी.बी. पथकाकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे गिरोली (ता. धामणगाव, जि. अमरावती) येथील राजेश शेषराव मेश्राम (वय ४५) व आकाश लक्ष्मण सोनवणे (वय ३३) यांनी चोरी केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी चोरीची कबुली दिली. त्यानंतर त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेली बॅटरी व डिझेल जप्त करण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी वंदना कारखेले यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस स्टेशन पुलगावचे ठाणेदार यशवंत सोलसे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

तपासात पोलीस हवालदार विनोद रघाटाटे तसेच पोलीस शिपाई उमेश बेले, संदीप बोरबन, गणेश इंगळे व सत्यप्रकाश काकण यांनी सहभाग घेतला. पोलिसांच्या या तत्पर कारवाईमुळे नागरिकांत समाधान व्यक्त होत असून, चोऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

# हिंगणघाटचा साहसी बाईकवीर नेपाळच्या दिशेने रवाना

## -५ हजार किमीचा थरारक प्रवास; आ.कुणावार यांचा आशीर्वाद

**हिंगणघाट जनमाध्यम :** हिंगणघाट शहरातील माता मंदिर वॉर्ड येथील रहिवासी वैभव साटोणे या युवकाने दुचाकीवरून थेट नेपाळपर्यंत जाण्याचा धाडसी संकल्प साकारत आज आपल्या साहसी प्रवासाला सुरुवात केली. सुमारे पाच हजार किलोमीटरचा हा खडतर आणि थरारक प्रवास करत वैभव हिंगणघाटचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवणार आहे.



या आगळ्यावेगळ्या मोहिमेच्या प्रारंभी हिंगणघाट विधानसभा क्षेत्राचे आमदार समीर कुणावार यांनी वैभवला आशीर्वाद देत मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. युवकांनी केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता साहस, अनुभव आणि अभ्यासाच्या माध्यमातून स्वतःला घडवावे, असे मत आमदार कुणावार यांनी व्यक्त केले. या प्रवासासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

वैभव साटोणे याचा हा दौरा केवळ पर्यटनापुरता मर्यादित नसून अभ्यासदृष्टीने महत्त्वाचा आहे. भारताबाहेरील देशांची भौगोलिक रचना, सामाजिक जीवन, संस्कृती व जीवनशैली यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा त्याचा मानस आहे. विशेष म्हणजे, हिंगणघाट शहरातून दुचाकीवरून थेट नेपाळपर्यंत अभ्यासदौरा करणारा वैभव हा पहिला युवक ठरणार असल्याने त्याच्या या उपक्रमाची सर्वत्र चर्चा होत आहे.


डोंगराळ प्रदेश, लांब पल्ल्याचे अंतर, बदलते हवामान आणि अनोळखी मार्ग अशी अनेक आव्हाने या प्रवासात असणार आहेत. मात्र, जिद्द, आत्मविश्वास आणि साहसी वृत्तीच्या जोरावर हा प्रवास यशस्वीपणे पूर्ण करण्याचा निर्धार वैभवने व्यक्त केला आहे. या मोहिमेमुळे हिंगणघाटमधील युवकांना नवी दिशा व प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.

वैभवचा हा प्रवास सुरक्षित, अडथळ्याविना व यशस्वीपणे पार पडावा, तसेच त्याच्या पुढील वाटचालीस उज्ज्वल यश लाभो, अशा मनःपूर्वक शुभेच्छा आमदार समीर कुणावार यांनी दिल्या. हिंगणघाटचा हा साहसी बाईकवीर नेपाळच्या दिशेने झेपावल्याने शहराचा अभिमान आणखी वाढला आहे.

# महाप्रसादासाठी गेलेला मुलगा बेपत्ता; पाण्याच्या टाकीत मृतदेह आढळला

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातील टिळक चौक परिसरात आयोजित महाप्रसादासाठी घराबाहेर पडलेल्या १५ वर्षीय मुलाचा मृतदेह डागा मील गिरणी परिसर येथील पाण्याच्या टाकीत तरंगताना आढळून आल्याने शहरात शोककळा पसरली.

टिळक चौक परिसरातील आनंद गिरी यांचा१५ वर्षीय मुलगा दक्ष गिरी हा गुरुवारी सायंकाळी महाप्रसादासाठी घरातून बाहेर पडला होता. मात्र रात्री उशिरापर्यंत तो घरी न परतल्याने कुटुंबीयांनी नातेवाईक, मित्रमंडळी तसेच परिसरात त्याचा शोध सुरू केला. सर्वत्र चौकशी करूनही त्याचा थांगपत्ता न लागल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली होती.



दरम्यान, शुक्रवारी सकाळी डागा मील गिरणी परिसरातील पाण्याच्या टाकीत एका युवकाचा मृतदेह तरंगताना दिसल्याची माहिती स्थानिक नागरिकांना मिळाली. ही बाब तातडीने पोलिसांना कळविण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह बाहेर काढत पंचनामा केला. तपासादरम्यान मृतदेहाची ओळख दक्ष गिरी म्हणून पटली.

मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. शवविच्छेदनासाठी मृतदेह पाठविण्यात आला असून, अहवालानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. युवकाचा मृत्यू अपघाती की अन्य कारणामुळे झाला, याबाबत पोलिसांकडून विविध शक्यांच्या आधारे तपास सुरू आहे.

या दुर्दैवी घटनेने शहरात हळहळ व्यक्त होत असून, दक्षगिरीच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परिसरातील नागरिकांनीही शोक व्यक्त केला असून, पोलिस तपासातून लवकरच सत्य समोर यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# प्रकल्पासाठी जमीन दिली, पदरी १७ वर्षांचा 'वनवास'

## -निम्न वर्धा प्रकल्पग्रस्तांचा आक्रोश; १८ नागरी सुविधांचा पत्ता नाही

**आर्वी । जनमाध्यम :** देशाच्या प्रगतीसाठी सुपीक जमीन, घरे व पिढ्यान्?पिढ्यांचा संसार सोडलेल्या निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत पुनर्वसित १९ गावांतील प्रकल्पग्रस्तांचा संयम सुटू लागला आहे. पुनर्वसन होऊन तब्बल १७ वर्षे उलटली, तरीही शासनाने ठरवून दिलेल्या १८ नागरी सुविधा आजही कागदावरच असल्याचा गंभीर आरोप प्रकल्पग्रस्तांकडून केला जात आहे. प्रत्यक्षात वसाहतींमध्ये मूलभूत सुविधांचा दुष्काळ असून, हालअपेष्टाच पदरी पडल्या आहेत.

प्रकल्पग्रस्तांच्या म्हणण्यानुसार, कागदोपत्री कामे पूर्ण झाल्याचे दाखवून प्रकल्प हस्तांतरित करण्याची घाई करण्यात आली. मात्र प्रत्यक्षात कामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे. अंतर्गत रस्ते उखडलेले, नाल्यांचे उतार चुकीचे, सांडपाणी व्यवस्थापनाचा अभाव आणि अपुऱ्या वीज व्यवस्थेमुळे वसाहतींची अवस्था बिकट झाली आहे. अनेक गावांत स्मशानभूमी आहे; पण तिथे जाण्यासाठी रस्ताच नाही. कुठे रस्ता आहे, तर लाईटची सोय नसल्याने अंधारातच अंत्यसंस्कार करावे लागतात. विजेचे खांब उभे असले तरी दिवे पेटत नाहीत.

नाल्यांच्या अपुऱ्या कामांमुळे पाण्याचा निचरा होत नसून घाण पाणी गावातच साचते. पावसाळ्यात डासांचा प्रादुर्भाव वाढून रोगराईचे सावट कायम असते. कोट्यवधींचा निधी खर्च झाल्याचे सांगितले जाते; पण त्याचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना मिळालेला नाही. कंत्राटदारांचेच खिसे भरले गेले का, असा सवाल उपस्थित होत आहे.

सर्कसपूर येथील प्रकल्पग्रस्त निखिल कडू म्हणाले, पुनर्वसन नावापुरते झाले. रस्ते, नाल्या, वीज, पाणी काहीच नीट नाही. मिर्झापूर नेरी येथील बाळा सोनटक्के यांनीही नाराजी व्यक्त करत, जमीन गेली, रोजगाराची आश्वासने हवेतच विरली. किमान १८ नागरी सुविधा तरी पूर्ण द्या,अशी मागणी केली.नागरी सुविधांचा प्रश्न तातडीने मार्गी न लावल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा प्रकल्पग्रस्तांनी दिला असून, प्रशासन आता तरी जागे होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### गोपाला गोपाला...देवकीनंदन गोपाला...

# पिंपळगाव येथे गाडगेबाबा पुण्यतिथी

**हिंगणघाट जनमाध्यम :** 'गोपाळा गोपाळा देवकीनंदन गोपालानगरी दुमदूमली. या संत गाडगेबाबांच्या भक्तिरसपूर्ण भजनाच्या गुफ्तीने पिंपळगाव (मा) गाव दुमदुमले, तर स्वच्छतेच्या जनक वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा महाराजांच्या पुण्यतिथीने ग्रामस्थांच्या हृदयात कर्तव्यभाव जागला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान (२०२५-२६) अंतर्गत शनिवार, दि. २० डिसेंबर रोजी ग्रामपंचायत कार्यालयात साजऱ्या झालेल्या या पुण्यतिथी सोबतच आठवड्यातील ग्रामस्वच्छता मोहीम उत्साहाने राबवली गेली. ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने हातभार लावून बाबांच्या स्वच्छ ग्रामस्वप्नाला प्रत्यक्षात आणण्याचा संकल्प घेतला,संतांचे स्वप्न साकार करण्यासाठी ठाम संकल्पया मोहिमेत सहभागी झालेल्या ग्रामस्थांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांच्या आदर्श ग्रामनिर्मितीच्या स्वप्नाला वास्तवात उतरण्याचा निर्धार व्यक्त केला. आठवड्यातून एक दिवस ग्रामस्वच्छता मोहीम राबवून आपले गाव स्वच्छ व आरोग्यमुक्त करू. संत-महात्म्यांच्या आध्यात्मिक विचारांशी नाळ जोडलेल्या आपल्या गाववासीयांनी हे कार्य कायमस्वरूपी चालू ठेवले पाहिजे, असे संकल्प ग्रामस्थांनी दिला. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही मोहीम नियमित होईल आणि गावकऱ्यांच्या सहभागाने पिंपळगाव आदर्श ग्राम बनेल.नेतृत्व व ग्रामस्थांचा मोठा सहभागग्रामपंचायत अधिकारी प्रफुल इखार यांच्या नेतृत्वाखाली माजी सरपंच पुरुषोत्तम वरटकर, मिनेश जाधव, प्रशासक ग्रामगीता प्रचारक युवा मंचाचे मार्गदर्शक हभप प्रतीक महाराज झाडे, नरेश हरणे, महिलांचा व युवकांचा मोठा सहभाग यशस्वी झाल्याचे ग्रामस्थ सांगत होते.मुख्यमंत्री अभियानाला गती, आदर्श ग्रामाकडे पहिले पाऊलमुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ही मोहीम गावागावी राबवली जात असून, पिंपळगाव (मा) ने आदर्श वाटचाल सुरू केली आहे. गाडगेबाबांच्या वैराग्यपूर्ण जीवनाचे स्मरण करून ग्रामस्थांनी स्वच्छता हीच खरी भक्ती असल्याचे सांगितले. हिंगणघाट तालुक्यातील या गावाने दिलेला संकल्प इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी अपेक्षा आहे.

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार श्री . अशोक एकनाथ काटोलकर हे मौजा - Saujna, तह - बाभुळगाव अँड ज़िल्हा - यवतमाळ ,ग्रामपंचायत आष्टा रामपूर भूमापन क्रमांक . ३७ ,मधील घर क्रमांक १८३ ज्याचे क्षेत्रफळ२७८.८१ चौरस मीटर चे मालक आहेत सदर प्लॉटची चतुरसीम -

पूर्वेस- श्री परसराम चेटुले ह्यांचे घर
पश्चिमेस- श्री बापूराव ठाकरे ह्यांचे घर
उत्तरेस - रोड
दक्षिणेस - भाऊराव काकडे ह्यांचे घर.

सादर मालमत्ता हि सौ. विठाबाई एकनाथराव काटोलकर ह्यांची मालकीची होती. सौ. विठाबाई एकनाथराव काटोलकर ह्यांचा मृत्यू झाल्यानंतर सदर मालमत्तेवर त्यांचे कायद्याप्रमाणे वारस म्हणून श्री. अशोक एकनाथ काटोलकर , सौ. रेखा रमेशराव मोरनकर अँड सौ. वर्षा विनोद इंगळे ह्यांची दिनांक ३१/०८/२०२५ फेरफार क्रमांक . १ अन्वय नोंद झाली आहे.त्यानंतर सौ. रेखा रमेशराव मोरनकर अँड सौ. वर्षा विनोद इंगळे ह्यांनी सादर मालमत्तेवरून आपला मालकी हक्क श्री . अशोक एकनाथ काटोलकर ह्यांना नोंदणीकृत हक्कसोड लेखाद्वारे दिनांक ०६ -११ - २०२५ दस्त क्रमांक १३३६ अन्वय दिला आहे. श्री.अशोक एकनाथ काटोलकर हे सादर मालमत्ता बक्षिसपात्र द्वारे संचालि अशोक काटोलकर ह्यांना देत आहे. संचालि अशोक काटोलकर सादर मालमत्ता गहाण ठेविण्याकरिता पिरामल हौसिंग फिनान्स येथे कर्जासाठी अर्ज केला आहे. सर्व जनतेला सादर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल व तर कृपया ही सूचना प्रकाशित केल्याच्या ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

**अ‍ॅड.आर.आर.तिवारी**
**रामनगर वर्धा.**
**मो.९९२२४२६१६८**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शरद पवारांच्या विश्वासू शिलेदाराचा भाजपात प्रवेश



## विश्वासू नेत्याच्या पडणार दरी

**पुणे :** महिन्याभरात पुणे महापालिका निवडणुकीसाठी मतदान पार पडत आहे. १५ जानेवारीला मतदान पार पाडणार असून १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. त्यापूर्वी भाजपमध्ये आज जोरदार इनकमिंग झाले आहे. यातील काही पक्षप्रवेश तर असे होते की ज्यांना भारतीय जनता पक्षामधूनच विरोध होता मात्र तरीसुद्धा हे प्रवेश झाले आहेत. ज्यांना विरोध होता, त्यापैकी महत्त्वाचं नाव जर पाहायला गेलं तर ते म्हणजे खडकवासला विधानसभा मतदारसंघातून दोन वेळेस निवडणूक लढविणारे आणि शरद पवार यांचे विश्वासू समजले जाणारे सचिन दोडके .

सचिन दोडके हे सुप्रिया सुळे आणि शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू शिलेदार समजले जायचे. त्यामुळेच त्यांना खडकवासला विधानसभा मतदारसंघातून भाजपचे आमदार भीमराव तापकीर यांच्या विरोधात दोन वेळा उमेदवारी सुद्धा देण्यात आली होती. मात्र पवारांचा हाच शिलेदार आपल्या गळाला लावण्यासाठी थेट केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी फासे फेकले होते. मुरलीधर मोहोळ यांनी सचिन दोडके यांना पक्षात घेण्यासाठी प्रयत्न सुरू केल्यानंतर त्यांना थेट पक्षातूनच आपलेच आमदार असणाऱ्या भीमराव तापकीर यांनी कडाडून विरोध केला होता. भारतीय जनता पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पक्षामध्ये कुणाला प्रवेश द्यायची यावरून पुण्यातील दोन अण्णांमध्ये अर्थात मुरलीधर मोहोळ आणि भीमराव तापकीर यांच्यामध्ये जोरदार खडाजंगी उडाली होती.

दोडके यांना प्रवेश देण्यासाठी मुरलीधर मोहोळ हे इच्छुक होते. यावरूनच भाजपच्या कोअर कमिटीमध्ये मोहोळ आणि तापकीर यांच्यामध्ये जोरदार शाब्दिक बाचाबाची झाली होती. मात्र केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पक्षातीलच सर्व विरोध डावलून सचिन दोडके यांना प्रवेश दिला आहे. आज मुंबईमध्ये सचिन दोडके यांनी

# उज्वल निकम यांना हटवा

## संतोष देशमुख प्रकरणातील आरोपींची मागणी



**छत्रपती सं. :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात सातपैकी पाच सहआरोपींनी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांना खटल्याच्या कामाकाजा पासून हटवावे अशी मागणी करणारा अर्ज शुक्रवारी दाखल केला. निकम यांचे एका राजकीय पक्षाशी संबंध असल्याने त्यांना हटवावे असा युक्तीवाद करण्यात आला आहे.

या अर्जात या प्रकरणातील मुख्य आरोपी व माजी परळी नगरपरिषद अध्यक्ष वाल्मिक कराड तसेच सहआरोपी विष्णू चाटे यांचा समावेश नाही. या अर्जाला विरोध करताना सहाय्यक विशेष सरकारी वकील ॲड. बी. डी. कोल्हे यांनी न्यायालयाकडे अर्ज फेटाळण्याची मागणी केली. या प्रकरणाची पुढील सुनावणी २३ डिसेंबर रोजी होणार असून, त्याच दिवशी सर्व आरोपींविरोधात आरोप निश्चित होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, न्यायालयाने सहआरोपी विष्णू चाटे याचा जामीन अर्जावरचे म्हणणे ऐकून घेतले. चाटे यांच्या वकिलांनी युक्तिवाद करताना सांगितले की, पहिल्या दोन गुन्ह्यात चाटे यांचे नाव नव्हते तसेच त्यांचा कोणताही पूर्व गुन्हेगारी इतिहास नाही. ' सरकारी पक्षाने या जामीन अर्जाला तीव्र विरोध करताना चाटे यांनी अवादा ऊर्जा कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार खंडणीची मागणी केली.

# शरद पवारांच्या आमदाराचा मुलगा फोडण्यात थेट फडणवीस यांचा हात




**पुणे :** पुण्यातील अनेक बड्या नेत्यांनी आज भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला आहे. पुणे शहरातील जवळपास सर्वच विधानसभा मतदार संघातील विरोधी पक्षातील नेत्यांनी भारतीय जनता पक्षाचा झेंडा हाती घेतला आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाचं नाव आहे ते वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बापूसाहेब पठारे यांचे चिरंजीव सुरेंद्र पठारे यांचे. २०२४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये बापूसाहेब पठारे यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला होता त्यानंतर त्यांनी वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवून जिंकली सुद्धा होती. त्यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे तत्कालीन आमदार सुनील टिंगरे यांचा पराभव केला होता.

आता अवघ्या दीड वर्षांमध्येच बापूसाहेब पठारे यांचे चिरंजीव सुरेंद्र पठारे यांची पुन्हा एकदा घरवापसी झाली आहे. त्याचं कारण म्हणजे पठारे कुटुंबाने भाजप मधूनच शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. सुरेंद्र पठारे हे देवेंद्र फडणवीस यांच्या पुण्यातील यंग ब्रिगेडचे सदस्य होते. अशामध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करताना स्वतः

# भाजपचा अजितदादांना मोठा धक्का

## दोन माजी उपमहापौरांसह १७ नगरसेवकांच्या हाती 'कमळ'



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढविणार असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षामध्ये माजी नगरसेवक फोडण्यावरुन स्पर्धा सुरु झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपच्या स्थायी समितीच्या माजी अध्यक्षांसह दोन माजी नगरसेवकांना पक्षात घेतल्यानंतर आता भाजपने अजित पवारांच्या राष्ट्रवादीसह शिवसेना (ठाकरे) पक्षाला मोठा दणका दिला आहे. या पक्षातील माजी दोन उमहापौर, दोन माजी स्थायी समिती अध्यक्ष यांच्यासे, प्रभाकर वाघेरे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष प्रशांत शितोळे, उषा वाघेरे, माजी विरोधी पक्षनेते विनोद नढे, माजी नगरसेवक समीर मासूळकर, प्रसाद शेट्टी, प्रवीण भालेकर, जालिंदर शिंदे, माजी नगरसेविका आशा सूर्यवंशी, माजी महापौर महापौर मंगला कदम यांचे पुत्र कुशाग्र कदम यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

भाजपमधून शिवसेना (ठाकरे) पक्षात गेलेले माजी नगरसेवक रवी लांडगे पुन्हा स्वगृही परतले आहेत. याबरोबर शिवसेना (ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख, माजी महापौर संजोग वाघेरे, माजी नगरसेवक अमित गावडे, मिनल यादव, संजय काटे, काँग्रेसचे माजी नगरसेवक सद्गुरू कदम, सचिन सानप, सुखदेव नरळे, डॉ. सुहास कांबळे, अशोक मगर, नागेश गवळी यांनीही कमळ हाती घेतले आहे. अपक्ष माजी नगरसेवक नवनाथ जगताप यांचाही प्रवेश झाला आहे.

अजित पवार यांच्यासमोर भाजपचे कडवे आव्हान

पिंपरी-चिंचवड शहर एके काळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला होते. मात्र, २०१७ मध्ये भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसकडून सत्ता खेचून घेतली. भाजपचे तीनवरुन ७७ नगरसेवक झाले. शहरावर १५ वर्षे एकहाती राज्य करणाऱ्या पवार यांनी महापालिका निवडणुकीत भाजपसोबत युती व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यांच्या पक्षाच्या बहुतांश माजी नगरसेवकांचीही युती व्हावी अशीच भूमिका होती. परंतु, शहर भाजपने स्वबळावर लढण्याचा आग्रह कायम ठेवला.

# 'काँग्रेसमध्ये पाठिंबा नाही, काम करणे कठीण

## शिंदेसेनेत येताच महिला नेत्यांनी सगळे सांगितले



**मुंबई**- राज्यभरातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. एकीकडे ठाकरे बंधूंची युती, जागावाटप याबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत. तर महायुतीच्या बैठकांना जोर आला आहे. यातच पक्ष प्रवेश मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. काँग्रेसच्या एका महिला जिल्हाध्यक्षांनी अलीकडेच शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. यानंतर त्यांनी काँग्रेस सोडण्याचे कारण स्पष्ट केले.

नवी मुंबईतील ऐरोली विभागातील ठाकरे गटाचे माजी नगरसेवक एम. के. मढवी, विनया मढवी, करण मढवी आणि तेजश्री मढवी यांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. याचवेळी राष्ट्रीय काँग्रेसचे माजी नगरसेवक मिथुन पाटील, अमित पाटील आणि काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा पूनम मिथुन पाटील यांनीही शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश करत भगवा झेंडा हाती घेतला. पूनम पाटील यांच्या शिंदे गटातील प्रवेशावरून काँग्रेसच्या नवनिर्वाचित जिल्हाध्यक्षांनी टीका केली होती. या टीकेला पूनम पाटील यांनी उत्तर दिले.

**अनेक अडचणींचा सामना करावा लागला**

काँग्रेस पक्षात असताना पक्षश्रेष्ठींकडून अपेक्षित पाठिंबा मिळत नसल्याने काम करणे कठीण जात होते, असे काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या व शिंदे गटात प्रवेश केलेल्या माजी जिल्हाध्यक्षा पूनम पाटील यांनी म्हटले आहे. तसेच काँग्रेस पक्षात काम करत असताना संघटनात्मक पातळीवर अनेक अडचणींचा सामना करावा लागला. पक्षश्रेष्ठींकडून वेळेवर मार्गदर्शन आणि पाठिंबा न मिळाल्यामुळे जनतेसाठी अपेक्षित काम करता येत नव्हते. कोणत्याही वैयक्तिक स्वार्थासाठी पक्ष बदललेला नाही. जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडता यावेत आणि विकासकामांना गती मिळावी, या उद्देशाने शिंदे गटात प्रवेश केला, असे पूनम पाटील यांनी स्पष्ट केले. काँग्रेस नेते व नवनिर्वाचित काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आबा दळवी यांनी पूनम पाटील यांनी वैयक्तिक स्वार्थासाठी शिवसेनेत प्रवेश केल्याचा आरोप केल्यानंतर त्यावर प्रत्युत्तर देताना पूनम

# शिवसेनेची समन्वय समिती, भाजपशी मात्र अबोलाच

## समन्वयाच्या बैठकीचा पत्ताच नाही

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिका निवडणुकांसाठी भाजपसोबत जागा वाटपाची चर्चा करण्यासाठी अखेर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने पक्षाची समन्वय समिती जाहीर केली. ही समिती जागा वाटपासोबत पक्षाचे उमेदवार, जाहीरनामा, रणनिती आखणीवरही चर्चा करेल असे ठरविण्यात आले आहे. शिंदे यांच्या शिवसेनेने गुरुवारी सकाळी ही समिती जाहीर केल्यानंतरही भाजपबरोबर मात्र अजूनही चर्चेचा मुहूर्त ठरलेला नाही. हा अबोला मोडण्यासाठी नेमका कोणामार्फत पुढाकार घेतला जाईल, याविषयी देखील अजूनही दोन्ही पक्षांमध्ये स्पष्टता नाही.

महापालिका निवडणुकांची तारीख निश्चित झाल्यामुळे आता सर्वच राजकीय पक्षांकडून वेगाने हालचाली सुरू झाल्या आहेत. सर्वच राजकीय पक्षांनी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज भरून घेण्यासह त्यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम सुरू केला आहे. अशातच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने नवी मुंबई पालिका निवडणुकीसाठी समन्वय समिती स्थापन केली आहे. एकनाथ शिंदेच्या शिवसेनेत नुकताच ठाकरे गटाच्या तीन तर काँग्रेसच्या दोन अशा एकूण पाच माजी नगरसेवकांचा पक्षप्रवेश झाला. या प्रवेशानंतर येत्या २१ तारखेला ऐरोली येथे एकनाथ शिंदे पक्षाचा मेळावा घेणार आहेत. भाजपबरोबर युती करायची की नाही याविषयी अजूनही नवी मुंबईत स्पष्टता नसल्याने शिंदे यांच्या उपस्थित होणाऱ्या या मेळाव्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान महानगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने भाजपबरोबर चर्चा करण्यासाठी समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे.

अबोला कोणी मोडायचा? प्रश्न कायम

शिंदे यांच्या शिवसेनेकडून समितीची स्थापना करण्यात आली असली तरी नवी मुंबईतील भाजप नेत्यांसोबत अजूनही कोणत्याच प्रकारचा संवाद सुरू झालेला नाही अशी माहिती सूत्रांनी दिली. भाजपने अशी समिती स्थापन केली आहे किंवा कसे याबाबतही स्पष्टता नाही. दोन्ही पक्षांतील अबोला कोणी मोडायचा असा प्रश्न कायम असल्याचे शिंदे शिवसेनेतील सूत्रांनी सांगितले.

दरम्यान भाजपने नवी मुंबई निवडणूकीची सूत्रे माजी खासदार संजीव नाईक यांच्याकडे सोपवली आहेत. नाईक आणि शिंदेसेनेतील नेत्यांमधील विळ्या भोपळ्याचे नाते पहाता या बैठकांना कधी मुहूर्त मिळेल याविषयी स्पष्टता नसल्याचे भाजपमधील एका नेत्याने सांगितले.

# महायुतीत शिंदेसेना -भाजपा यांच्यात रस्सीखेच



मुंबई - येत्या मुंबई महापालिका निवडणुकीसाठी महायुतीत शिंदेसेना आणि भाजपा यांच्यात रस्सीखेच सुरू आहे. या दोन्ही पक्षांमध्ये आतापर्यंत २ संयुक्त बैठका पार पडल्यात. या बैठकांमध्ये अजित पवारांची राष्ट्रवादी कुठेही नव्हती. नवाब मलिकांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीसोबत युती करणार नाही अशी भूमिका भाजपाने घेतली होती. परंतु शिंदेसेनेसोबत जागावाटपाचा तिढा सुटत नसताना दुसरीकडे राष्ट्रवादी आणि भाजपा नेत्यांमध्ये वरिष्ठ पातळीवर बैठक होणार असल्याचं समोर आले आहे. शुक्रवारी रात्री राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यात मुंबई महापालिकेतील निवडणुकीवर चर्चा झाली.

मुख्यमंत्र्यांच्या या भेटीनंतर सुनील तटकरे आणि भाजपाचे मुंबई निवडणूक प्रभारी मंत्री आशिष शेलार यांच्यातही बैठक झाली. या दोघांमध्ये २०-२५ मिनिटे चर्चा करण्यात आली. महायुती म्हणून महापालिका निवडणुकीला सामोरे गेले पाहिजे अशी तटकरेंनी भूमिका मांडली. गेल्याच आठवड्यात पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेत बीएमसीसह इतर महापालिकांमध्ये महायुतीने लढले पाहिजे, त्यात राष्ट्रवादीचा सहभाग असावा अशी चर्चा केली होती अशीही माहिती तटकरेंनी दिली.

**नवाब मलिका मुद्दा मागे पडला...**

मुंबई महापालिका निवडणुकीसह इतर महापालिकांमधील महायुतीच्या चर्चेसाठी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे वरिष्ठ पातळीवर चर्चा करत आहेत. त्यात राष्ट्रवादीने मुंबईत ५० जागांचा प्रस्ताव भाजपासमोर ठेवल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे. आशिष शेलार हे मुंबई भाजपाचे निवडणूक प्रभारी आहे. त्यांच्यासोबत सुनील तटकरे यांची जागावाटपावर चर्चा होत आहे. त्यामुळे नवाब मलिकांचा मुद्दा मागे पडून महायुतीत ट्विस्ट आल्याचे चित्र दिसून येत आहे.

**शिंदेसेनेला 'त्या' ८४ जागा देण्यास भाजपाचा नकार**

२०१७ च्या निवडणुकीत भाजपाने जिंकलेल्या सर्व ८२ जागांवर भाजपाने दावा केला असून शिवसेनेने मिळविलेल्या ८४ जागा देण्यास भाजपाने स्पष्ट नकार दिल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. भाजपाने पहिल्या बैठकीत शिंदेसेनेला केवळ ५२ जागांची ऑफर दिली होती. मात्र शिंदेसेनेने गेल्या निवडणुकीतील ८४ जागा आणि अतिरिक्त जागांसह एकूण १२५ जागांची मागणी केली. एकूण १५७ जागांचा निर्णय झाला. अद्याप सुमारे ७० जागांवर तिढा कायम आहे. त्यातच भाजपा आणि राष्ट्रवादीच्या स्वतंत्र बैठकीमुळे शिंदेसेनेला महायुतीत डच्चू मिळणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# संक्षिप्त

## रत्नागिरीच्या ओंकार कोळेकर यांचा 'वंदे मातरम् लोगो' राज्यात दुसरा



**रत्नागिरी :** 'वंदे मातरम' या राष्ट्रगीताच्या रचनेला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय लोगो डिझाईन स्पर्धेत रत्नागिरीच्या ओंकार अनंत कोळेकर यांनी खुल्या गटातून द्वितीय क्रमांक पटकावला आहे.मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून शालेय, महाविद्यालयीन व खुला अशा तीन गटांमध्ये स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कला, संस्कृती व राष्ट्रभक्तीचा संगम दर्शवणाऱ्या संकल्पनांना या स्पर्धेत प्राधान्य देण्यात आले. स्पर्धेतील लोगोचे परीक्षण मुंबईतील सुप्रसिद्ध सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या प्राध्यापकांनी केले.निवड करण्यात आलेल्या लोगोचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमाला राज्यातील विविध मान्यवर, वरिष्ठ अधिकारी तसेच कला व डिझाईन क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.ओंकार अनंत कोळेकर हे रत्नागिरीतील रहिवासी असून, त्यांनी चित्रपट निर्मितीचे शिक्षण घेतले आहे. त्यानंतर त्यांनी जिओ स्टुडिओमध्ये काही काळ सिनेमॅटोग्राफर म्हणून काम करत प्रत्यक्ष माध्यम क्षेत्राचा अनुभव मिळवला. सध्या ते मुंबई विद्यापीठातून मास मीडियाचे शिक्षण घेत असून, माध्यम, डिझाईन व सर्जनशील अभिव्यक्ती या क्षेत्रातील आपली शैक्षणिक व व्यावसायिक कौशल्ये याचा अभ्यास करत आहेत. राज्यभरातील हजारो स्पर्धकांमधून ओंकार यांनी मिळवलेल्या यशाबद्दल सर्वस्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

## मंगल कार्यालये व लॉन्ससाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे एनओसी बंधनकारक



**पुणे :** शहरातील मंगल कार्यालये, सभागृह आणि लॉन्सना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक आहे. असे असूनही हे प्रमाणपत्र घेण्यास टाळाटाळ केली जात असल्याने प्रमाणपत्र न घेणाऱ्या २७२ आस्थापनांना मंडळाने नोटिसा बजावल्या. यानंतर आता महापालिकेने मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्सना नवीन परवाना अथवा परवाना नूतनीकरणासाठी मंडळाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची सक्ती केली आहे.पुण्यातील मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्समध्ये होणाऱ्या विवाहांमुळे ध्वनिप्रदूषणासह इतर प्रकारचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत होते. याची दखल घेऊन राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला यावर कार्यवाही करण्याचे निर्देश २०१५ मध्ये दिले होते. मंडळाने या प्रकरणी समिती स्थापन करून मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्ससाठी नियमावली तयार केली. या नियमावलीनुसार त्यांना मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले. त्यानंतर मंडळाने महापालिकेकडून नोंदणीकृत मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्सची यादी मागविली. त्यावर महापालिकेने १२ मार्च २०२४ रोजी सर्व आस्थापनांची यादी दिली.

## 'सनबर्न महोत्सवा'तील मद्य परवानगीवर उच्च न्यायालयाचे प्रश्नचिन्ह

**मुंबई** : मुंबईत शुक्रवारपासून सुरू झालेल्या सनबर्न महोत्सवात मद्यविक्रीस राज्य सरकारने दिलेल्या परवानगीवर उच्च न्यायालयाने शुक्रवारी प्रश्न उपस्थित केला. तसेच, अशा महोत्सवांतील मद्य परवाना धोरणावर पुनर्विचार करण्याची सूचना सरकारला केली.स्थानिक रहिवाशी चिंतामणी सारंग यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवरील सुनावणीच्या वेळी मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने महोत्सव थांबवण्याबाबत कोणताही आदेश दिला नाही. परंतु, अशा महोत्सवांमध्ये राज्य सरकार अशाप्रकारे मद्य परवाने देऊ शकत नाही, आम्ही यासंदर्भात काही नियम निश्चित करू, असे अधोरेखीत करून न्यायालयाने याचिका प्रलंबित ठेवली.तत्पूर्वी, या महोत्सवादरम्यान राज्य सरकार कायदा-सुव्यवस्थेची घडी राखेल, असे आश्वासन सरकारच्या वतीने महाधिवक्ता मिलिंद साठे यांनी न्यायालयाला दिले.

## मुंबईकरांचा उद्या खोळंबा!

**मुंबई :** मुंबईच्या तीनही उपनगरी रेल्वेमार्गांवर रविवारी देखभाल-दुरुस्तीसाठी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे रविवारी तीनही मार्गांवरील उपनगरीय गाड्यांची वाहतूक नियोजित वेळापत्रकापेक्षा १५ ते २० मिनिटे उशिराने होणार आहे.मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर ठाणे-कल्याण या दरम्यान पाचव्या व सहाव्या मार्गिकेवर सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत देखभाल-दुरुस्तीचे काम चालणार आहे. या दरम्यान या मार्गावरून धावणाऱ्या अप आणि डाउन लांब पल्ल्याच्या गाड्या उपनगरीय मार्गाच्या जलद मार्गिकांवरून धावणार आहेत . त्यामुळे जलद तसेच धीम्या उपनगरीय लोकल गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होणार आहे . या मार्गावरील गाड्या नियोजित वेळेपेक्षा १५ ते २० मिनिटे उशिराने धावतील.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## 'एकला चलो रे'

**प**क्षाच्या विचारधारेवर आणि नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेऊन पक्षासाठी समर्पितपणे काम करणारा मोठा वर्ग आजही काँग्रेसमध्ये आहे. त्याला काँग्रेसमधील 'निष्ठावंत' असे म्हणतात. महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यातील अशा निष्ठावंत घराण्यांना म्हणूनच राजकीय वर्तुळात किंमत होती. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याचा उल्लेख झाला, की काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री, माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचे घराणे डोळ्यांसमोर येते. एकेकाळचा काँग्रेसचा नांदेडचा गड आता भाजपचे सत्ताकेंद्र म्हणून ओळखला जात आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण आणि त्यांची मुलगी श्रीजया चव्हाण यांनी नांदेडच्या गडावर कमळ फुलविले आहे. खासदारकी आणि आमदारकी पिता-पुत्रीकडे असल्याने काँग्रेसच्या 'हाता'ला आधार देण्यासाठी नवे नेतृत्व शोधण्याची वेळ काँग्रेसवर आली. माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्नुषा अर्चना पाटील यांनी एक वर्षापूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला; मराठवाड्यातीलच हिंगोली जिल्ह्यातील काँग्रेसचे एकनिष्ठ घराणे म्हणून सातव घराणे परिचित होते. विधान परिषदेच्या काँग्रेसच्या आमदार प्रज्ञा सातव यांनी आमदारकीचा राजीनामा देऊन थेट भाजपमध्ये प्रवेश केला. सातव यांनी दिलेल्या राजीनाम्यानंतर काँग्रेस पक्षामध्ये किती अस्वस्थता पसरली, हे लपून राहिले नाही. 'निष्ठावंत' प्रज्ञा सातव यांनी भाजप प्रवेशानंतर दिलेली प्रतिक्रियाही बोलकी आहे. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जो विकासाचा रथ सुरू आहे त्यामुळे विकासासाठी भाजपशिवाय पर्याय नाही,'असे त्यांनी म्हटल्याने काँग्रेसच्या निष्ठावंत घराण्यातील व्यक्तींनाही यापुढे देशात भाजपशिवाय भवितव्य नाही, असे वाटू लागले हे निश्चितच. त्यातून सर्वसामान्य तळागाळातील काँग्रेस कार्यकर्ता नक्कीच बिथरला असणार, हे अर्थातच नव्याने सांगायला नको.देशपातळीवर देशातील सर्वात जुना पक्ष असलेल्या काँग्रेसला स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीनंतर विरोधी पक्ष टिकविण्यात यश आले असले, तरी पुढील १० वर्षांत काँग्रेस सत्तेवर येईल का, याची चिंता काँग्रेसच्या दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्वच नेत्यांना सतत सतावत असते. २०१४ आणि २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला साधा विरोधी पक्ष नेतेपदावर दावा करता येईल, एवढे संख्याबळ मिळवता आले नाही. तेव्हापासूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेमुळे 'काँग्रेसमुक्त भारत' होण्याची प्रकिया सुरू झालेली दिसते. त्यात वैचारिक भूमिकेत संभ्रम असल्याने बहुसंख्य हिंदू मतदार काँग्रेसपासून दुरावला. अयोध्येतील रामजन्मभूमी मंदिराच्या सोहळ्यापासून काँग्रेसने स्वत:ला वेगळे करण्याचा प्रयत्न केल्याचा फटका काँग्रेसला बसला. या सोहळ्याला हजेरी लावली, तर मुस्लीम वर्ग नाराज होईल, अशी गणिते काँग्रेसचे धुरंधर मांडत राहिले. रामजन्मभूमीचा कडवा विरोध करूनच आपण सत्तेवर येऊ शकतो, असे काँग्रेसच्या धुरिणांना वाटले. म्हणून त्यांनी न्यायालयाचे खटले कसे दीर्घकाळ चालतील, ते बघितले. न्यायालयामध्ये रामाच्या अस्तित्वावरच शंका उपस्थित केल्या. मंदिर बाबराने पाडले, याला ऐतिहासिक पुरावा नाही, असा युक्तिवाद केला. सर्वोच्च न्यायालयात दहा-बारा वकिलांची फौज उभी केली आणि सोनिया गांधी जेव्हा काँग्रेसच्या सर्वेसर्वा झाल्या, त्यावेळी त्यांनी 'बाबरी ढाचा' पडल्याबद्दल मुसलमान समाजाची माफीसुद्धा मागितली; परंतु १९९२ नंतर एवढी सगळी मुस्लीमधार्जिणी भूमिका घेऊनही काँग्रेसला लोकसभेत निर्विवाद बहुमत मिळविता आले नाही, हे वास्तव आहे. काँग्रेसची हक्काची मुस्लीम मते वेगवेगळ्या प्रादेशिक पक्षांत विभागली गेली. दिल्लीत केजरीवाल, उत्तर प्रदेशात मायावती आणि अखिलेश यादव, बिहारमध्ये नितीश कुमार, बंगालमध्ये ममता बॅनर्जी आदी मुस्लीम मतांचे ठेकेदार बनले. तरीही काँग्रेस पक्षाला मुस्लीम मते आपल्यापासून दूर जाऊ नये असे वाटते. दलित, मुस्लीम मतांच्या राजकारणामुळे राज्यातील महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाने मुंबईसह प्रमुख महापालिका निवडणुकीत स्वबळाचा नारा दिला आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत स्वतंत्र लढण्याचा निर्धार काँग्रेसच्या मुंबई अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केला आहे. उबाठा सेना आणि मनसे एकत्र आल्यामुळे त्यांच्यासोबत आपल्याला जाता येणार नाही, असे पोकळ कारण दिले असले, तरी मुस्लीम व्होट बँक भविष्यात आपल्या हातून जाऊ नये ही काँग्रेसची भीती आहे. जात, धर्म यांच्यात द्वेष निर्माण करणाऱ्या पक्षांबरोबर आपण जाणार नाही, असे सांगणाऱ्या मुंबई काँग्रेसने उबाठा सेनेसोबत महाराष्ट्राच्या सत्तेत येण्यासाठी कशी तडजोड केली, हे सांगत नाहीत. काँग्रेसमध्ये आता 'राम' राहिलेला नाही, याची खात्री पटल्यामुळेच मुंबई शहरातील काँग्रेसच्या निष्ठावंतापैकी एक असलेल्या मुरली देवरा यांच्या घराण्याने काँग्रेसपासून फारकत घेतली. २० वर्षांपेक्षा अधिक काळ मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष असलेल्या मुरली देवरा यांचा मुलगा मिलिंद देवरा यांनी महायुतीतील मित्रपक्षात प्रवेश केला ते सध्या राज्यसभेचे खासदार आहेत. वांद्रे येथे एक वर्षापूर्वी ज्यांची हत्या झाली ते बाबा सिद्दिकी हे काँग्रेसच्या निष्ठावंत पदाधिकाऱ्यांपैकी एक मानले जात होते. त्यांनीसुद्धा काँग्रेसला सोडण्याचा निर्णय घेतला होता. मुंबई महापालिकेतील अभ्यासू नगरसेवक रवी राजा यांच्यासह चार नगरसेवकांनी काँग्रेसला सोडून भाजपमध्ये आधीच प्रवेश केला आहे. पक्षातील निष्ठावंत एकामागोमाग भाजप आणि अन्य पक्षात प्रवेश करत असताना मुस्लीम आणि दलित मतदार आपल्या पाठिशी आहे, असा भाबडा समज करून काँग्रेसचा 'एकला चलो रे'चा नारा कितपत योग्य आहे, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. त्यासाठी महापालिका निवडणुकींच्या निकालाची प्रतीक्षा करावी लागेल.

# विदर्भात चार महानगरपालिका निवडणुकांत रणधुमाळी



**सध्या चारही महानगरपालिकांमध्ये युती किंवा आघाडी कशी होणार यावरच खल सुरू आहे. त्याचबरोबर उमेदवार निवडीसाठी वेगात हालचाली सुरू असलेल्या दिसून येत आहेत. चारही पालिकांमधील प्रमुख नेते आता कामाला लागलेले दिसत आहेत.**

**म**हाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका होणार असून या २९ महानगरपालिकांमध्ये विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, अमरावती आणि अकोला या चार महानगरपालिका समावेश आहे. त्यामुळे आता विदर्भातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापायला सुरुवात झालेली आहे. या चार महानगरपालिकांमध्ये नागपूर महानगरपालिका सर्वात जुनी महानगरपालिका आहे. इथे १५१ वॉर्ड असून आता ते ३८ प्रभागांमध्ये विभागले गेले आहेत. नागपुरात २०१७ मध्ये भाजप पक्षाची सत्ता होती. त्याआधी देखील २०१२ आणि २००७ मध्ये भाजपचीच सत्ता नागपुरात आली होती. मात्र या वेळी त्यांना कुणाशी तरी युती करून सत्ता मिळवावी लागली होती. २०१७ मध्ये मात्र भाजपला १०८ जागांवर घसघशीत बहुमत मिळाले होते. यावेळी तेच बहुमत कायम ठेवण्याचे आव्हान भाजप समोर राहणार आहे. नागपुरात एकूण २४.८२ लाख मतदार मतदान करणार असून त्यात १२ लाख २६ हजार पुरुष, तर १२ लाख ५६ हजार महिला आणि इतर २५६ अशी संख्या राहणार आहे. नागपूर महापालिकेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रतिष्ठा पणाला लागणार आहेत.

अमरावती महानगरपालिकेत ८७ जागांसाठी निवडणूक होणार असून या जागा २२ प्रभागांमध्ये विभागल्या गेलेल्या आहेत. इथे जवळपास ६.५० लाख मतदान आपला हक्क बजावणार आहेत. चंद्रपूर महानगरपालिकेत १७ प्रभाग असून निवडून द्यावयाच्या नगरसेवकांची संख्या ६६ इतकी आहे. एकूण मतदार २ लाख ९९ हजार ९४४ इतके आहेत. यात १ लाख ४१ हजार ६०९ पुरुष, १ लाख ५० हजार ३५४ महिला आणि अन्य ३१ जणांचा समावेश राहणार आहे. इथे सुधीर मुनगंटीवार, विजय वडेट्टीवार आणि प्रतिभा धानोरकर यांच्या प्रतिष्ठेचा फैसला होणार आहे. अकोला महानगरपालिकेत ८० जागा असून त्या २० प्रभागांमध्ये विभागल्या गेल्या आहेत. इथे ५ लाख ५० हजार ६० मतदार असून यात २ लाख ७४ हजार ८७७ पुरुष, तर २ लाख ७५ हजार १४१ महिला मतदारांचा समावेश आहे.

विदर्भाचा राजकीय आलेख बघितल्यास इथे भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस या दोन पक्षांचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. बाकी शिवसेनेला इथे फारसे अस्तित्व नाही. तीच अवस्था शिवसेना ठाकरे गटाची देखील आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट तर अक्षरशः दिवा घेऊनच शोधावे लागतात. अजित पवार गटाची देखील अवस्था तशीच आहे. त्यामुळे इथे खरी लढत काँग्रेस आणि भाजप या दोन पक्षांतच होईल असे चित्र दिसते आहे. इथे नागपुरात २०१७ मध्ये भाजपने १५१ पैकी १०८ जागांवर विजय मिळवला होता, तर अमरावतीत ८७ पैकी ४५ जागांवर विजय मिळवून सत्ता काबीज केली होती. अकोल्यात देखील २०१७ मध्ये ८९ पैकी ४८ जागा मिळवून भाजपने सत्ता आपल्याकडे खेचून आणली होती. चंद्रपुरात २०१७ मध्ये भाजपने ३६ जागा मिळवून सत्ता राखली होती. हे बघता या चारही महानगरपालिकांमध्ये भाजपचेच वर्चस्व स्पष्ट दिसते आहे. हे वर्चस्व कायम राखण्यासाठी आता भाजपचे सर्वच दिग्गज आपली प्रतिष्ठा पणाला लावणार आहेत. तर काँग्रेस पक्षाचे सर्व दिग्गज भाजपला पराभूत कसे करता येईल यासाठी प्रयत्नशील राहणार आहेत.

यावेळी नागपुरात भाजपच्या नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, मोहन मते, प्रवीण दाटके, कृष्णा खोपडे आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे या सर्व हेवीवेट नेत्यांसमोर काँग्रेसचे शहर अध्यक्ष आमदार विकास ठाकरे आणि उत्तर नागपूरचे आमदार डॉ. नितीन राऊत हे दोघे दंड थोपटून उभे राहणार आहेत. नागपुरात शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट हे दोन्हीही आपली फारशी ताकद नसताना देखील मित्रपक्ष भाजपला अडवून जास्तीत जास्त जागा कशा पदरात पाडून घेता येतील या दृष्टीने प्रयत्नशील आहेत. बाकी वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पार्टी, भारिप बहुजन महासंघ तसेच शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट यांचे फारसे अस्तित्व या निवडणुकीत जाणवणार नाही, हे आजचे चित्र आहे.

चंद्रपुरात आधी भाजपचीच सत्ता असल्यामुळे ती टिकवण्याचे भाजप समोर आव्हान राहणार आहे. भाजपची सर्वच सूत्रे माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, हंसराज अहिर आणि जोरगेवार यांच्याच हातात राहणार असली तरीही एकूणच उमेदवार निश्चितीमध्ये मुनगंटीवारांचे वर्चस्व राहील असे आज तरी जाणवते आहे. मुनगंटीवारांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत विकास कामांसाठी प्रचंड संघर्ष केलेला आहे. त्यामुळे जनमत त्यांच्या बाजूने वळलेले आहे. त्यातच ते मंत्री असताना त्यांनी चंद्रपुरात दारूबंदी घडवून आणली होती. त्यामुळे महिलावर्ग त्यांच्या बाजूने उभा राहील असे चित्र दिसते आहे. काँग्रेसमध्ये विजय वडेट्टीवार हे आज सर्वेसर्वा असल्याचे जाणवत असले तरी माजी खासदार नरेश फुगली पुगलिया हे देखील सक्रिय झाले आहेत. प्रसंगी ते वेगळी आघाडी करून निवडणुका लढवतील असेही चित्र आहे. प्रतिभा धानोरकर यांचाही रोल इथे महत्त्वाचा राहील असे बोलले जाते आहे.

अमरावतीत भाजप समोर सत्ता टिकवण्याचे आव्हान तर आहेच, पण त्याचवेळी मित्र पक्षांना सोबत घेऊन चालायचे की स्वबळावर लढायचे यावरच खल चालू असलेला दिसतो आहे. स्थानिक कार्यकर्त्यांचा मित्र पक्षांना सोबत घेण्यास विरोध आहे. अमरावती हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आजोळ आहे. त्यामुळे भाजपमध्ये त्यांचाही शब्द अंतिम ठरणार आहे. इथे भाजपच्या उमेदवार मुलाखती देखील आटोपलेल्या असून काँग्रेसची सध्या उमेदवारांची चाचणी सुरू आहे. अमरावतीत आमदार रवी राणा आणि माजी आमदार बच्चू कडू यांचा फॅक्टर देखील महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तसेच काही काळ काँग्रेसमध्ये, काही काळ भाजपमध्ये आणि आता पुन्हा काँग्रेसमध्ये अशी भटकंती करणारे माजी राज्यमंत्री सुनील देशमुख यांचे महापालिकेत वर्चस्व असल्यामुळे ते देखील कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष आहे.

अकोल्यात जरी भाजपची सत्ता असली तरीही त्यांच्यासमोर वंचित बहुजन आघाडीचे असलेले आव्हान दुर्लक्षित येत नाही. इथे प्रकाश आंबेडकरांचे बऱ्यापैकी वर्चस्व राहिलेले आहे. अर्थात त्याचा जोर ग्रामीण भागात असला तरीही शहरी भागात त्यांचा प्रभाव निश्चित आहे. इथे काँग्रेसची देखील चाचपणी सुरू असल्याचे जाणवते आहे. भाजपमध्ये इथे देखील कार्यकर्त्यांची स्वबळावर निवडणूक लढवली जावी हीच इच्छा आहे. मात्र तसे झाले तर मत विभाजन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान २० डिसेंबर रोजी नगर परिषदांचे उर्वरित मतदान होणार असून २१ डिसेंबर रोजी महाराष्ट्रातील सर्व नगर परिषदांचे निकाल जाहीर होणार आहेत. यात मतदारांचा कौल कुणीकडे झुकलेला दिसतो ते बघून या चारही महापालिकांमध्ये मतदार आपली मते निश्चिती करतील असे बोलले जात आहे. एकूणच या चारही नगर परिषदांमध्ये निवडणुका रंगतदार होतील असे बोलले जात आहे. सध्या चारही महानगरपालिकांमध्ये युती किंवा आघाडी कशी होणार यावरच खल सुरू असलेले दिसत आहेत. त्याचबरोबर उमेदवार निवडीसाठी वेगात हालचाली सुरू असलेल्या दिसून येत आहेत. चारही महानगरपालिकांमधील प्रमुख नेते आता कामाला लागलेले दिसत असून पक्षश्रेष्ठ त्यांच्यावर लक्ष ठेवून असल्याचेही जाणवते आहे. एकदा उमेदवार निश्चिती झाली की मग प्रचाराला रंग चढणार आहे.

इथे प्रचारात स्थानिक नेत्यांसोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, प्रतापराव जाधव, राज्यातील मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पंकज भोयर, संजय राठोड, आशीष जयस्वाल यांच्यासह काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष चैनसुख संचेती, काँग्रेसचे नितीन राऊत, नाना पटोले, विजय वडेट्टीवार हे सर्वच सक्रिय झालेले दिसतील. याशिवाय आणखी कोणकोण स्टार प्रचारक सक्रिय होणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

**- अविनाश पाठक**

# अन् तमिळनाडूतील दीप उत्सवास विरोध

**मुं**बई महापालिकेची निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे.त्यामुळे काही राजकीय पक्ष केवळ राजकीय फायदासाठी मुंबईच्या सुरक्षाकडे दुर्लक्ष करून मुस्लीम समाजाला खुश करण्याची खोळी खोळत आहेत.त्यांच्या मध्ये मुस्लीम समाजाचा अनुनय आणि लागूंलचालन करण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. या स्पर्धेमध्ये उद्धव ठाकरे यांची शिवसेना सुद्धा मागे नाही.तामिळनाडूतील हिंदू मंदिरामधील पारंपरिक दीपउत्सवाच्या न्यायालयीन निकालावर त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहे.या भुमिकेमुळे शिवसेना उबाठा गटाचा हिंदुत्व विरोधी चेहरा पुन्हा उघड झालेला दिसत आहे.उबाठा शिवसेना गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी न्या. स्वामीनाथन यांच्या विरोधातील महाअभियोग पत्रावर स्वाक्षरी करून आपली हिंदुत्व विरोधी भूमिका प्रदर्शित केली आहे.पण त्यास वेळेस भाजपा मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी यांनी उबाठा शिवसेनेचा हिंदुत्व विरोधी मुखवटा मुंबईकरांच्या समोर आणून प्रखर शब्दात निषेध आणि विरोध करून त्यांचे वाभाडे काढले आहे.सोबतच तामिळनाडू मधील हिंदू मंदिरातील दीप उत्सव परंपरेचा विरोध आपल्या मुंबईचा महाराष्ट्रातील खासदार का करतो ?असा सवाल उपस्थित केला आहे तसेच भविष्यात तामिळनाडू प्रमाणे मुंबईमध्ये हिंदू समाजाच्या प्रथा परंपरावर मुस्लिमांनी आक्षेप घेतल्यास हिंदू प्रथा परंपराचा विरोध केला जाईल तर नाही?अशी चर्चा मुंबईकर करीत आहेत.

मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश जस्टिस जी.आर. स्वामीनाथन यांच्या विरुद्ध महाभियोग प्रस्ताव का आणला गेला याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्या एका न्यायिक निर्णयात त्यांनी तामिळनाडू मधील तिरुप्परनकुंद्रमच्या पहाडावरील हिंदू मंदिरावर कार्तिक महिन्यात पारंपारीक दीप (दिवा) लावण्याची प्रथा आहे.मंदिर शेजारी मुस्लीम समाजाचे प्रार्थनास्थळ असल्याने स्टॅलिन सरकारने दीप उत्सवास परवानगी दिली नाही,मज्जाव केला.प्रकरण न्यायप्रविष्ट झाले आणि न्या.स्वामीनाथन यांनी दीप उत्सव साजरा करण्याचा निर्णय दिला आहे.मुस्लीम धार्मिक स्थळाजवळ असलेल्या मंदिरावर पारंपरिक दिवा लावण्याच्या निर्णयामुळे



तामिळनाडू मध्ये धार्मिक संवेदनशीलता आणि राज्य सरकार सोबत तणाव निर्माण झाला असल्याचा कांगावा आणि निरर्थक मुद्दा पुढे करण्यात आला व त्याचे पडसाद संसदमध्ये उमटले. शंभरच्यावर खासदारांनी संसदेत न्या.स्वामिनाथन यांचा विरोधातील महाभियोग प्रस्तावर स्वाक्षरी करून प्रस्ताव लोकसभा अध्यक्षांकडे सादर केला आहे.

तामिळनाडूच्या घटनेमध्ये न्या. स्वामीनाथन यांच्या विरुद्ध सादर झालेल्या महाभियोग प्रस्ताव मध्ये मुंबई मधील खासदारानी हिंदुत्व विरोधी भूमिका घेण्याची काय आवश्यकता आहे?असा प्रश्न मुंबईकर उपस्थित करत असून मुंबईच्या खासदाराने तीच भूमिका जम्मू काश्मीर मधील 'हजरतबल दरगाह' मध्ये राष्ट्रीय प्रतीक असलेल्या अशोक स्तंभाची नासधूस प्रकरणी का घेतली नव्हती. तेव्हा त्या घटनेचा विरोध का केला नाही? तेव्हां त्यांनी आपलं तोंड का उघडलं नव्हते? दिनांक ३ सप्टेंबर २०२५ ला रोजी श्रीनगरच्या हजरतबल दरगाह परिसरात वक्फ बोर्डाच्या शिलालेखावर राष्ट्रीय प्रतिक असलेल्या अशोक स्तंभाची शिला अंकित होती.ईद-ए-मिलादच्या दिवशी अशोक स्तंभ चिन्ह असलेल्या शिलालेखावर काही लोकांनी दगडांनी मारा करून तोडफोड केली. त्यावेळेस मुंबई सहा संपूर्ण देशा मधून राष्ट्रीय प्रतिक असलेल्या अशोक चिन्हाच्या अपमान प्रकरणी तीव्र प्रतिक्रिया येणे अपेक्षित होते. पण, संविधान बचावासाठी रात्रदिवस गळा काढणाऱ्या पाखंडी टोळ्याचा आवाज कुठेच निघाला नाही.सर्व मूग गिळून गप्प बसले होते.देशात संविधान आणि कायद्याचे राज्य असल्यामुळे वक्फ बोर्डाच्या शिलालेख वरील राष्ट्रीय प्रतिकाची तोडफोड दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई होईलच,परंतू संविधान प्रत हातामध्ये घेऊन फिरणारे नेते मंडळी गप्प का होते?देशातील एखादा घटनेचा निषेध किंवा विरोध व्यक्त करण्याचा किंवा मोर्चे काढण्याचा अधिकार प्रत्येक माणसाला संविधानाने दिलेला आहे. परंतू राजकीय फायदासाठी दुटप्पीपणा करणे कितपत योग्य आहे?

श्रीनगर मधील हजरत बल दर्गा मध्ये राष्ट्रीय प्रतिक अशोक स्तंभाचा अपमान प्रकरणी महाराष्ट्रातील कोणीत्याही खासदाराने साधा निषेध व्यक्त केलेला नव्हता मात्र तामिळनाडू घटनामध्ये हिंदू विरोधी भूमिका घेऊन न्या.स्वामीनाथन यांच्या विरोधात घेतलेल्या महाअभियोग प्रस्तावर स्वाक्षरी करणे म्हणजे सरळ सरळ मुस्लीम समाजाचे लांगुलचालन करणे होय.

**अशोक राणे**
मो.९४२३६५८३८५

# एआयची दुहेरी भूमिका

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआयमुळे नोक-यांवर गदा येत असल्याचे अनेक रिपोर्ट्समधून समोर आले आहे. एआयमुळे अनेक कामे स्वयंचलित होत आहेत. त्यामुळे तरुणांना भविष्याचा प्रश्न सतावत आहे. एआयच्या मदतीने अत्यंत क्लिष्ट कामही आता शक्य झाल्याचे पाहायला मिळत आहे. एआय आता थेट विचारपूर्वक केल्या जाणा-या आणि विश्लेषणाशी संबंधित कामांना आवाहन देत आहे, त्यामुळे कार्यालयांमध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या नोक-यांवर सर्वात मोठा धोका निर्माण झाला आहे.

सध्याचे युग डिजिटलचे आहे. प्रत्येक गोष्ट ऑनलाईन होत आहे. या डिजिटल युगाचे जितके फायदे आहेत. त्यापेक्षा अधिक तोटे सहन करावे लागत आहेत. त्यातच बदलत्या तंत्रज्ञानाने अनेकांच्या जीवाला घोर लावला आहे. अनेकांच्या नोक-यांवर गदा येण्याची भीती आहे. येत्या ५ ते ६ वर्षांत एआय या नोक-या गिळंकृत करण्याची भीती आहे. कोणती आहेत ही क्षेत्र? तुम्ही जर त्यात काम करत असाल तर हे भाकीत समजून घेऊन पुढील नियोजन करायला पाहिजे. मोठमोठ्या टेक कंपन्या टीसीएस, इंटेल, टेस्ला, गुगल, मेटा आणि इतर कंपन्यांनी एक लाखांहून अधिक लोकांना घरचा रस्ता दाखवला आहे. काही पदाचे काम एआय करत आहे. त्यामुळे जगातील काही क्षेत्रात मनुष्याची आणि त्याच्या श्रमाची किंमत अगदी झिरो होणार आहे. या क्षेत्रात एआयच्या मदतीने काम होणार आहे. त्यामुळे या क्षेत्रात नोकरी करण्याची गरजच उरणार नाही. हे जॉब कायमचे बंद होण्याची भीती आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या 'फ्युचर ऑफ जॉब्स रिपोर्ट २०२५' नुसार येत्या ५ वर्षांत म्हणजेच २०३० पर्यंत जगात अनेक गोष्टी झपाट्याने बदलतील. एआयमुळे जॉब मार्केट जवळपास २२ टक्क्यांनी बदलेल. म्हणजेच येणारी वर्षे नोकरदारांसाठी आव्हानात्मक ठरेल. जगभरात थोड्या थोडक्या नाही, तर ९.२ कोटी नोक-या संपुष्टात येतील. येथील कर्मचा-यांना सहानुभुतीवर काही दिवस नोकरी करू दिले जाईल. पण त्यांच्या जागेवर नवीन कर्मचारी भरती करण्यात येणार नाही. तर काही नोक-या ताबडतोब बंद होतील. तिथल्या कर्मचा-यांना दुस-या खात्यात पाठवण्यात येईल अथवा घरचा रस्ता दाखवला जाईल. यामध्ये पोस्टल सर्व्हिस क्लर्क, डाटा एंट्री ऑपरेटर्स, बँक टेलर्स आणि क्लर्क, रोखपाल, तिकीट क्लर्क, प्रिंटिंग आणि संबंधित कामगार, अकाऊंटिंग, बुककिपिंग,ॲडमिनिस्ट्रेटिव्ह असिस्टंट, एक्झिक्युटिव्ह सेक्रेटरी, स्टॉक किपिंग, मटेरिअल रेकॉर्डिंग क्लर्क, डोअर टु डोअर सेल्स वर्कर्स, कंडक्टर, न्यूज वेंडर, दळणवळणातील काही नोक-या यासह इतरही काही नोक-यांवर गंडांतर येऊ शकते. तर दुस-या बाजुला एआयमुळे काही कौशल्य आत्मसात करणा-या लोकांना नोकरी सुद्धा मिळाली आहे. काही नवीन नोक-या समोर आले आहे. कौशल्य विकासाद्वारे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्याची क्षमता, सध्या होत असलेल्या नोक-यांच्या नुकसानीपेक्षा कितीतरी पटीनं जास्त असेल. नवीन क्षेत्रांमध्ये नवीन प्रकारच्या नोक-या निर्माण करण्याच्या संधी अधिक आहेत आणि हे प्रामुख्याने कौशल्य विकास, प्रगत कौशल्य विकास आणि प्रतिभा विकासाच्या माध्यमातूनच शक्य आहे. थोडक्यात, एआयमुळे नोकरीच्या बाजारात एक मोठी उलथापालथ निश्चित आहे. या बदलाच्या लाटेत टिकून राहण्यासाठी आणि यशस्वी होण्यासाठी कर्मचा-यांना स्वत:ला सतत अपडेट ठेवणे आणि काळाची गरज असलेली नवीन कौशल्ये शिकणे अनिवार्य आहे.

**सुनील शिरपुरे,** कमळवेल्ली,यवतमाळ
मो.-७०५७१८५४७९

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखा

# नगरपरिषद निवडणूक; प्रतिक्षेचा शेवट, लोकशाहीचा उत्सव

## मतमोजणीची प्रक्रिया आज होणार पूर्ण

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - दीर्घ कालावधीनंतर होत असलेल्या यवतमाळ नगरपरिषद निवडणुकीने शहरात लोकशाहीचा उत्सव साजरा झाल्याचे चित्र शनिवारी (ता. २०) पाहायला मिळाले. यवतमाळ पालिके सह दिग्रस, पांढरकवडा व वणी येथे शांततेत मतदान पार पडले. सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सुमारे ६० टक्याच्यावर मतदान झाल्याची चर्चा होती, तर अंतिम मतदानाचा आकडा ६० टक्क्यांपेक्षा अधिक जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

यवतमाळ नगर परिषदे साठी एकूण २ लाख ३२ हजार ३१५ मतदार मतदानाचा हक्क बजावणार होते. यामध्ये १ लाख १६ हजार ४६ महिला, १ लाख १६ हजार २४५ पुरुष व २४ इतर मतदारांचा समावेश आहे. शहरातील २४८ मतदान केंद्रांवर नगराध्यक्ष पदासह ५८ नगरसेवक पदासाठी मतदान प्रक्रिया पार पडली. नगराध्यक्ष पदासाठी भाजप, शिवसेना (शिंदे), शिवसेना (ठाकरे), काँग्रेस व अपक्ष असे एकूण ९ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. तर नगरसेवक पदासाठी तब्बल २९९ उमेदवारांनी आपले नशीब आजमावले. गेल्या ३३ दिवसांपासून सुरू असलेल्या प्रचाराच्या धुराळ्या नंतर अखेर सर्व उमेदवारांचे राजकीय भवितव्य ईव्हीएम मध्ये बंद झाले आहे. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे युती व आघाड्यां मधील समीकरणे विस्कटल्याने बहुतांश प्रमुख पक्ष स्वबळावर निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे सर्वच पक्ष एकमेकांसमोर थेट उभे ठाकल्याने यवतमाळ पालिकेची लढत अत्यंत चुरशीची ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. मतदानाच्या अंतिम टप्प्यात अनेक मतदान केंद्रांवर नागरिकांची मोठी गर्दी उसळली. काही ठिकाणी त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले. शाळा क्रमांक ५ व ६ येथे उमेदवार, मतदार व पोलिस यंत्रणेमध्ये शाब्दिक चकमक झाल्याचेही चित्र दिसून आले. मात्र पोलिस प्रशासनाच्या सतर्कतेमुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. सायंकाळी मतदान केंद्राच्या आत प्रवेश केलेल्या मतदारांना उशिरापर्यंत मतदान करण्याची संधी देण्यात आली. वयोवृद्ध, महिला, तरुण तसेच प्रथमच मतदान करणाऱ्या मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत लोकशाहीवरील विश्वास अधोरेखित केला. या निवडणुकीत काही मतदान केंद्रांवर महिलांचे सक्षमीकरण दर्शविणारा संदेश देण्यात आला. महिला कर्मचाऱ्यांनी कलात्मक पद्धतीने सजवलेली मतदान केंद्रे लक्षवेधी ठरली. तसेच निरोगी आरोग्य, दिव्यांग जनजागृती, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, कृषी विषयक माहिती व वाहतूक नियम यांवर आधारित सात आदर्श मतदान केंद्रांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.राज्य निवडणूक आयोगाच्या सुधारित आदेशानुसार पार पडलेल्या या निवडणुका आता पूर्ण झाल्या असून रविवारी (ता. २१) मतमोजणी होणार आहे. अनेक वर्षांनंतर होत असलेल्या नगरपरिषद निवडणुकीमुळे विजयाची संधी ऐतिहासिक ठरणार असल्याची भावना उमेदवारांमध्ये दिसून येत आहे. मतदान आटोपल्याने निवडणूक कर्मचाऱ्यांनी सुटकेचा श्वास घेतला असला, तरी मतमोजणीच्या निकालाबाबत उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. कोणत्या पक्षाच्या पारड्यात सत्ता जाणार, कोणाच्या विजयावर गुलाल उधळला जाणार, याबाबत शहरात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. मतदानाचा हक्क हा केवळ अधिकार नसून लोकशाहीचे कर्तव्य आहे, हे यवतमाळ करांनी या निवडणुकीतून अनुभवातून दाखवून दिले.मतदारांची गर्दी काही भागात मोठ्या प्रमाणावर दिसून आली. शहरातील अंजुमन हायस्कूल, भोसा, शाळा क्रमांक ५ व ६ (पाटीपुरा), माळीपुरा, तहसील चौक शाळा, मांडळे शाळा, वडगाव परिसर व इस्लामपुरा येथे मतदारांची मोठी गर्दी दिसून आली. मात्र शहराच्या काही भागांत मतदान प्रक्रिया संथगतीने सुरू होती व अपेक्षित उत्साह दिसून आला नाही. त्यामुळे या निवडणुकीतील विजयाचे गणित बदलू शकते, अशी चर्चा सर्वत्र व्यक्त होत आहे.



अशोक उईके यांनी सकाळीच मुलगी आणि उमेदवार ॲड. प्रियदर्शनी उईके व पत्नीसह मतदान केले

### एक मतदान बोगस

शनिवार, 20 डिसेंबरला येथील राज इंग्लिश शाळेमध्ये निवडणूक प्रतिनिधी ज्योती राऊत या स्वतः हजर असतानाच बोगस मतदान झाले. त्यांच्या नावावर दुसरेच कोणीतरी मतदान करून गेले. ज्योती राऊत मतदान करायला गेल्या असता तेथील निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांना, तुम्ही मतदान करून गेल्या आहात, असे म्हटले. निवडणूक आयोग जी शाई वापरत असते तीसुद्धा ज्योती यांच्या बोटाला नव्हती. हा प्रकार नंदू मेसेकर यांच्या लक्षात आला असता त्यांनी तेथील अधिकाऱ्यांना याचा जाब विचारला. त्यावर अधिकारी उत्तर देऊ शकत नव्हते. शेवटी पोलिसांनी मध्यस्थी करून ओसी देऊन मतपत्रिकेवर मतदान करून घेतले. यवतमाळ नगर परिषदेच्या प्रभाग २९ येथे हा प्रकार घडला.

## १०३ वर्षांच्या वयातही मतदानाचा हक्क बजावला



यवतमाळ - प्रभाग क्रमांक १४ येथील १०३ वर्षीय वच्छला राऊत यांनी मतदान केंद्रात जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. अत्यंत वृद्ध वय असूनही त्या मतदानासाठी स्वतः उपस्थित राहिल्याने उपस्थित मतदारांमध्ये कौतुकाची भावना व्यक्त झाली. लोकशाहीप्रती असलेली निष्ठा आणि मतदानाबाबतची जागरूकता यांचे त्यांनी आदर्श उदाहरण घालून दिले.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व मित्र पक्षाच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रा. प्रियंका जितेंद्र मोघे यांनी आज शहरातील प्रभाग क्र. २२ मध्ये आपल्या मतदानाचा हक्क बजावला.



## वेचक

### पेढी येथिल ३३ के. व्ही. उपकेंद्र बांधकामात भ्रष्टाचार - संध्या रणवीर यांची तक्रार



महागाव : पेढी ई. येथे 33 केव्ही उपकेंद्राचे काम सुरू झाले असून बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे होत असल्याने या कामात प्रचंड भ्रष्टाचार होत असल्याची ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र शासन, जिल्हाधिकारी यवतमाळ, कार्यकारी अभियंता,पुसद वं सहाय्यक अभियंता, महागांव यांना सौ संध्या संदेश रणवीर यांनी तक्रार करून या निकृष्ट बांधकामाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय योजनेअंतर्गत पेढी येथे 33 के. व्ही. उपकेंद्राचे काम सुरु असून सदर कामाच्या पायाभरणीतच उभ्या होत असलेल्या भिंतीमध्ये सिमेंट व वाळूचे प्रमाण नियमानुसार नसल्याने आजच सदरच्या भिंतीतील दगड हे रेती वं सिमेंट चा योग्य वापर न केल्यामुळे हाताने अलगद निघत आहेत त्यामुळे हे बांधकाम दर्जाहीन असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर बांधकाम हे इस्टिमेट नुसार होत नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. शासनाच्या पर्यायाने जनतेच्या पैस्याचा यामुळे अपहार होत असून संबंधित बांधकामाची चौकशी करून संबंधितावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जनहितार्थ संध्या रणवीर यांनी प्रशासनाला केली आहे.

### भरधाव दुचाकीच्या धडकेत महिला ठार

वणी – तालुक्यातील नायगाव (खु) गावाजवळ रोड क्रॉस करताना भरधाव दुचाकीची धडक बसल्याने एका महिलेचा जागीच मृत्यू झाला.ही हृदयविदारक घटना शुक्रवारी दिनांक 19 डिसेंबर रोजी सायंकाळी 6:30 वाजताच्या सुमारास घडली. मृत महिलेचे नाव मंगला अशोक मिलमिले वय अंदाजे 55, रा. नवीन वागदरा,(वणी) असे आहे. अपघातानंतर बाईक चालक पसार झाला.या प्रकरणी मृतकाच्या जावयाकडून वणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्राप्त माहिती नुसार,मृतक मंगला मिलमिले या नवीन वागदरा येथील रहिवासी होत्या. त्या वणीहून ऑटोने नायगावला मुलगी व जावयाकडे जात होत्या.नायगाव बस स्टॉपजवळ ऑटो थांबला.मंगला ऑटोतून बाहेर आल्या व रोड क्रॉस करीत होत्या.दरम्यान वरोरा कडून वणीच्या दिशेने एक भरधाव लाल रंगाची पल्सर (MH -29 CK -1372) येत होती. या बाईकने मंगला यांना जोरदार धडक दिली. अपघातात मंगला यांच्या डोक्याला गंभीर मार लागला. रक्तस्त्राव झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर आरोपी बाइकचालक पळून गेला. घटनास्थळी लोक जमा झाले. पोलिसांना याची माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणी मंगला यांचे जावई तुळशीराम पुंडलिक तुराणकर (वय 41,व्यवसाय शेती,रा. नायगाव)यांनी वणी पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात तक्रार दिली.पोलिसांनी बाईक चालकावर बीएनएसच्या कलम 281,106 (1) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेका/राजु देठे करीत आहे.

### पांढरकवडा : मतमोजणीपूर्व तणाव शिगेला, दोन्ही पक्षांचे प्रतिनिधी

पांढरकवडा : नगरपरिषद निवडणुकीनंतर आता शहरात मतमोजणीपूर्व तणाव, उत्सुकता आणि वेधक वातावरण निर्माण झाले आहे. दोन्ही प्रमुख पक्षांची प्रतिष्ठा पणाला लागलेल्या या निवडणुकीचा निकाल कोणाच्या बाजूने झुकतो, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. मतमोजणी केंद्राबाहेर सकाळपासूनच दोन्ही पक्षांचे प्रतिनिधी, त्यांचे सहकारी तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते जमा होऊ लागले असून प्रत्येक फेरीतील घडामोडी जाणून घेण्यासाठी सर्वजण आतुर आहेत. स्थानिक राजकारणात ही निवडणूक अत्यंत निर्णायक मानली जात असल्याने दोन्ही बाजूंनी तणाव आणि अपेक्षेचे वातावरण वाढत आहे. प्रशासनाने सुरक्षेची कडेकोट व्यवस्था तैनात केली असून मतमोजणी प्रक्रिया पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. शहरभर निकालाबाबत चर्चा, अंदाज आणि तर्कांना उधाण आले आहे. नगरपरिषदेसाठीच्या या महत्त्वाच्या लढतीचा अंतिम निकाल कोणाला सत्ता देणार? याचे उत्तर काही तासांतच स्पष्ट होणार आहे आणि त्याचीच उत्सुकता पांढरकवडा शहरात शिगेला पोहोचली आहे.

## प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा वांजरी येथे संत गाडगे महाराज पुण्यतिथी साजरी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा वांजरी येथे संत गाडगे महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेतील मुख्याध्यापक वानखेडे सर, प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील प्राथमिक मुख्याध्यापक योगेश राऊत सर, मोगरकर सर उपस्थित होते, तर प्रमुख वक्ते म्हणून गावातील पोलीस पाटील अशोक कुमरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राऊत सर यांनी केले. संत गाडगे महाराजांच्या विचारांवर प्रत्यक्ष कृती केल्यासच त्यांच्या पुण्यतिथीची खरी श्रद्धांजली होईल, असे त्यांनी नमूद केले.

तसेच या पुण्यतिथीनिमित्त पुढील पंधरा दिवस विविध समाजोपयोगी उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.प्रमुख वक्ते अशोक कुमरे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात संत गाडगे महाराजांचे जीवनकार्य, स्वच्छतेविषयीची दृष्टी, अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य व समाजसुधारणेतील योगदान यावर सविस्तर प्रकाश टाकला.



'स्वच्छ भारत व स्वस्थ भारत अभियान' अंतर्गत स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करत, विद्यार्थ्यांनी संत गाडगे महाराजांचे विचार आत्मसात करून समाजाभिमुख उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक वानखेडे सर यांनी संत गाडगे महाराजांचे विचार आजच्या शैक्षणिक व सामाजिक जीवनासाठी अत्यंत मार्गदर्शक असल्याचे सांगितले.विद्यार्थ्यांनी स्वच्छता, सेवाभाव व सामाजिक जबाबदारी जपावी, असेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बोडेवार सर यांनी केले,तर आभार प्रदर्शन ढोकणे सर यांनी मानले.या कार्यक्रमास शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थितीत शाळेतील परिसर स्वच्छ केला.

कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व विद्यार्थ्यांकडून विद्यालयाच्या प्रांगणात असलेली विविध प्रकारचे गवत काढून तसेच खराट्याच्या माध्यमातून स्वच्छता करून गाडगे महाराजांची पुण्यतिथी साजरी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक,कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## कला, वाणिज्य महाविद्यालयाची आयसीटीसी केंद्राला शैक्षणिक भेट

**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव - कला, वाणिज्य महाविद्यालय, राळेगाव येथील रेड रिबन क्लब व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) चे स्वयंसेवकानी ग्रामीण रुग्णालय, राळेगाव येथील आयसीटीसी (ICTC) केंद्रास दिनांक 19 डिसेंबर 2025 रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर सावरकर यांच्या मार्गदर्शनात तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विशाल दौलतकर यांच्या नेतृत्वात शैक्षणिक भेट दिली. विद्यार्थ्यांनी एच.आय.व्ही./एड्स प्रतिबंध, निदान प्रक्रिया व आरोग्य विषयक माहिती जाणून घ्यावी तसेच जनजागृती निर्माण करण्याचा उद्देश या अभ्यासदौऱ्यामागे होता. या अभ्यास दौऱ्याच्या मुख्य मार्गदर्शक डॉ. वर्षा बडणाखे, समुपदेशक, ग्रामीण रुग्णालय, राळेगाव यांनी आयसीटीसी केंद्राचे कार्य, एच.आय.व्ही. चाचणी प्रक्रिया, गोपनीयता, समुपदेशन सेवा, उपचार आणि पॉझिटिव्ह रुग्णांसाठी उपलब्ध शासकीय सुविधा याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की – "समाजातील अज्ञान व गैरसमज दूर करणे आणि एच.आय.व्ही. बाधित व्यक्तींशी सन्मानाने व सहानुभूतीने वागणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे." यानंतर मा. श्री. श्रीकांत लाभसेटवार, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, ग्रामीण रुग्णालय यांनी एच.आय.व्ही. नमुना संकलन, लॅब प्रक्रिया, सुरक्षित रक्तदान व प्रतिबंधक उपायांची माहिती दिली. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना एड्स प्रतिबंध आणि सामाजिक जागरूकतेची शपथ देत जबाबदारीने समाजात माहिती प्रसारित करण्याचे आवाहन केले. या अभ्यास दौऱ्यात ग्रामीण रुग्णालय राळेगाव चे वैद्यकीय अधीक्षक डॉ उमेश मडावी यांनी एचआयव्ही एड्स तसेच सिकल सेल बाबत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले सिकलसेल सारख्या रोगाला थांबवण्यासाठी लोकांमध्ये जनजागृती होणे गरजेचे आहेत असे मत त्यांनी मांडले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ विशाल दौलतकर यांनी रासेयो स्वयंसेवकांनी सामाजिक कार्यात सहभागी व्हावे व आरोग्य जागरूकतेद्वारे सामाजिक परिवर्तन घडवावे, असे सांगितले व उपस्थित ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे व आयसीटीसी विभागातील सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून निवडणूक व्यवस्थेची पाहणी; निवडणूक कर्मचाऱ्यांचा वाढवला उत्साह



यवतमाळ : यवतमाळ जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी विकास मीना यांनी विविध केंद्रांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी मतमोजणी केंद्राची सुरक्षा आणि मतदान केंद्रांवरील कामकाजाचा आढावा घेत यंत्रणेला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वप्रथम धामणगाव रोडवरील शासकीय तंत्रनिकेतन येथे भेट दिली. या ठिकाणी यवतमाळ नगरपरिषदेसाठीची मतमोजणी आणि 'स्ट्राँग रूम'ची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यांनी स्ट्राँग रूमच्या ठिकाणी असलेल्या व्यवस्थेची तसेच मतमोजणीच्या दिवशी अधिकारी-कर्मचाऱ्यांना बसण्याची व्यवस्था, मतपेट्यांची ने-आण आदींची बारकाईने पाहणी केली. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत पार पडावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी शहरातील अभ्यंकर कन्या शाळा, दर्डा नगर केंद्र, पाटीपुरा येथील मतदान केंद्र, अंजुमन शाळा या मतदान केंद्रांनाही भेटी दिल्या. मतदान केंद्रांवर कर्तव्य बजावत असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी जिल्हाधिकाऱ्यांनी संवाद साधला.

## वन्यजीवांचा पाण्याच्या शोधात गावाकडे कूच

### पोफाळी परिसरात बिबट्याचे दर्शन; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड : तालुक्यातील पोफाळी व परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिकारीच्या शोधात वन्यजीव गाव-खेड्यांच्या दिशेने येत असल्याचे चित्र सध्या दिसून येत असून, पोफाळी नजीकच्या गावांमध्ये बिबट्याचे दर्शन झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

पोफाळी, कळमुला, अंबाळी, जनुना, पळशी, नागापूर, नागवाडी, पाथरवाडी, शेनंद, सावरगाव(बंगला),धनज,मोहदरी,तरोडा आदी गावांच्या शिवारात बिबट्याची दहशत पसरली आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या जनावरांवर बिबट्याने हल्ला केल्याच्या घटना घडल्याची माहिती असून, त्यामुळे शेतकरी व



ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सध्या रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी अनेक शेतकऱ्यांना रात्री उशिरापर्यंत शेतात जावे लागत आहे. मात्र, बिबट्याच्या वावरामुळे रात्री शेतात जाणे धोकादायक ठरत आहे. पोफाळी गावाजवळ प्रत्यक्ष बिबट्या दिसल्याची चर्चा परिसरात जोर धरत असून, नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर वनविभागाने तातडीची दखल घेत दवंडी देत नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. रात्री कोणीही एकट्याने घराबाहेर पडू नये, शेतात जाताना गटाने जावे, मोबाईल टॉर्च, काठी आदी साधने सोबत ठेवावीत, तसेच जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी वनविभागाकडून गस्त वाढविण्यात येणार असल्याची माहिती आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता कोणतीही घटना किंवा बिबट्याचे दर्शन झाल्यास तात्काळ वनविभागाला कळवावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. बिबट्याच्या दहशतीमुळे पोफाळी परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण असून, वनविभागाने ठोस उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

## पुसद नगर परिषद निवडणुकीत अपक्ष उमेदवारांचीच जोरदार चर्चा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - पुसद नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चे मतदान नुकतेच पार पडले असून न्यायालयीन प्रक्रियेमुळे निकाल लांबणीवर गेला आहे. मात्र निकालापूर्वीच शहरात एका गोष्टीची जोरदार चर्चा सुरू आहे, ती म्हणजे अपक्ष उमेदवारांनी या निवडणुकीतील सर्वच राजकीय समीकरणे बदलून टाकल्याची.

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांचीच युती झाली होती, तर इतर पक्ष स्वतंत्रपणे लढले. कोणत्याही पक्षाकडून ठोस विकासात्मक अजेंडा किंवा स्पष्ट रोडमॅप मतदारांसमोर ठेवण्यात आला नाही. प्रचारात





प्रामुख्याने आरोप-प्रत्यारोपांवरच भर राहिला. परिणामी मतदारांनी यावेळी पक्षाऐवजी व्यक्ती, काम आणि विश्वासार्हता यांना प्राधान्य दिल्याचे चित्र दिसून आले. या पार्श्वभूमीवर अपक्ष उमेदवारांना मोठा लाभ झाला आहे.

नगराध्यक्ष पदासह अनेक प्रभागांमध्ये 'पॅनल टू पॅनल' मतदान झाले नसल्याने पक्षीय उमेदवारांना अपेक्षित मते मिळाली नाहीत. एका मतदाराला ३ ते ४ मते देण्याचा अधिकार असल्याने त्यांनी वेगवेगळ्या पक्षांतील व अपक्ष चांगल्या उमेदवारांना मतदान केल्याचे स्पष्ट झाले. नगरपरिषदेतील २५ वर्षांचा अनुभव असलेले राजू दुधे, रिपाई आठवले, भीमशक्ती पॅनलशी संबंधित अपक्ष उमेदवार, तसेच प्रभाग क्र. १० मधील निरज पवार, प्रभाग क्र. १३ मधील सुशीला अंभोरे, प्रभाग क्र. १४ मधील ज्योती कांबळे आणि प्रभाग क्र. ४ मधील नवख्या अपक्ष महिला उमेदवार सैय्यद नुसरत परवीन या सर्वांची शहरात विशेष चर्चा आहे.

निकालाच्या दिवशी राजकीय दिग्गजांची गणिते बिघडतील आणि अपक्ष उमेदवार निर्णायक भूमिका बजावतील, असा विश्वास नागरिकांमध्ये व्यक्त होत असून पुसदला यावेळी वेगळाच आणि ऐतिहासिक निकाल पाहायला मिळेल, अशी जोरदार चर्चा शहरभर सुरू आहे.

## बेलोरा चेक पोस्टजवळ मृतावस्थेत आढळला पट्टेदार वाघ, वणी परिसरात एकच खळबळ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - वणी तालुक्यात वाघ दिसण्याच्या घटना नवीन नाहीत. घनदाट जंगल व कोळसा खदानांच्या परिसरामुळे अधूनमधून वाघांचा वावर नागरिकांच्या नजरेस पडत असतो. काही दिवसांपूर्वीही तालुक्यातील विविध भागात वाघ दिसल्याच्या घटना घडल्या होत्या.

मात्र दि. 20 रोजी सकाळच्या सुमारास बेलोरा खदान चेक पोस्ट जवळ पट्टेदार वाघ मृतावस्थेत आढळल्याने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सकाळी चेक पोस्ट परिसरात कामगार व स्थानिक नागरिकांना रस्त्याच्या कडेला वाघ निष्प्राण अवस्थेत दिसताच तात्काळ वनविभागाला माहिती देण्यात आली. काही वेळातच वनअधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. वाघाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्टता नसून विषबाधा, वाहनाची धडक की नैसर्गिक कारण?.. याबाबत तर्कवितर्क



लावले जात आहेत. घटनेनंतर परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी जमली होती. संभाव्य धोका लक्षात घेता वनविभागाने परिसर सील करून पंचनामा सुरु केला. मृत वाघाला ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी हलविण्यात येणार असून अहवालानंतरच मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होणार आहे. दरम्यान, वणी तालुक्यात मानवी वस्तीच्या जवळ वाघांचा वाढता वावर आणि आता थेट मृत वाघ सापडल्याची घटना ही वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने गंभीर मानली जात आहे. या घटनेमुळे वनविभागाच्या कार्यप्रणालीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

## प्रभाग १५ मध्ये मतदाना दरम्यान तुंबळ हाणामारी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - यवतमाळ नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान सुरू असतानाच प्रभाग क्रमांक १५ मध्ये दोन गटांत तुंबळ हाणामारी झाल्याची गंभीर घटना घडली. काँग्रेस व अपक्ष उमेदवाराच्या समर्थकांमध्ये झालेल्या या संघर्षामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.प्रभाग क्रमांक १५ मधील अंजुमन उर्दू शाळा येथील मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया सुरू असताना मैदानाच्या वापरा वरून दोन्ही गटांमध्ये सुरुवातीला शाब्दिक वाद झाला. हा वाद काही वेळातच चिघळून मोठ्या हाणामारीत रूपांतरित झाला. यावेळी दोन्ही गटांनी एकमेकांवर लाठ्या-काठ्यांनी हल्ला करत दगडफेक केल्याची माहिती आहे.

या तुंबळ हाणामारीत वसीम अहमद यांच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली असून एजाज अहमद यांच्यासह इतर एक-दोन जण जखमी झाले आहेत. एकूण तीन ते चार जणांना दुखापत झाली असून सर्व जखमींना तातडीने उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेता अतिरिक्त पोलीस कुमक पाचारण करण्यात आली. जमावाला पांगवून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली असून सध्या परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पुढील अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिसांकडून सतर्कता बाळगण्यात येत आहे.

## यापुढे शेतकऱ्यांना महावितरण कडून वीज मिळणार नाही

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - गेल्या अनेक वर्षापासून सिंचनासाठी वापरली जाणारी वीज ही शेतकऱ्यांना महावितरण तर्फे मिळत होती. नदी, नाले, कुपनलिका यावरून केल्या जाणाऱ्या सिंचनासाठी महावितरण कडून वीत पुरवठा केला जायचा. परंतु गेल्या दोन वर्षापासून महावितरण कडून कोटेशन भरण्याची साईट बंद असून यापुढेही ती बंद राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सोलार शिवाय कुठलाही पर्याय उपलब्ध नाही.

गेल्या अनेक वर्षापासून प्रत्येक निवडणुकीच्या वेळी शेतकऱ्यांची वीज बिल माफ केले जाते. या बाबीचा कुठेतरी विचार करून महावितरणला होणारे नुकसान टाळण्यासाठी सोलारचा पर्याय शासनाने समोर ठेवला आहे .परंतु सोलार वर असलेल्या सबसिडीचा विचार करून जाता व सोलारचे फायदे-तोटे पाहू जाता शेतकऱ्यांना महावितरण ची बीज परवडण्यासारखी आहे. यावर्षी झालेल्या सात महिन्याच्या अतिवृष्टी मध्ये अनेक शेतकऱ्यांच्या सोलारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे .काही ठिकाणी विजेमुळे तर काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे जमीन खसल्यामुळे सोलारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सोलारची दुसरी बाजू पाहू जाता सोलार पंप महावितरण कडून पुरवल्या जाणाऱ्या विजे पेक्षा कमी दाबाने पाणी उपसा करतो. सोलारसाठी बसवले जाणाऱ्या प्लेटवर वानर , रानडुक्कर, रोही अशा प्राण्यांमुळे त्याचे नुकसान होत आहे. यासोबतच सोलारचे विक्री करणाऱ्या कंपन्या शेतकऱ्यांना विम्यातून नुकसान भरपाई द्यायला तयार नाहीत किंवा त्यासाठी शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महावितरणची साईट बंद होण्यापूर्वी तीन एचपीच्या पंपाला 9हजार 348 रुपये कोटेशन होते, तर पाच एचपीच्या पंपाला 11 हजार 380 रुपये कोटेशन होते. आज रोजी सोलारच्या ती न एचपी च्या पंपाल 23 हजार रुपये तर पाच एचपीच्या पंपाला 32 हजार रुपये एवढा खर्च शेतकऱ्यांना करावा लागत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# महावितरण वीज कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक सुरक्षा साधने देणार- संचालक राजेंद्र पवार

## शून्य अपघाताचे ध्येय : अत्याधुनिक सुरक्षा साधनांचे वीज कर्मचाऱ्यांसह संघटनांसमोर प्रात्यक्षिक

**अमरावती/का.प्र.**

वीज कर्मचारी हा महावितरणचा आधारस्तंभ आहे. तो सुरक्षित असेल तरच अखंडित वीजपुरवठा मिळणार आहे. त्यामुळे वीज कर्मचाऱ्यांच्या जिविताची सुरक्षा सर्वाधिक प्राधान्याचे आहे. व त्यासाठी महावितरण कंपनी अत्याधुनिक सुरक्षा साधने खरेदी करणार असल्याचे प्रतिपादन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी पुणे येथे केले.

महावितरणच्या सांघिक कार्यालयातर्फे पुणे परिमंडल येथे अत्याधुनिक सुरक्षा साधनांच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या दिवशी कंपनीत कार्यरत असलेल्या प्रमुख औद्योगिक संघटनांच्या शिखर पदाधिकारी, व्यवस्थापनातील वरिष्ठ अभियंते व अधिकारी यांच्यापुढे रास्तापेठ उपकेंद्रात तर दुसऱ्या दिवशी पद्मावती येथील २२/११ केव्ही उपकेंद्रात परिमंडलातील अभियंते व वीज कर्मचाऱ्यांपुढे सुरक्षा साधनांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. यावेळी प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता सुनिल काकडे, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड यांचेसह वरिष्ठ अधिकारी व वीज कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना संचालक (मानव संसाधन)राजेंद्र पवार म्हणाले, ग्राहकांना अखंडित व गुणवत्तापूर्ण



वीजपुरवठा करणे हे महावितरणचे कर्तव्य आहे. वीजपुरवठा अखंडित देण्यासाठी यापुढे बिघाड होणार नाहीत, झाल्यास त्याचा कालावधी कमीत कमी असेल, यावर काम करावे लागेल. बाजारात संभाव्य बिघाड ओळखण्याचे नवनवीन तंत्रज्ञान उपलब्ध आहे. मात्र बाजारातील अत्याधुनिक तंत्रज्ञान व साधन सामुग्री आपल्या यंत्रणेला पुरक आहे का? तसेच त्यात काय बदल करावे लागतील याची माहिती देण्यासाठी या प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या अभिप्रायावर व साधनांच्या उपयोगितेवरच ही साधने खरेदी केली जातील अशी ग्वाही त्यांनी दिली.

पुणे प्रादेशिक संचालक श्री. भुजंग खंदारे म्हणाले, 'आपण बाजारातून एखादी वस्तू खरेदी करताना वेगवेगळ्या कसोट्या लावून वस्तूची निवड करतो. त्याप्रमाणे प्रत्येकाने सुरक्षा साधनांची उपयोगिता तपासून आपले प्रामाणिक मत नोंदवावे. कारण, ही साधने आपला जीव वाचविणारी आहेत. वापरकर्त्यांची खात्री पटल्याशिवाय व्यवस्थापन पुढे जाणार नाही.' तर आभार प्रदर्शन करताना मुख्य अभियंता श्री. सुनिल काकडे म्हणाले, अपघात हा क्षणाचा असतो. परंतु, त्यामुळे कुटुंबाची घडी विस्कटते. कायमचे अपंगत्व येते. वीज कर्मचाऱ्यांनी सुरक्षेत तडजोड करु नये.'

सुरक्षा साधनांच्या प्रात्यक्षिकासाठी मे. तौरस पावरट्रॉनिक्स प्रा.लि.चे तर्फे अनुज अग्रवाल व त्यांच्या चमुने वीज पुरवठा चालू असताना बिघाड शोधण्यासाठी लागणाऱ्या विविध आधुनिक साधनांसह, फोल्डिंग शिडी, बहुउद्देशी रॉड आदींचे सादरीकरण केले. मे. टाटा कंपनीने २२ केव्ही पर्यंतचा वीज रोधक गम बूट सादर केला. याशिवाय महावितरणमधील गणेश वडते व मुबारक पठाण यांनी स्वतः विकसित केलेल्या 'डिस्चार्ज रॉड'चे प्रात्यक्षिक सादर केले. कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी विशेष पुढाकार घेतला.

## संक्षिप्त

### विद्यापीठात कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांना अभिवादन



**अमरावती**-कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गाडगे बाबा अध्यासन केंद्रात पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्रभारी कुलसचिव तथा परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. तसेच मुख्य प्रवेशद्वारा समोरील श्री संत गाडगे बाबांच्या संदेशशिल्पाला पुष्पार्पण करुन अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाला माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, संगणक केंद्र प्रमुख डॉ. सुहास पाचपांडे, श्री संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. दिलीप काळे, महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनपेठकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधाराचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे, प्रा.डॉ. संयोगिता देशमुख, प्रा.डॉ. प्रणव कोलते, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, डॉ. सुलभा पाटील,मोनाली तोटे पाटील,मिनल मालधुरे, डॉ. साक्षी ठाकूर, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, उद्यान अधीक्षक अनिल घोम, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्याबद्दल माहिती संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. दिलीप काळे यांनी केले.

### गाडगेबाबा पुण्यतिथा



**वलगाव**- येथील संत गाडगे महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम अंतर्गत वैराग्य मूर्ती संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त निमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडला.

### आयएमएच्या वार्षिक महोत्सवात विनोदी नाटक सादर



**अमरावती**-नुकतेच इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अमरावती शाखेचा वार्षिक उत्सव संपन्न झाले. यात 'यम हैं हम' हे विनोदी लघुनाट्य प्रस्तुत करण्यात आले. डॉ सतीश अग्रवाल यांनी लिहिलेल्या या लघुनाट्याचे दिग्दर्शन श्री रत्नाकर सिरसाट आणि श्री दिलीप खत्री यांनी केले. यात डॉ अनिल हरवानी, डॉ सतीश अग्रवाल, डॉ श्रीपाद जहांगीरदार, डॉ मंजुषा व डॉ स्वप्नील देशमुख, डॉ नेहा व डॉ रोहन देशमुख आणि डॉ निलेश पाचकवडे यांच्या भूमिका होत्या. दोन लहान यमदूत म्हणून कु नित्या आणि चि निमय देशमुख यांनी उत्कृष्ट काम केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वार्षिक उत्सव अध्यक्ष डॉ कश्मिरा कडू व सचिव डॉ तृप्ती दानखडे, आयएमए अमरावती शाखेच्या अध्यक्षा डॉ अलका कुथे, सचिव डॉ राधा सावदेकर व संपूर्ण कार्यकारीणीनी श्रम केले.

# बिरला ओपन माईंड इंटरनॅशनल स्कूलचा शैक्षणिक प्रवास सुरू

## निर्वाण बिर्ला यांची माहिती
## अमरावतीच्या शैक्षणिक क्षेत्रात नवे पर्व

**अमरावती/का.प्र.**

बिरला ओपन माईंड इंटरनॅशनल स्कूल या नामांकित ब्रँडसोबत शाळेचे संचालक सुधीर वाकोडे यांनी मार्च २०२३ मध्ये शाळेचा अधिकृत करार केला. या करारानंतर मुंबईनंतर महाराष्ट्रातील दुसरी आणि अमरावतीतील पहिली बिरला ओपन माईंड इंटरनॅशनल स्कूल म्हणून शाळेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अमरावतीच्या शैक्षणिक क्षेत्रात एक नवे आणि महत्त्वाचे पर्व सुरू झाले असून बिरला ओपन माईंड इंटरनॅशनल स्कूल, अमरावती या नामांकित आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थेची अधिकृत स्थापना झाली.आधुनिक शिक्षणपद्धती, मूल्याधिष्ठित शिक्षण व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प घेऊन या शाळेने विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाच्या शिक्षणाचे दालन खुले करून दिले असल्याचे बिर्ला कुटुंबाचे वारसदार, उद्योजक, बिर्ला ओपन माईंड इंटरनॅशनल स्कूलचे प्रमुख निर्वाण बिर्ला यांनी शुक्रवारी (ता. १८) पत्रपरिषदेत सांगितले.

शाळेचा पहिला शैक्षणिक बॅच २०२४-२०२५ या वर्षापासून सुरू झाली असून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक, भावनिक व नैतिक विकासावर विशेष भर दिला जात आहे. बिर्ला ओपन माईंड इंटरनॅशनल स्कूल ही केवळ शिक्षणसंस्था नसून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानासोबतच



कौशल्य, सर्जनशीलता, आत्मविश्वास व संस्कार रुजवणारी शैक्षणिक चळवळ असल्याचे निर्वाण बिर्ला यांनी स्पष्ट केले. शाळेत अत्याधुनिक वर्गखोल्या, प्रशिक्षित व अनुभवी शिक्षकवर्ग, डिजिटल शिक्षण सुविधा, प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग, सहशालेय उपक्रम, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम यांना विशेष महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण स्थानिक पातळीवरच मिळणार असल्याचे निर्वाण बिर्ला यांनी सांगितले. विदर्भातील विद्यार्थ्यांना आता आंतरराष्ट्रीय शिक्षणपद्धती, आधुनिक अभ्यासक्रम, नाविन्यपूर्ण शिक्षण प्रणाली आणि गुणवत्ता नियंत्रण व्यवस्था अमरावतीतच उपलब्ध होणार आहे.कराराअंतर्गत बिर्ला ओपन माईंडची शैक्षणिक संकल्पना, अभ्यासक्रम रचना, शिक्षक प्रशिक्षण व गुणवत्ता मूल्यमापन प्रणाली अमरावतीत प्रभावीपणे राबविली जात आहे. शिक्षण क्षेत्रात अमरावतीचा नावलौकिक वाढवणारी ही संस्था भविष्यात विद्यार्थ्यांसाठी नवनवीन संधी निर्माण करणार असल्याचे बिर्ला म्हणाले.

लंडन येथे आपले शिक्षण झाले असून गत अनेक वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहे. हाय सोसायटीचे शिक्षण सर्वांनाच मिळावे याकरिता भारतभर दोनशे शाखा तर राज्यात दहा शाखा असून पुढील तीन वर्षात महाराष्ट्रभर पन्नास शाखा निर्माण करणार असल्याचे निर्वाण बिर्ला म्हणाले. विदेशातील मेडिकल, इंजिनिअरिंग, फायनान्स या फॅकल्टीच्या शिक्षणामध्ये केवळ भारतच सरस असल्याचे निर्वाण बिर्ला यांनी सांगितले. मात्र, बिझनेस मॅनेजमेंट डिझायनिंग यासारखे शिक्षण विदेशात ॲडव्हान्स कॉलेजमध्ये मिळते. विद्यार्थ्यांनी विदेशात जाण्याआधी भारतातील शिक्षण घेणे आवश्यक आहे. नवीन शिक्षण प्रणाली चांगली असल्याचे यावेळी निर्वाण बिर्ला म्हणाले. बिर्ला ओपन माईंड इंटरनॅशनल स्कूल येथे विविध खेळांसाठी प्रत्येक राज्यातील खेळानुसार तज्ञ प्रशिक्षक ठेवण्यात आले आहे. त्यानुसारच रोहित शर्मा क्रिकेट अकॅडमीसोबत करार करण्यात आल्याचे यावेळी सांगितले.शाळेचे संचालक सुधीर वाकोडे हे शिक्षण व सामाजिक कार्यक्षेत्रातील सक्रिय दूरदृष्टी असणारा नेतृत्व आहे. गुणवत्ता पूर्ण मूल्यद्दिष्टित व अनुभवा आधारित शिक्षणाचा प्रसार करण्याबरोबरच समाजपयोगी उपक्रमाद्वारे ते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा शैक्षणिक गुणवत्ता आणि सामाजिक जाणीव यांचा समन्वय साधत सातत्याने प्रगती करीत असल्याचे निर्वाण बिर्ला यांनी सांगितले. पत्रपरिषदेला सुधीर वाकोडे, मुख्याध्यापिका सुनीता के, मुकेश मिश्रा, आशिष ठाकूर उपस्थित होते.

# 'अमूर्त चित्र ॲब्स्ट्रॅक्ट आर्ट प्रदर्शनीला हर्षवर्धन देशमुख यांची सदिच्छा भेट

## पीडीएमसी परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात कला प्रदर्शनीचे आयोजन



**अमरावती/का.प्र.**


लोकमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवाचे निमित्ताने डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहाच्या गॅलरीमध्ये जागतिक कीर्तीच्या कलाकार रजनी अंबादे यांच्या 'अमूर्त चित्र' ॲस्ट्रॅक्ट आर्ट प्रदर्शनीला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी प्र. देशमुख यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी रेखाटलेल्या चित्रांच्या ठराविक पोर्ट्रेटस्वी माहिती आर्टिस्ट रजनी अंबादे यांचेकडून करून घेतांना आनंद व्यक्त केला व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.ही प्रदर्शनी कला रसिकांसाठी सात दिवसांसाठी उपलब्ध राहणार आहे.यावेळी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. किशोर मालोकर, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, विभाग प्रमुख डॉ. गणेश पुंडकर, प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्नील मोहोड, स्वीयसहायक अभिजीत सोळंके, किशोर इंगळे, रुग्णालय व्यवस्थापक डॉ. श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख, प्रियंका गौतम, अरविंद हाडके, अतुल राऊत, यश तिवारी उपस्थित होते.

## श्रीगुरु नृसिंह सरस्वती स्वामी महाराज जन्मोत्सव

**अमरावती/का.प्र.**

बुधवारा वटवृक्ष स्वामी समर्थ केंद्रात श्री गुरुनृसिंह सरस्वती स्वामी महाराज जन्मोत्सव आज साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये एकदिवसीय श्री गुरुचरित्र पारायण सकाळी ७ वा. सुरु होणार आहे. त्यानंतर ८ वा. भुपाळी आरती, ८.३० वा. सामुहिक अभिषेक, ९ पासून विना प्रहर सुरवात, १२ वा. महाआरती त्यानंतर १२.३०ते २ महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व सेवेक-यांनी दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



# श्री गणेशदास राठी छात्रालय समितीचा अमृत महोत्सव

## ३ ते ६ जानेवारी दरम्यान विविध कार्यकमांची रेलचेल
## ओम बिर्ला,गोविंददेव गिरी महाराज,नितीन गडकरी व भुयार आदी मान्यवरांची राहणार उपस्थीती

**अमरावती/का.प्र.**

श्री गणेशदास राठी वसतिगृह समिती स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल, छात्रालय समितीने ३ ते ६ जानेवारी दरम्यान अमृत महोत्सव आणि नववर्ष समारंभाचे आयोजन केले आहे. या प्रसंगी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, रामजन्मभूमी ट्रस्टचे कोषाध्यक्ष अयोध्या गोविंददेव गिरी महाराज, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महाराष्ट्राचे गृह राज्यमंत्री (ग्रामीण) पंकज भोयर, डी मार्टचे अध्यक्ष आणि संचालक रमेश दमाणी, अखिल भारतीय माहेश्वरी महिला संघटनेच्या अध्यक्षा रेखा राठी, आदित्य बिर्ला अल्ट्रा टेकचे अध्यक्ष आणि झोनल प्रमुख अनुराग अंग्रीश, आर.आर. केबल ग्रुप ऑफ कंपनीजचे अध्यक्ष त्रिभुवनदास काबरा, मालपाणी ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज संगमनेरचे संचालक संजय मालपाणी इत्यादी उपस्थित राहणार आहेत.



ओम बिर्ला | गोविंदगिरी महाराज | नितिन गडकरी | डॉ. पंकज भुयार | प्रशांत पोल | रमेश दमानी | रेखा राठी | अनुराग अंगरीश | त्रिभुवनदास काबरा | संजय मालपानी | ज्ञानवत्सल स्वामी | राकेश ओला | सौम्या शर्मा



श्री गणेशदास राठी छात्रालय समितीची स्थापना १९४९ मध्ये वसतिगृह म्हणून झाली.ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण देण्याच्या उद्देशाने छात्रालय समितीची स्थापना वसतिगृहाच्या स्वरूपात करण्यात आली. या संस्थेचा उद्देश ग्रामीण भागातील मुलांना उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांच्या डोक्यावर छप्पर उपलब्ध करून देणे हा होता. उच्च शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या मुलांना अनेकदा राहण्याची सोय नसते. जर अशा मुलांना वसतिगृहाद्वारे राहण्याची सोय केली गेली तर त्यांना शिक्षण घेण्यात कोणतीही अडचण येणार नाही. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी श्री गणेशदास राठी छात्रालय समितीची स्थापना करण्यात आली. ही समिती अमरावतीच्या इतिहासात आपला ७५ वर्षांचा सुवर्ण इतिहास कोरणार आहे.

### १९४९ मध्ये झाली स्थापना

१९४९ मध्ये त्या काळातील अनेक प्रमुख व्यक्तींनी या मुलांसाठी वसतिगृहे बांधण्याची इच्छा व्यक्त केली, जे बहुतेकदा शहरी भागात शिक्षण घेण्यासाठी येतात, परंतु निवासाची सोय नसते. या मुलांच्या उच्च शिक्षणात अडथळा येऊ नये म्हणून.दिवंगत राधावल्लभ हेडा आणि नारायणीबाई हेडा यांनी पुढाकार घेतला. दिवंगत राधावल्लभ हेडा यांच्या सासू, दिवंगत भागीरथी देवी राठी यांनी या उपक्रमाला पाठिंबा देण्याची इच्छा व्यक्त केली. १९४९ मध्ये, भागीरथी देवी राठी यांनी त्यांचे पती, दिवंगत राय बहादूर गणेशदास राठी यांच्या नावावर ५०,००० रुपये आणि १८५ एकर जमीन दान केली, ज्यावर ही संस्था स्थापन झाली. ही संस्था या वर्षी आपला ७५ वा वर्धापन दिन साजरा करत आहे. ७५ वर्षांपूर्वी त्यांनी लावलेले झाड आता वटवृक्ष झाले आहे.

### जिल्ह्यात २१ शाळा आणि महाविद्यालये

ही संस्था जिल्ह्यात अंदाजे २१ शाळा आणि महाविद्यालये चालवते.ज्यामध्ये विद्यार्थ्यांना केजी ते पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. आज, संस्थेमार्फत अंदाजे १०,००० मुले शिक्षण घेतात. संस्थेत अंदाजे ४५० शिक्षक आणि अतिरिक्त कर्मचारी देखील आहेत.

### संस्थेचा निकाल अद्वितीय

संस्थेचे शैक्षणिक निकाल अतुलनीय राहिले आहेत. दरवर्षी, केवळ अमरावतीमध्येच नव्हे तर विदर्भ आणि महाराष्ट्र स्तरावर १०० हून अधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत स्थान मिळवतात. राठी छात्रालय समिती अंतर्गत येणाऱ्या शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थीही क्रीडा स्पर्धांमध्ये अव्वल स्थान मिळवत आहेत.

### ७५० युनिट रक्त गोळा केल्याबद्दल मानस

श्री गणेशदास राठी छात्रालय समितीने आपली सामाजिक जबाबदारी पार पाडत अमृत महोत्सव वर्षात ७५० युनिट रक्त गोळा करण्याचे ध्येय ठेवले आहे. या रक्तदान शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. अमृत महोत्सवात मुलांच्या मनोरंजनावर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल, तीन सत्रांच्या कार्यक्रमात दररोज मनोरंजक कार्यक्रमांची मालिका सादर केली जाईल.

### मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य

कालांतराने, ही संस्था आधुनिक शिक्षण प्रणालीसाठी अथक प्रयत्न करत आहे. संपूर्ण प्रदेशात तिने मोठ्या आदराने एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. संस्था यावर्षी अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात आयोजित करत आहे. या अमृत महोत्सवाचे उद्दिष्ट मुलांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करणे, चांगले मूल्ये रुजवणे आणि त्यांना जीवनात पुढे जाण्यासाठी आणि उच्च शिक्षण मिळविण्यासाठी प्रेरणा देणे आहे. या गोष्टी लक्षात घेऊन, मुलांना, पालकांना आणि शिक्षकांना राष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या आणि देत असलेल्या प्रतिष्ठित व्यक्तींना ओळखण्याची आणि त्यांचे विचार ऐकण्याची संधी राठी छात्रालय समितीद्वारे दिली जात आहे.

### पालक आणि नागरिकांना सहभागी होण्याची विनंती

संस्थेने या महोत्सवासाठी आमंत्रित केलेल्या प्रतिष्ठित व्यक्तींना शहरातील व्यासपीठावर ऐकण्याची संधी क्वचितच मिळते. या संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा. मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# महानगरपालिकेत निवडणूक तयारीसाठी आढावा बैठक



**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी महानगर पालिकेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये निवडणूक अधिकारी व महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत नियंत्रण अधिकारी, सहाय्यक अधिकारी तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.बैठकीत विविध निवडणूक संबंधित कामकाजाचे सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये कामावर देखरेख व नियंत्रण, आचारसंहिता कक्षाचे व्यवस्थापन, कायदा सुव्यवस्था, तसेच FST, SST, VST आणि VVT या पथकांचे नियोजन व कार्यक्षम नियंत्रण या बाबींचा समावेश होता. तसेच पोलीस बंदोबस्त, CVIGIL व ESMS प्रणालीतील कामकाज आणि तक्रार कक्षाचे स्थापत्य व नियंत्रण यावरही विशेष भर देण्यात आला.

बैठकीत एक खिडकी सेवा, मनुष्यबळ व्यवस्थापन, मतदान व मतमोजणी कर्मचारी व्यवस्थापन, मतमोजणी केंद्र व Strong Room व्यवस्थापन, Sveep Plan, मतदार केंद्र व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्थापन, निवडणूक कर्मचारी प्रशिक्षण, साहित्य पुरवठा आणि आवश्यक फॉर्मच्या छपाई व वितरण याबाबत सविस्तर चर्चा झाली.त्याचबरोबर EVM इंचार्ज व संबंधित साहित्याचे वाटप, फर्निचर पुरवठा, खर्चाचा हिशोब, लेखा परिक्षण, श्ण्श्ण जाहिरात प्रमाणन, माहिती कक्ष व्यवस्थापन, स्थायी समिती हॉल व्यवस्थापन, अहवाल सादरीकरण, पत्रव्यवहार, PPT व र्धेनी नोट्स तयार करणे, संगणकीकरण, माहिती संकलन व रिपोर्ट तयार करणे या बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

मतदान केंद्र व मतमोजणी केंद्राची स्वच्छता तसेच मतदान व मतमोजणी प्रक्रियेदरम्यान भोजन व्यवस्था आणि इतर सुविधा यावरही बैठक काळजीपूर्वक थांबून चर्चा केली. तसेच झोन कार्यालय व्यवस्थापन व कर्मचारी व्यवस्थापन याबाबत नियोजनाचा आढावा घेतला.निवडणूक अधिकारी व महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी बैठकीत अधिकाऱ्यांना सर्व बाबतीत सतत नियंत्रण ठेवण्याचे आणि वेळेवर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक पायरीवर नीट नियोजन, सुरक्षितता व पारदर्शकता राखणे अत्यंत आवश्यक आहे.

ही बैठक अमरावती महानगरपालिकेतील निवडणूक तयारीतर्फे घेतलेल्या उपाययोजनांचा सखोल आढावा असून, आगामी निवडणुकीत पारदर्शक, सुरक्षित व सुचारू मतदान प्रक्रियेची सुनिश्चितता करण्यासाठी महत्त्वाची पावले उचलण्यात आली आहेत.

## महानगरपालिका क्षेत्रात निवडणुकीसाठी 'एक खिडकी कक्षा'ची स्थापना

**अमरावती/का.प्र.**

सार्वत्रिक निवडणूका २०२५ च्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मतदान व निवडणूक प्रक्रिया अधिक सुरळीत, पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावी, यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या वतीने 'एक खिडकी कक्षा'ची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षामुळे उमेदवार, राजकीय पक्ष तसेच संबंधित यंत्रणांना निवडणूकीसंदर्भातील विविध परवानग्या मिळवणे अधिक सोपे व वेळेची बचत करणारे ठरणार आहे.

सदर एक खिडकी कक्षाचे नियंत्रण अधिकारी म्हणून सागर रा. वानखडे, सहायक संचालक नगररचना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक अधिकारी व कर्मचारी वर्ग कार्यरत असून, निवडणूक काळात येणाऱ्या विविध अर्ज व परवानग्यांवर तात्काळ व नियमबद्ध कार्यवाही केली जाणार आहे.या एक खिडकी कक्षामार्फत उमेदवारांना प्रचारासाठी आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या परवानग्या देण्यात येणार आहेत. प्रचार सभा, चौक सभा, बैठक सर्व प्रकारच्या जाहीर सभांसाठी परवानगी, प्रचारासाठी पोस्टर व झेंडे सभा स्थळावर तसेच इतर ठिकाणी लावण्याची परवानगी, खाजगी जागेवर जाहिरात फलक उभारण्यासाठी परवानगी यांचा समावेश आहे. तसेच उमेदवाराच्या कार्यक्षेत्रापुरते प्रचार वाहन वापरण्याची परवानगी, प्रचार कार्यालय सुरू करण्याची परवानगीही या कक्षामार्फत देण्यात येणार आहे.

याशिवाय, हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरवण्यासाठी परवानगी, ध्वनिक्षेपक वापरण्याची परवानगी, मिरवणूक, रोडशो व रॅली काढण्यासाठी परवानगी, केबल जाहिरात तसेच व्हिडिओ व ऑडिओ क्लिप्सच्या प्रसिद्धीसाठी परवानगी देण्याचे कामकाजही या एक खिडकी कक्षामार्फत केले जाणार आहे. निवडणूक प्रक्रियेशी संबंधित इतर सर्व तदनुषंगिक कामकाजही या कक्षातून पार पडणार आहे.एक खिडकी कक्ष अमरावती महानगरपालिका, राजकमल चौक येथील मुख्य इमारतीमध्ये सहाय्यक संचालक नगररचना कार्यालय, दुसरा माळा येथील इंजिनियर्स केबिनमध्ये स्थापन करण्यात आला आहे. निवडणूक काळात उमेदवार व संबंधितांना एकाच ठिकाणी सर्व परवानग्या मिळाव्यात, प्रशासनावरचा ताण कमी व्हावा तसेच निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक राहावी, या उद्देशाने ही व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक संचालक नगररचना, अमरावती महानगरपालिका यांनी दिली आहे.

# महापालिका निवडणुकीसंदर्भात प्रतिनिधींसोबत चर्चा



**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिका निवडणूक २०२५-२०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेची तयारी, नियोजन व अंमलबजावणी याबाबत निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. ही बैठक विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, अमरावती येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये आदर्श आचारसंहितेचे पालन, प्रचार नियम, निवडणूक खर्च मर्यादा, तसेच शांततापूर्ण व निष्पक्ष निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी घ्यावयाच्या उपाययोजनांचा समावेश होता.निवडणूक अधिकारी तथा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना मार्गदर्शन करताना सांगितले की, लोकशाही व्यवस्थेतील निवडणूक ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून ती पारदर्शक, निर्भय आणि कायदेशीर पद्धतीने पार पाडणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यासाठी सर्व राजकीय पक्षांचे सहकार्य आवश्यक असून निवडणूक आयोगाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी आपले प्रश्न व सूचना मांडल्या. या सर्व बाबींवर निवडणूक अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती दिली.

बैठकीदरम्यान निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच सर्व नागरिकांना निर्भय वातावरणात मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी प्रशासन सज्ज असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

या बैठकीस निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, अमरावती महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी, निवडणूक विभागाचे कर्मचारी तसेच विविध राष्ट्रीय व स्थानिक राजकीय पक्षांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित होते. संपूर्ण बैठक सकारात्मक व सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली.

# आज कुणावर उधळणार गुलाल?

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीची मतमोजणी रविवार, २१ डिसेंबर रोजी होणार असून, त्याआधीच राजकीय वातावरण तापले आहे. विविध राजकीय पक्षांचे, आघाडी उमेदवारांचे कार्यकर्ते आणि समर्थक सोशल मीडियावर 'गुलाल आमचाच' अशा पोस्ट टाकत विजयाचा दावा करताना दिसत आहेत. या पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, त्यामुळे निवडणूक निकालाबाबतची चर्चा आणखी रंगत आहे.

कार्यकर्ते, मतदारांमध्ये कोणत्या प्रभागात कोण उमेदवार निवडून येणार तसेच नगराध्यक्ष पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार? याबाबत पैजा लागल्या आहेत. मतमोजणीचा दिवस जसजसा जवळ येत आहे.

तसतशी उमेदवारांमध्ये धाकधूक वाढताना दिसत आहे. निकाल आपल्या बाजूने लागेल, या आशेवर कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत असला, तरी प्रत्यक्ष निकालाबाबत अनिश्चितता कायम आहे. दुसरीकडे, मतदारांमध्येही कोण निवडून येणार?

**निकाल चुरशीचा ठरण्याची शक्यता**

निवडणुकीत अटीतटीची लढत पाहायला मिळाली. विकासकामे, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, करप्रणाली यासारख्या मुद्द्यांवर निवडणूक प्रचार रंगला होता. अनेक नव्या चेहऱ्यांनीही यंदा निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतल्याने निकाल अधिकच चुरशीचा ठरण्याची शक्यता आहे.

**सोशल मीडियावर कार्यकर्त्यांचा जल्लोष, उत्सुकतेचे वातावरण, उमेदवारांत धाकधूक**

याबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. निवडणुकीचे मतदान २ डिसेंबर रोजी झाल्यानंतर ३ रोजी निकाल जाहीर होणार होता. मात्र, अचानक निवडणूक आयोगाकडून काही नगरपरिषदेच्या निवडणुका न्यायालयीन कारणास्तव २० डिसेंबर रोजी घेण्याबाबत निर्देश देत नगरपरिषद, नगरपंचायतीचे निकाल पुढे ढकलल्याने आता रविवार, २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे आता या निवडणूक निकालाची प्रत्येक दिवशी प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. गल्लोगल्ली कोण निवडून येणार? याबाबत अंदाज बांधले जात आहेत.

सगळीकडे निकालाची चर्चा

चौकाचौकात, चहाच्या टपऱ्यांवर आणि बाजारपेठेत निवडणूक निकालावर चर्चा रंगताना दिसत आहे. कोणता उमेदवार विजयी होणार, कोणाला किती मते मिळणार? यावर जोरदार खलबते सुरू आहेत. काही ठिकाणी तर निकालाबाबत पैजाही लावल्या जात असल्याचे चित्र आहे. कोणाला किती मते मिळणार, कोण कोणाची मते खाणार, याची चर्चा आहे.

सोशल मीडियावर विविध दावे, अंदाज आणि पोस्टमुळे मतदारांमधील कुतूहल आणखी वाढले आहे. मात्र, हे सर्व अंदाज आणि चर्चांना पूर्णविराम लागणार तो २१ तारखेला होणाऱ्या मतमोजणीनंतरच चित्र स्पष्ट होणार आहे.

**राजकीय घडामोडींना येणार वेग**

रविवार, २१ डिसेंबर रोजी नगरपरिषद, नगरपंचायतींचा निकाल जाहीर होताच राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे.

नागरिक, कार्यकर्ते आणि उमेदवार निकालाच्या प्रतीक्षेत असून, शहराच्या विकासाची दिशा ठरवणारा हा निकाल काय निर्णय देतो? याकडे लक्ष लागले आहे.

# मतदान टक्केवारी वाढविण्याकरिता नव मतदारांना साद

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक२०२५-२६ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्या करिता अमरावती महानगपालिके ेनाज मार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नव मतदारांना आवाहन करण्याकरिता सौम्या शर्मा चांडक, आयुक्त तथा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनात ेनाज विभागाच्या वतीने श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय येथे मतदानाची शपथ हा उपक्रम राबविला गेला. यामध्ये ५०० विद्यार्थ्यांना मतदानाची शपथ देण्यात आली.तसेच मतदान करणे का आवश्यक आहे याबदल माहिती देऊन मतदानाचे महत्व या माध्यमातून सर्वापर्यंत पोहचण्याचाच प्रयत्न केला जातं आहे.



मतदानाचा वाढावा टक्का महानगरपालिकेचा निर्धार पक्का


याकरिता ेनाज नोडेल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी डॉ प्रकाश मेश्राम, पंकज कुमार सपकाळ,साबळे , योगेश पखाले शाळा निरीक्षक, कैलास कुलट, उज्वल जाधव, योगेश राणे, संजय बेलसरे, निजामउद्दीन काझी, शुभांगी सुने, सुषमा दुधे, सुमेश वानखडे हे उपस्थित होते.

# बालगुन्हेगारीला आळा घालणे काळाची गरज

आज विदर्भातील बऱ्याच भागात बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. याच बालगुन्हेगाराचे युवा पिढीत रुपांतर झाल्यानंतर त्यांना नक्षलवादी, आतंकवादी या उपाध्या मिळण्यास वेळ लागणार नाही. गेल्या काही महिन्यात अमरावती जिल्हयात बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये चोरी तस्करी, हत्या यांचा समावेश आहे. आपल्या अधोगतीला माणूस स्वतःच जवाबदार असतो हे वास्तव असले तरीही त्याच्या सभोवतालचे वातावरण व पाररिस्थीतीचा यामध्ये मोलाचा वाटा असतो हे विसरून चालणार नाही. याला जबाबदार असणाऱ्या बाबींमध्ये पुढील घटकांचा समावेश करता येईल.

उंचावलेली शिक्षण प्रणाली -१० वी १२ वी नंतर मोफत शिक्षण पूर्ण होत, खर्चिक शिक्षणाला सुरुवात होते. वाढत्या महागाईमुळे पोट भरणे, वैयक्तीक गरजा भागविणे, शैक्षणिक खर्च या सर्वाचा ताळमेळ अपुऱ्या पैशात लावणे हे या प्रवृत्तीच्या लोकांसाठी आव्हान असते. अंगी असलेल्या गुण कौशल्यापेक्षा शैक्षणिक खर्चाचा डोंगर त्यांना अधिक स्पष्ट दिसतो. 'काम आणि शिक्षण' बापुजीच्या या सुत्राची सांगड त्यांना घालणे जमत नाही. परिणामी गुन्हेगारी प्रवृत्ती जन्म घेते.

इंटरनेट मोबाइलचा दुरुपयोग-विनाविलंब संपर्क व आवश्यकतेनुसार तांत्रिक कामे एवढेच मोबाईलचे कार्य असून मात्र नको ती कामे करण्यासाठी या तंत्राचा अधिक वापर केला जात आहे. दिवसभर बरी-वाईट चित्र पाहुन त्याचेच चिंतन करुन त्याप्रमाणे वागण्याची प्रवृत्ती मुलांमध्ये बळकावत



चालली आहे. गुन्हेगारीकडे नेणारा हा सर्वात सोपा मार्ग म्हणता येईल.

वाढते स्पर्धात्मक युग-जो पेपर पोलीस निरीक्षकाला द्यावा लागत होता. त्या दर्जाचा पेपर आज पोलीस शिपायाला द्यावा लागतो. साध्या चपराशाला सुद्धा आज स्पर्धा परीक्षा द्यावी लागते. क्लासेस करतो म्हटले की, लाखो रुपये खर्च तेव्हा या स्पर्धात्मक धावपळीत आपण कुठे आहे. या संभ्रमात बरीच मुले स्वतः ला कमी लेखतात आणि अभ्यास, मेहनत, चिकाटी या त्रिसुत्रिला विसरून कर्तव्याला मुकतात.

बेरोजगारीची समस्या :-वरील घटकांचा विचार करता आला पुढे काय? महागाईच्या या काळात मजुरीच्या भरवशावर साधे पोट भरणे कठीण, तेंव्हा संसाराचे गाडे कसे चालविणार.कुणाचे आर्थिक पाठबळ नाही, पडीत जमिन पिकत नाही इत्यादी नकारात्मक विचारांनी ग्रासून स्वविकासातील सर्वात मोठा अडथळा स्वत:च बनतात व अधःपतनाकडे वाटचाल करतात.

बिघडलेले राजकारण-आज राजकीय वर्तुळात गुंडगिरीचे व अफरातफरीचे प्रमाण अधिक वाढले आहे. राजकिय नेत्यांची मुलंबाळं बेभान होऊन वागतात. यातच ते गरीब मुलांना, युवकांना टार्गेट बनवून त्यांच्याकडून थोड्या पैशात नको ती कामे करून घेतात. अशातच बालगुन्हेगारीचा जन्म होऊन पुढे ही प्रवृत्ती बळावते. राजकिय नेते स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याचा काटा काढून आपला मार्ग कसा मोकळा करता येईल यासाठी कमी वयाच्या युवकांचा आधार घ्यायला मागे पुढे पाहत नाही. बालगुन्हेगारीला प्रोत्साहन मिळविण्याचे हे एक कारण आहे.

पैसे कमविण्याचा शॉर्टकट-कमी मेहनत,कमी काळात जास्त पैसे, गुन्हेगारीच्या जगताचे हे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक स्तरावरील गुन्हेगारीचे प्रमाण यामुळे दिवसेंदिवस वाढत आहे. कमी वयाच्या मुलांना थोड्या पैशाचे आमिष देऊन, मोठ-मोठी हत्याकांडामुळे घडत आहे.गुन्हेगारीचे वाढते प्रमाण लक्षात होता यावर आळा घालणे ही काळाची गरज आहे. परिवारापासून दूर राहणारे बाल कारागृह, होस्टेल, आश्रमशाळा इत्यादी ठिकाणी असणाऱ्या मुलांना आर्ट ऑफ लिव्हींगचे महत्व पटवून देणे, शैक्षणिक विकासाबरोबरच आध्यात्मिक विकासाला प्रोत्साहन देणे समस्येतून मार्ग कसा काढावा याचे ज्ञान इत्यादी घटकांचा उपक्रम राबविल्यास मुले स्वत:चा विकास साधण्यास प्रवृत्त होऊन सकारात्मक उर्जा त्यांच्यामध्ये प्रवाहीत होईल. परिणामी समाजाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन बदलल्या शिवाय राहणार नाही. हे तेवढेच खरे.

**साहेबराव राऊत, पवन इंगोले**
अंजनगाव बारी, अमरावती
मो.नं. ८८०६०३६२६२

# अकोला महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजप सज्ज

## '२१ सूत्री विजय मंत्र' देत ना. बावनकुळेंचे मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | अकोला ■

***अकोला शहराला विकसित व संकल्पित करण्यासाठी आगामी महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना जनता जनार्दन निवडून देईल, असा विश्वास भाजपा महाराष्ट्र निवडणूक प्रभारी व महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. कार्यकर्त्यांनी महायुतीच्या कामांचा जोगावा मागत केंद्र, राज्य आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विकासकामांची माहिती देणारी पत्रके घरोघरी पोहोचवावीत, असे आवाहन त्यांनी केले.***

स्थानिक सिटी स्पोर्ट येथे आयोजित भाजपा पदाधिकाऱ्यांच्या संवाद बैठकीत ते बोलत होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जयंत मसणे होते. मंचावर भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, विजय अग्रवाल, संतोष शिवरकर, किशोर पाटील, वैशालीताई शेळके, अर्चनाताई मसणे आदी उपस्थित होते.

नामदार बावनकुळे यांनी महानगरपालिका जिंकण्यासाठी '२१ सूत्री विजय मंत्र' देत मायक्रो प्लॅनिंग करण्याचे निर्देश दिले. देवेंद्र फडणवीस व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या कामगिरीवर जनता समाधानी असून त्याचा लाभ पालिका निवडणुकीत भाजपाला होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी विविध शासकीय योजनांची माहिती देत कार्यकर्त्यांना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले.



**भाजपा कार्यकर्ता 'देवदुर्लभ' – डॉ. कोठेकर :** भाजपा कार्यकर्ता हा देवदुर्लभ असून स्वतःचा व्यवसाय सांभाळत समाजकारण व राष्ट्रनिर्मितीसाठी झटणारा आहे. या कार्यकर्त्यांच्या बळावरच भाजपा देशातील सर्वात मोठी संघटना बनली असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही मोठे यश मिळेल, असे मत संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर यांनी मांडले. ३१ डिसेंबरपर्यंत विविध कार्यक्रम राबविण्यात येतील, अशी माहितीही त्यांनी दिली.

प्रत्येक प्रभागात महिला सहभागासह सामाजिक समीकरणांचा विचार करून विविध घटकांशी संवाद साधण्यासाठी कार्यकर्त्यांच्या टीम कार्यरत राहतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच राज्यातील इतर नेत्यांचे कार्यक्रम व सभा होणार असून अकोला महानगराचा विशाल संमेलन आयोजित करून नागरिकांशी थेट संवाद साधण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

**महायुतीसाठी प्रयत्न सुरू – आमदार सावरकर :** महायुती व्हावी ही प्रदेश व स्थानिक नेत्यांची इच्छा असून त्या दृष्टीने चर्चा सुरू असल्याचे आमदार रणधीर सावरकर यांनी सांगितले. लवकरच महायुतीचा आकार जनतेसमोर येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अकोला शहरातील १६ प्रभागांमध्ये पत्रक वाटप पूर्ण झाले असून कार्यकर्ते निवडणुकीसाठी सज्ज असल्याचे त्यांनी नमूद केले. खासदार अनुप धोत्रे यांनी विजयासाठीचे मंत्र सांगत कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकदीने कामाला लागावे, असे आवाहन केले. विजय अग्रवाल यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन गिरीश जोशी यांनी तर आभार प्रदर्शन जयंत मसने यांनी केले. या बैठकीसाठी निवडक २२२ कार्यकर्त्यांना आमंत्रित करण्यात आले होते. बैठकीत आगामी निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

## बालवयातच विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन विकसित व्हावा : अभिलाष तायडे



### एमजेपी स्कूल ऑफ स्कॉलर्स येथे फन अँड फूड आनंद मेळा

■ प्रतिनिधी | पारस ■

विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायिक विचारसरणी, आत्मविश्वास व स्वावलंबन निर्माण व्हावे या उद्देशाने एमजेपी स्कूल ऑफ स्कॉलर्स, पारस येथे शनिवार, दिनांक २० डिसेंबर रोजी फन अँड फूड आनंद मेळाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन अभिलाष प्रकाश तायडे यांनी केले. या आनंद मेळ्याचे उद्घाटन प्रमुख पाहुणे बंडू भाऊ इंगळे व मानतोष मोहाड यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास शाळेचे व्यवस्थापकीय संचालक अभिलाष तायडे, मिटकरी, अमोल इंगळे, साकीब, शाळेच्या प्राचार्या अंजू भोपाळे तसेच खंडारे सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

आनंद मेळ्यात विद्यार्थ्यांनी ३० पेक्षा अधिक स्टॉल्स उभारले होते. या स्टॉल्समध्ये विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, हस्तकला साहित्य व आकर्षक वस्तूंची विक्री करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यवसाय नियोजन, आर्थिक व्यवहार, ग्राहकांशी संवाद तसेच संघभावना यांचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. कार्यक्रमास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने पालकांनी उपस्थिती दर्शविल्याने आनंद मेळा अत्यंत यशस्वी ठरला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, असे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## जिल्हाधिकारी यांच्याकडून विविध कृषी प्रकल्पांची पाहणी



■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील विविध कृषी प्रकल्प, कृषी योजनाधारित व्यवसाय प्रकल्प आदींची जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी गुरुवारी पाहणी केली.

जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी कुंभारी येथे राज्य पुरस्कृत एकात्मिक सोयाबीन व इतर गळीतधान्य प्रकल्पाअंतर्गत शेत बांधावरील जैविक निविष्ठा प्रयोगशालेला भेट देऊन पाहणी केली. तसेच भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनाअंतर्गत फळबाग लागवडीची पाहणी केली.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे , प्रकल्प संचालक आत्मा मुरली इंगळे , उप विभागीय कृषी अधिकारी विवेक बिऱ्हाडे , तालुका कृषी अधिकारी विलास वाशीमकर उपस्थित होते.

**बोदडे डेअरीला भेट :** जिल्ह्यातील मौजे वणी रंभापूर तालुका अकोला येथील बोदडे डेअरीला जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी भेट दिली. डेअरी चे व्यवस्थापक मयूर बोदडे यांनी कृषि विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत अर्ज लाभ घेतला.

## चतारी ते तुलंगा बू. रस्ता जीवघेणा

### खड्डयांमुळे अपघातांचा धोका वाढला; नागरिक संतप्त

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील चतारी–सांगोळा–तुलंगा बू. हा महत्त्वाचा रस्ता सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत असून, नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. रस्त्यावर मोठमोठे व खोल खड्डे पडले असून अनेक ठिकाणी खडे विखुरलेले आहेत. पावसामुळे हे खड्डे पाण्याने भरल्याने वाहनचालकांना अंदाज येत नसून अपघातांचा धोका अधिकच वाढला आहे.

या मार्गावरून दररोज शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, कामगार व व्यापारी मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. मात्र रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे प्रवासाला विलंब होत असून वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. काही दिवसांपूर्वी याच रस्त्यावर झालेल्या अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

सामाजिक कार्यकर्ते व फार्मासिस्ट विकास किर्तने यांनी रस्त्याची पाहणी करून तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून रस्त्याची अवस्था अत्यंत खराब असून अनेक अपघातांमध्ये नागरिक जखमी झाले आहेत. मात्र वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.जर त्वरित रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली नाही, तर याच रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.



'गेल्या अनेक महिन्यांपासून चतारी–सांगोळा–तुलंगा बू. या रस्त्याची अक्षरशः चाळणी झाली आहे. मोठमोठ्या खड्डयांमुळे अनेक अपघात झाले असून नागरिक जखमी झाले आहेत. तरीही संबंधित विभागाला जाग आलेली नाही. रस्त्याची त्वरित दुरुस्ती करावी, अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल.'
**विकास किर्तने**
सामाजिक कार्यकर्ते व फार्मासिस्ट, चतारी

जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापूर**
**श्रीमती डि.एम.पाटील यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर. बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/३१३/२०२५
त्र्यंबकराव शेषराव उमाळे वि. कोणीही नाही
पुढिल तारिख : ३०-०१-२०२६

**अर्जदार :** १. त्र्यंबकराव शेषराव उमाळे वय अं. ६५ वर्ष धंदा शेती रा. बोरवाकडी पो. पारस ता. बाळापुर जि. अकोला २. सौ. मंगलाबाई नारायण काळे उर्फ मंगलाबाई शेषराव उमाळे वय अं. ६५ वर्ष धंदा घरकाम रा. रिधोरा ता. बाळापुर जि. अकोला. ३. सौ. वैशाली विजय काटोले वय अं.५० वर्ष धंदा घरकाम रा. वार्ड कं.१ गांधीग्राम ता.जि. अकोला ४. सौ. लताबाई रमेश मांगटे उर्फ लताबाई शेषराव उमाळे वय अं.४५ वर्ष धंदा घरकाम रा. व्याळा ता.बाळापुर जि.अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत सौ. सुमनबाई शेषराव उमाळे हे दिनांक ३०.०७.२०२३ रोजी बोरवाकडी पो. पारस ता.बाळापुर जि. अकोला येथे मरण पावले. मयत शेषराव शामराव उमाळे हे बरेच वर्षापुर्वी मरण पावले. वरील नमुद अर्जदार यांना मयत सौ. सुमनबाई शेषराव उमाळे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ३०.०१.२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १२.१२.२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३१२/२०२५ प्रोसेस नं.२०६१०/२०२५
चौ.ता. २९/०१/२०२६ दिनांक : १७/१२/२०२५

**अर्जदार :** १. सौ. वर्षा गणेश पोखरकर रा. मालीपुरा, टाउन हॉल जवळ, ओल्ड जालना, ता. जि. जालना २. सौ. पल्लवी मंगेश जोशी रा. रणपिसे नगर, सावंत चक्की जवळ, अकोला. ३. सुमेधा पंकज कुलकर्णी रा. सी-१९, सं. टाईप क्वार्टर, सिंधीग्राम, ता. सुत्रपर्दी, गरबा गरूड जवळ, सुत्रपदा, प्रश्नावाडा, गिर सोमनाथ, गुजरात.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मधुसुदन अनंत साबदे
**पत्ता :-** रा. रणपिसे नगर, सावंत चक्की जवळ, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुसुदन अनंत साबदे यांचे दि. ०४/११/२०२५ रोजी ओझोन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/ १२/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## कर्मयोगी संत गाडगेबाबांना भारतरत्न जाहीर करा - बाळासाहेब नेरकर

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

भारत सरकारने संत गाडगेबाबांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानीत करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब नेरकर यांनी केली आहे. हिवरखेड येथे सौ. छायाताई कौसकर यांच्या पुढाकारातून त्यांच्या निवासस्थानी कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या पुण्यतिथीचा मोठा कार्यक्रम पार पडला. यावेळी हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

अंधश्रद्धेने बरबटलेल्या समाजाला देव दगडात नाही देव हा दिव्यांग रोगी, निराश्रीतांच्या सेवेत शोधा, त्यांची भूक तहान दवा कपडा लत्ता देऊन त्यांना मदतीचा हात द्या, तो परमात्मारुपी आत्मा तुम्हाला तुमच्या लेकरा बापड्याना नक्कीच आशीर्वाद देईल. असे गावोगावी किर्तनातुन लोकाना खरे ज्ञान देनारे संत म्हणजे गाडगेबाबा होते.



त्यांचा जन्म एका परिटा च्या घरी म्हणजे बाप झिंगराजी जानोरकर व आई सखूबाईच्या पोटी झाला. त्यांचे नाव डेबुजी... डेबुला शाळेत दाखल केले पण गरीबीचे चटके सहन करणाऱ्या कूंटुबाची गत काय असते डेबुजीले लहानपनात वडीलाची छ्त्रछाया हरवल्यावर माहीत पडले. त्यांची आई सोबत मामाच्या गावाला घेऊन गेली. तीथे गुरे ढोरे चारण्यासाठी डेबुजी जाऊ लागले कुंताबाईशी वैवाहीक जिवन जगताना त्यांनी संसाराचा गाडा हाकताना कूठे तरी समाजात बदल व्हावा म्हनून घरा दाराचा मोह सोडुन वयाच्या २९ व्या वर्षी सर्व भारत भुमीतील समाजाला आपले समजून जीथे जात ते गाव स्वच्छ करत, अंगी थीगळ असलेला स्वच्छ धूतलेला सदरा व पंचा नेसलेले व हातात खराटा हा पेहराव असलेले बाबा तहान लागली तिथे मातीचे अर्धवट फूटलेले खापर म्हनजे अर्धे गाडगे त्यामधे लोकाना पिण्यास पानी मागने असे पेहरावा मूळे लोक गाडगे बाबा म्हनून हाका मारत. बाबा फुकट कूठेच खात नसत कूऱ्हाड मागून कूनाचे बंडीभर इंधन फोडून देत. नाली काढने, आंगण झाडुन देत, दिवसा ते पुर्ण गाव खऱ्याट्याने झाडून स्वच्छ करत व संध्याकाळी देवळा समोर पाराजवळ गोट्याचे टाळ करून गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला चा गजर करत. लोकांना कीर्तनासाठी जमा करत. आपल्या विदर्भाच्या मातीचा बुलंद कनखर आवाजात लोकाना अज्ञानरुपी अंधकारातुन बाहेर निघण्याचा मार्ग दाखवत.

## मनपात एक खिडकी कार्यान्वीत

**अकोला :** महानगर पालिका सार्वत्रिक निवडणुकीकरिता लागणारी सर्व परवानगी देण्याकरिता निवडुक लढविणा-या इच्छुक उमेव्दारांना लागणा-या परवानग्या घेणे अधिक सोईचे व्हावे याकरिता मा.राज्य निवडणूक आयोग यांच्या निर्देशाप्रमाणे तसेच मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये दि. १९ डिसेंबर २०२५ पासून अकोला महानगरपालिकेच्या गांधी रोड वरील मुख्य कार्यालय येथे एक खिडकी योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे. या एक खिडकी योजना अंतर्गत निवडणूक लढविणा-या इच्छुक उमेव्दारांना पाणी पट्टी कर, मालमत्ता कर व मनपाचे इतर दायित्व तसेच शौचालय बाबतचे, मनपाचे कंत्राटदार नसल्याचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच मंडप, कमानी, ध्वज, बॅनर साठी लागणारी परवानगी याचसोबत परवानगीसाठी लागणारे दर ची माहिती देण्यात येणार आहे.

## शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांना मानद डॉक्टरेट

■ प्रतिनिधी | अकोला ■

नैसर्गिक शेती व जैविक मिशन अंतर्गत शेती व शेतकऱ्यासाठी गेल्या ४ दशकापासुन बहुमूल्य कामगिरी करणारे शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांना छत्रपती शिवाजी महाराज लोकविद्यापीठ अमरावती व्दारा मानद डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात येणार असल्याची माहीती किसान ब्रिगेडचे अध्यक्ष दिवाकर गांवडे यांनी दिली.छत्रपती शिवाजी महाराज लोकविदयापीठा व्दारे प्रकाश पोहरे यांच्या कार्याची दखल घेवुन दिलेला सन्मान हा चळवळीचा एक प्रकारे गौरव असल्याचे गांवडे यांनी सागितले.प्रकाश पोहरे हे भारतीय किसान - संघ परिसंघ,भारतीय भाशिक वृत्तपत्र संघटणेचे व किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष आहे.पत्रकार क्षेत्रातील हा सन्मान आमच्यासाठी गौरवास्पद असल्याचे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष शौकतअली मिर साहेब यांनी सागितले आहे.शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांच्या सन्मान २८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता नेहरू पार्क येथे करण्यात येणार आहे.या कार्यक्रमाला तामीळनाडु सरकारचे माजी मुख्य सचिव विश्वनाथ शेगावकर व मराठा सेवा संघाचे सस्थापक अध्यक्ष पुरूषोत्तम खेडेकर व लोकविदयापिठाचे महासंचालक मंगेशराव देशमुख व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सन्मान सोहळयाला नागरिकांनी उपस्थित राहावे अशे आवाहन किसान ब्रिगेडचे शरद वानखडे, प्रदीप पाटील, भगवंतराव गवळी, राजेश मावळे, रामधन दामोदर व किसान ब्रिगेडचे प्रवक्ते धनंजय मिश्रा यांनी केले.



## आज २१ शिलेदारांचा फैसला : हिवरखेड नगरपरिषद पहिल्या निवडणुकीच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

पंचवीस वर्षांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर अस्तित्वात आलेल्या हिवरखेड नगरपरिषदेच्या पहिल्या निवडणुकीनंतर आता नगराध्यक्ष पदासह २० नगरसेवक पदासाठी निवडून येणाऱ्या २१ शिलेदारांचा फैसला २१ डिसेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे उमेदवारांसह संपूर्ण हिवरखेड परिसरात निकालाबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

मतमोजणी प्रक्रियेसाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून निवडणूक निर्णय अधिकारी परशराम भोसले, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी दादाराव डोल्हारकर आणि नायब तहसीलदार विकास राणे यांच्या नेतृत्वाखाली मतमोजणीची सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे. दिनांक २१ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता प्रथम एका टेबलवर पोस्टल मतदानाची मोजणी होणार असून त्यानंतर चार टेबलवर ईव्हीएम मशिनद्वारे पाच फेऱ्यांत मतमोजणी करण्यात येणार आहे. मतमोजणी पूर्ण होताच निकाल तात्काळ जाहीर करण्यात येणार असल्याने विजयी उमेदवारांच्या समर्थकांकडून जल्लोषाची तयारी सुरू आहे. नगराध्यक्षपदी कोण बाजी मारणार आणि २० नगरसेवकांपैकी कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.



**राज्य महामार्गावरील वाहतुकीत मोठा बदल :** मतमोजणी केंद्र हे अकोट– हिवरखेड– जळगाव जामोद राज्य महामार्गालगत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी वाहतूक वळविण्याचे आदेश दिले आहेत. दिनांक २१/१२/२०२५ रोजी सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत खालीलप्रमाणे वाहतूक वळविण्यात येणार आहे.

**अकोट कडून सोनाळा कडे जाणारी वाहने :** खंडाळा फाटा – मालठाना – तळेगाव बु. – गोर्धा फाटा

**सोनाळा कडून अकोट कडे जाणारी वाहने :** गोर्धा फाटा – तळेगाव बु. – मालठाना – खंडाळा फाटा

**पोलीसांचा भव्य पथसंचलन; मोठा फौजफाटा तैनात :** हिवरखेड नगरपरिषदेची ही पहिलीच निवडणूक असल्याने निकालाबाबतची संवेदनशीलता लक्षात घेता प्रशासन व पोलीस विभाग कोणतीही जोखीम घेण्याच्या मनःस्थितीत नाही. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच असामाजिक तत्त्वांवर वचक बसावा, या उद्देशाने निकालाच्या पूर्वसंध्येला हिवरखेड शहरातून भव्य पोलीस पथसंचलन करण्यात आले. या पथसंचलनात ठाणेदार गजानन राठोड, उपनिरीक्षक श्रीराम जाधव व उपनिरीक्षक गोपाल गिलबिले यांच्या नेतृत्वाखाली शेकडो पोलीस जवान सहभागी झाले होते. संपूर्ण शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला असून नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# पुलगावमध्ये स्थगित प्रभागांचे मतदान

## निवडणूक आयुक्त विजया बनकर यांचे मतदान केंद्रांना अचानक भेट

**पुलगाव । जनमाध्यम**
पुलगाव नगरपालिकेतील प्रभाग क्रमांक ५ व प्रभाग क्रमांक २ मधील यापूर्वी विविध कारणांमुळे स्थगित करण्यात आलेल्या निवडणुकांचे मतदान आज शांततेत सुरू आहे. सकाळी ८ वाजल्यापासून मतदान प्रक्रियेला प्रारंभ झाला असून, दोन्ही प्रभागांतील उमेदवारांचे भवितव्य आज मतपेटीत बंद झाले आहे.

प्रभाग क्रमांक ५ साठी जिल्हा परिषद कन्या शाळा येथे मतदान घेण्यात येत असून, प्रभाग क्रमांक २ चे थांबलेले मतदान चंद्रशेखर आजाद, शहीद भगतसिंग शाळा या मतदान केंद्रावर सुरू आहे. सकाळच्या वेळेत थंडीचा कडाका जाणवत असतानाही मतदारांनी मतदान केंद्रांवर उपस्थिती लावली.

**आयुक्तांची अचानक भेट**

दरम्यान, निवडणूक आयुक्त विजया बनकर यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता पुलगावमध्ये अचानक भेट देत दोन्ही मतदान केंद्रांचे निरीक्षण केले.

मतदान प्रक्रिया, मतदारांसाठी उपलब्ध सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच निवडणूक कर्मचाऱ्यांची उपस्थिती याची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांच्या भेटीमुळे निवडणूक यंत्रणेत सतर्कता वाढल्याचे चित्र दिसून आले.

**मतदान मंद, मात्र सातत्यपूर्ण**



दुपारी १२ वाजेपर्यंत सुमारे २६ टक्के मतदान झाले होते. मतदानाचा वेग काहीसा मंद असला तरी सातत्यपूर्ण सुरू असल्याने मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांब रांगा दिसून आल्या नाहीत. मागील निवडणुकीच्या तुलनेत सकाळी मतदारांचा उत्साह थोडा कमी जाणवला, मात्र दुपारनंतर मतदानात वाढ होईल, असा विश्वास उमेदवारांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

**राजकीय हालचालींना वेग**

मतदान केंद्रांच्या परिसरात विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नेत्यांची वर्दळ वाढलेली दिसून आली. प्रत्येक उमेदवार आपला विजय निश्चित असल्याचे दावे करत असल्याने प्रभागांमध्ये राजकीय चर्चा रंगताना दिसत आहेत.

**उद्या मतमोजणी**

या स्थगित मतदानाची मतमोजणी आज (दि. २१) नगरपालिकेच्या कार्यालयात होणार असून, त्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. मोठ्या प्रमाणावर शासकीय कर्मचारी व पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी खबरदारी घेण्यात येत आहे.

# निर्भीड लेखणीचा राज्यस्तरीय सन्मान

## महाराष्ट्र आदर्श पत्रकाररत्न पुरस्काराने पंकज तडस गौरवले

**सेलू जनमाध्यम**
समाजहितासाठी निर्भीडपणे लेखणी चालवणाऱ्या पत्रकारितेला राज्यस्तरावर मान मिळाला आहे. शिव प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय 'महाराष्ट्र आदर्श पत्रकार रत्न पुरस्कार २०२५' यंदा वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्याचे पत्रकार पंकज दामोदर तडस (मु. पो. घोराड) यांना जाहीर झाला आहे. पुणे येथे रविवारी, २१ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या समारंभात त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील ज्वलंत प्रश्न, शेतकरी, कामगार, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न निर्भीडपणे मांडत सातत्यपूर्ण आणि समाजाभिमुख पत्रकारिता केल्याबद्दल पंकज तडस यांच्या कार्याची दखल घेत शिव



प्रतिष्ठानने हा पुरस्कार जाहिर केल्याचे संस्थेच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे.पत्रकारितेला केवळ व्यवसाय न मानता समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणून जोपासणाऱ्या पंकज तडस यांनी अनेक संवेदनशील विषय निर्भीडपणे मांडले. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि समाजघटकांना आरसा दाखवणाऱ्या त्यांच्या लेखनामुळे अनेक प्रश्नांना न्याय मिळण्यास हातभार लागला आहे. सत्य, पारदर्शकता आणि लोकहित या मूल्यांशी तडजोड न करता त्यांनी पत्रकारितेची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली, असे मत पुरस्कार निवड समितीने व्यक्त केले आहे.या पुरस्कारामुळे केवळ पंकज तडस यांचाच नव्हे तर संपूर्ण वर्धा जिल्ह्याच्या पत्रकारितेचा गौरव वाढला आहे. पुरस्कार जाहीर होताच जिल्हाभरातून पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हा सन्मान नव्या पिढीतील पत्रकारांसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त

### भरधाव दुचाकीची धडक; पादचारी जखमी

**पुलगाव :** भरधाव दुचाकीने दिलेल्या धडकेत पादचारी नंदकुमार गजभिये हे जखमी झाले. हा अपघात शहरातील आर. के. शाळेच्या गेटजवळ घडला. नंदकुमार गजभिये व प्रकाश बनकर हे दोघे रेल्वे स्थानकाकडे पायी जात असताना समोरून येणाऱ्या एम.एच. ३२ टी ९३८३ क्रमांकाच्या दुचाकीने गजभिये यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते जखमी झाले. तक्रारीवरून पोलिसांनी दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

---------------

### पैशाच्या वादातून युवकास मारहाण

**सेलू :** किरकोळ पैशाच्या वादातून दोघांनी मिळून एका युवकास लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना जोशीनगर येथे घडली. दानिश रफीक शेख (वय २९, रा. जोशीनगर) हे रात्री घरी जात असताना अमोल शेंडे व निजाम शाह यांची भेट झाली. दानिशने अमोलकडे २० रुपये मागितल्यावरून वाद झाला. वाद उफाळल्याने दोघांनी दानिशला मारहाण करून जखमी केले. या प्रकरणी सेलू पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

---------------

### सार्वजनिक ठिकाणी शस्त्र बाळगणाऱ्यास अटक

**समुद्रपूर :** सार्वजनिक ठिकाणी शस्त्र घेऊन वावरत नागरिकांत दहशत निर्माण करणाऱ्या युवकास पोलिसांनी अटक केली. चंद्रकांत उर्फ शेखर कुटारकर (वय २६, रा. गव्हा) असे अटक केलेल्याचे नाव आहे. उब्दा फाटा येथे ही कारवाई करण्यात आली. नागरिकांत दहशत पसरवित असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपीस ताब्यात घेतले.

---------------

### जुगार अड्ड्यावर छापा; पाच जण अटकेत

**वर्धा :** पांढरकवडा येथील पारधी बेड्यावर सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून पाच जणांना अटक केली. या कारवाईत २ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अजय भोसले, रोहण मोगरे, राहुल कासोर, कुणाल पाटील व अरविंद काळे यांना अटक करण्यात आली. तर राम पवार, रंजीत राऊत व कमलेश काळे हे पसार झाले. सावंगी पोलिसांनी जुगारातील रोख रक्कम, मोबाईल व दुचाकी असा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल केला.

---------------

### कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या

**हिंगणघाट :** कीटकनाशक प्राशन करून एकाने आत्महत्या केल्याची घटना गांगापूर येथे घडली. संतोष बावणे (वय ५४, रा. गांगापूर) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

---------------

### युवकास बेदम मारहाण

**वर्धा :** कार हळू चालविण्याचा इशारा दिल्याच्या कारणातून चौघांनी युवकास बेदम मारहाण केल्याची घटना बोरगाव (मेघे) येथे घडली. अतुल वैद्य (वय ३१, रा. कृष्णनगर) याने भरधाव कारचालकास हाताने इशारा केल्यानंतर कारमधील चौघांनी शिवीगाळ करीत मारहाण केली.

# वेणा नदी लुटणाऱ्यांना LCB चा लगाम

## हिंगणघाट हद्दीत ट्रॅक्टर ट्रॉलीसह १८.१८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**हिंगणघाट जनमाध्यम :**
शासनाच्या मालकीच्या वेणा नदी पात्रावर डोळा ठेवून रेतीची सर्रास लूट करणाऱ्या रेती माफियांवर स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा यांनी कारवाई करत जोरदार घणाघात केला. हिंगणघाट पोलीस स्टेशन हद्दीत अवैध रेती वाहतूक उघडकीस आणत दोन ट्रॅक्टर, ट्रॉली व रेती असा तब्बल १८ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून या प्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हिंगणघाट उपविभागात अवैध व्यवसायांविरोधात पेट्रोलिंग करत होते. याचवेळी बोरगाव शिवारातील बोरगाव घाटातून वेणा नदी पात्रातील रेती चोरून मांडगाव रोडने हिंगणघाटकडे वाहतूक सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. माहिती मिळताच

पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता सापळा रचत रेती माफियांची कोंडी केली.

कारवाईदरम्यान दोन लाल रंगाचे महिंद्रा कंपनीचे ट्रॅक्टर अडविण्यात आले. त्यातील एक ट्रॅक्टर एमएच ३४ एपी ४६०९ क्रमांकाचा असून चालक रूपेश प्रकाशराव टोंगे (वय २४, रा. कोपरा) व मालक प्रशांत देवीदास



वानखेडे (रा. बोरगाव) असल्याचे निष्पन्न झाले. तर दुसरा क्रमांक नसलेला ट्रॅक्टर चालक लक्ष्मण मधुकर घुसे (वय २४, रा. वाघोली) व मालक चंद्रकांत तुकारामजी रिठे (रा. डाग) यांचा असल्याचे उघड झाले.

दोन्ही ट्रॅक्टरच्या ट्रॉलीची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यात ओली काळी रेती (गौणखनिज) ठासून भरलेली आढळून आली. पोलिसांनी रेती वाहतुकीसाठी आवश्यक परवाने व रॉयल्टी पास मागितले असता आरोपींकडे एकही कागद नसल्याचे स्पष्ट झाले. चौकशीत सदर रेती ही शासनाच्या अधिपत्याखालील वेणा नदी पात्रातून चोरी करून आणल्याची कबुली समोर आली.

शासनाच्या तिजोरीवर दरोडा टाकत स्वतःच्या खिशासाठी पर्यावरणाचा बळी देणाऱ्या आरोपींविरुद्ध पंचनामा करून १८.१८ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपी क्रमांक १ व ३ यांच्याविरुद्ध हिंगणघाट पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून उर्वरित आरोपींची भूमिकाही तपासली जात आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक विनोद चौधरी यांच्या आदेशानुसार पार पडली. कारवाईत पोउपनि. ओमप्रकाश नागापुरे, पो.हवा. अमर लाखे, धर्मेंद्र अकाली, अमरदीप पाटील, पवन पन्नासे व पो.अं. रितेश कुन्हाडकर यांचा समावेश होता.

वेणा नदी लुटणाऱ्यांना आता माफी नाही, रेती चोरी, अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांविरोधात पुढील काळातही कारवाईची धार अधिक तीव्र राहील, असा कडक इशारा पोलिसांनी दिला आहे.

# मृत्यूला चकवा : घाटातच लालपरीचे ब्रेक फेल

## चालकांच्या धाडसामुळे ७५ चिमुकल्यांचे प्राण वाचले

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :**
क्षणभराचा विलंब आणि अख्खा घाट रक्तरंजित झाला असता, आष्टी तालुक्यातील आबाद किन्ही गावाजवळील घाटात शालेय विद्यार्थ्यांनी भरलेली लालपरी अचानक ब्रेक फेल झाल्याने मागे घसरू लागली. मागे खोल दरी आणि समोर चढणारा घाट क्षणाक्षणाला मृत्यू डोळ्यांसमोर उभा, मात्र चालकांनी प्रसंगावधान, धाडस आणि अनुभवाच्या जोरावर बस नियंत्रणात आणत ७५ विद्यार्थ्यांचा जीव वाचवला. ही थरारक घटना आष्टी तालुक्यातील घनदाट जंगलात वसलेल्या मोई तांडा व आबाद किन्ही या गावात २० डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता च्या सुमारास घडली येथील विद्यार्थी शिक्षणासाठी दररोज आष्टी शहरात ये-जा करतात. या मार्गावर वाघ, बिबट, अस्वल यांचा मुक्त संचार असतो. जीव धोक्यात घालून प्रवास करणाऱ्या



विद्यार्थ्यांसाठी ही लालपरीच एकमेव आधार आहे.

दि. २० डिसेंबर रोजी सकाळी नेहमीप्रमाणे लालपरी मोई तांडा येथे पोहोचली. तेथून आबाद किन्ही गावात जाऊन जवळपास ७५ विद्यार्थ्यांना बसमध्ये बसवून बस आष्टीकडे रवाना झाली. आबाद किन्ही ओलांडून जांब नदीवरील पूल पार करताच पुढील धोकादायक घाट चढत असताना अचानक बसचे ब्रेक फेल झाले. क्षणातच लालपरी मागे सरकू लागली. विद्यार्थ्यांमध्ये आरडाओरड सुरू झाली, पालकांच्या काळजाचा ठोका चुकला. मागे पूल, खाली दरीष्ठ पण चालकांनी घाबरून न जाता प्रसंगावधान राखले. स्टेअरिंगवर ताबा ठेवत, कौशल्याने बस बाजूला घेत मोठा अनर्थ टाळला. काही सेकंद उशीर झाला असता तर शेकडो फूट खोल दरीत बस कोसळली असती, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती तात्काळ आगार प्रमुखांना देण्यात आली. तत्काळ पर्यायी लालपरीची व्यवस्था करून सकाळी १० वाजेपर्यंत सर्व विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे शाळेत पोहोचवण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच मोईच्या सरपंच सुषमा चव्हाण व आबाद किन्हीच्या सरपंच संगीता कदम यांनी घटनास्थळी धाव घेतली. विद्यार्थ्यांना सुखरूप पाहून ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास सोडला. मात्र या घटनेने एसटीच्या देखभाल व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. विद्यार्थ्यांनी भरलेल्या बसचे ब्रेक फेल होणे ही साधी बाब नसून, प्रशासनाच्या निष्काळजीपणाची ही जिवंत साक्ष असल्याची संतप्त प्रतिक्रिया पालक व नागरिकांतून उमटत आहे. दुर्घटना घडल्यावरच जाग येणार का? असा प्रश्न उपस्थित होत असून, धोकादायक मार्गावरील लालपरींची तातडीने तांत्रिक तपासणी करण्याची जोरदार मागणी होत आहे.

# जिल्ह्यात कुष्ठरोगाचा वाढता धोका; शोध मोहिमेत १८८ नवीन रुग्ण

**वर्धा जनमाध्यम**
सन २०२७ पर्यंत कुष्ठरोग दुरीकरणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी जिल्हा आरोग्य यंत्रणेच्या वतीने १७ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत विशेष कुष्ठरोग शोध मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील तब्बल १३ लाख ५७ हजार ७२६ नागरिकांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणातून १२ हजार २६२ संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली असून, त्यामधून १८८ नवीन कुष्ठरुग्ण आढळून आले आहेत. या सर्व रुग्णांवर तात्काळ उपचार सुरू करण्यात आले आहेत.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, मोहिमेअंतर्गत लवकर निदान झाल्यामुळे विकृतीग्रस्त एकही रुग्ण आढळलेला नाही, ही दिलासादायक बाब ठरली आहे. तसेच कुष्ठरोगाचा पुढील प्रसार रोखण्यासाठी निदान झालेल्या रुग्णांच्या सहवासितांपैकी २ हजार ९४२ जणांना 'एक्सपोजरनंतरचा प्रतिबंधक उपाय' म्हणून रिफाम्पिसिनचा एक डोस देण्यात आला आहे. त्यामुळे संसर्गाची साखळी तोडण्यास मोठी मदत होणार आहे.

**शहर व ग्रामीण भागात रुग्णसंख्येत तफावत**

शहरी भागात तुलनेने कमी, तर ग्रामीण भागात अधिक रुग्ण आढळून आले आहेत.



वर्धा शहरात १ लाख १२ हजार ९३५ लोकसंख्येच्या सर्वेक्षणात ५२७ संशयितांपैकी ७ नवीन रुग्ण, हिंगणघाट शहरात १ लाख १० हजार ५०१ लोकसंख्येत ६०६ संशयितांपैकी ८ नवीन रुग्ण, आर्वी शहरात ३, तर पुलगाव शहरात २ नवीन रुग्णांचे निदान झाले.

ग्रामीण भागात वर्धा ग्रामीणमध्ये ३७, सेलू ग्रामीण १८, देवळी ग्रामीण २२, हिंगणघाट ग्रामीण १७, समुद्रपूर ग्रामीण २७, आर्वी ग्रामीण १७, आष्टी ग्रामीण १५, तर कारंजा ग्रामीण भागात २० नवीन कुष्ठरुग्ण आढळून आले आहेत.

ही माहिती आरोग्य सेवा कुष्ठरोग सहाय्यक संचालक डॉ. रा. ज. पराडकर यांनी दिली. नागरिकांनी त्वचेवरील पांढरे डाग, बधिरता, जखमा न भरणे अशी लक्षणे दिसताच तातडीने आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. लवकर निदान व नियमित उपचारांमुळे कुष्ठरोग पूर्णपणे बरा होऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# नापिकी, वाढता खर्च अन् बाजारातील मार

## शेती ठेक्याने देण्याकडे शेतकऱ्यांचा वाढता ओढा, खर्च वाढतोय, उत्पन्न घटतंय : शेती तोट्याचा सौदा

**साहूर जनमाध्यम**
दरवर्षीची नापिकी, शेतीमालाला मिळणारे नगण्य दर, बियाणे-खते-कीटकनाशकांच्या गगनाला भिडलेल्या किमती, मजुरांची टंचाई आणि निसर्गाचा लहरीपणा या सर्व घटकांमुळे शेती व्यवसाय अक्षरशः डबघाईस आला आहे. साहूर व परिसरातील शेतकरी सातत्याने तोटा सहन करत असल्याने आता शेती ठेक्याने (मक्त्याने) देण्याकडे वळताना दिसत आहेत.

**कोरडवाहू शेतीवर अवलंबित्व**

या परिसरातील बहुतांश शेती कोरडवाहू आहे. पावसाच्या अनियमिततेमुळे पीक हाती येईल की नाही, याची शाश्वती उरलेली नाही. अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांची संख्या अधिक असल्याने त्यांना शेतीसाठी दरवर्षी कर्ज काढावे लागते. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे पिके हातची जात असल्याने कर्जफेड अशक्य होत आहे.

**कर्जाचा विळखा अधिक घट्ट**

सहकारी संस्था, बँका अथवा खासगी सावकारांकडून घेतलेले कर्ज मार्चपर्यंत फेडण्याच्या अटी असतात. परंतु शेतीमालाला बाजारात मिळणारे अत्यल्प भाव, वन्य प्राण्यांकडून होणारी पिकांची नासधूस आणि वाढती महागाई यामुळे उत्पादन खर्चही निघत नाही. परिणामी कर्ज थकते आणि



पुढील वर्षी तो डोंगर अधिकच वाढतो.

**मजूर, मशागत आणि इंधन खर्चात भर**

सालगड्यांचे मानधन तसेच बैलजोडींच्या किमती लाखाच्या घरात गेल्या आहेत. ट्रॅक्टरद्वारे मशागत करताना पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीचा फटका बसत आहे. त्यातच शेतमजुरांची तीव्र टंचाई आणि वाढलेली मजुरी यामुळे शेतीचा खर्च अधिकच फुगत चालला आहे.

**निविष्ठांची महागाई शेतकऱ्यांसाठी घातक**

बियाणे, रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या किमती दरवर्षी वाढत आहेत. काही वेळा कृषी केंद्रांकडून फसवणूक झाल्याचे अनुभव शेतकरी सांगतात. वर्षभर राबराब राबूनही हाती काहीच उरत नसल्याने शेतीवरील विश्वास ढासळत चालला आहे.

**ठेक्याने शेती : हताशेतील पर्याय**

या पार्श्वभूमीवर शेतकरी निश्चित, एकरकमी रक्कम मिळावी या अपेक्षेने शेती ठेक्याने देत आहेत. यामुळे तात्पुरता आर्थिक आधार मिळत असला तरी दीर्घकालीन दृष्टीने शेती व्यवसायासाठी ही बाब चिंताजनक असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे.

**उपाय गरजेचे**

योग्य बाजारभाव, उत्पादन खर्चावर नियंत्रण, सिंचन सुविधा, वन्य प्राण्यांपासून संरक्षण आणि कर्जसवलत यांसारख्या उपाययोजना तातडीने राबविल्या नाहीत, तर भविष्यात शेतकरी स्वतः शेतीपासून दूर जाईल आणि शेती व्यवसाय ठप्प होण्याची भीती व्यक्त होत आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक २६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३


मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शहरातील वंचित मुलांसाठी आज 'दादाची शाळा'

## -आरोग्य भारती व श्री अंबादेवी संस्थान यांचा संयुक्त उपक्रम

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरातील आरोग्य भारती आणि श्री अंबादेवी संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती शहरातील वंचित मुलांसाठी दादाची शाळा हा उपक्रम राबविला जाणार आहे .त्याचा श्री गणेशा आज रविवार २१ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता केल्या जाणार आहे.




शहरात राहणाऱ्या वंचित मुलांसाठी त्यांना आश्रय मिळावा व त्यांचे भविष्य सुकर व्हावे यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. अभिजीत पोखरणीकर यांच्या मार्गदर्शनात रोहन शेंडे आणि मित्रपरिवार यांच्यातर्फे दादाची शाळा हा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन पद्मश्री डॉ. शंकर बाबा पापळकर यांच्या हस्ते केले जाणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून दादाची शाळा पुणे येथील संचालक अभिजीत पोखरणीकर, राज्य माहिती आयोगाचे उपसचिव देवीसिंग दाबेराव ,बालरोगतज्ञ डॉ. जयंत पांढरीकर, माजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.श्यामसुंदर निकम, मानसोपचार तज्ञ डॉ.लक्ष्मीकांत राठी आणि समाजकार्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राजकुमार दासरवाड हे उपस्थित राहणार आहेत. राजापेठ स्थित गॅलक्सी हॉस्पिटल जवळील खुल्या मैदानात सायंकाळी पाच वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अमरावतीसाठी हा अभिनव उपक्रम असून त्या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे अशी विनंती गॅलेक्सी सर्जिकल आणि लॅप्रोस्कोपी हॉस्पिटल तसेच आरोग्य भारती अमरावती महानगर चे अध्यक्ष डॉ.आशिष डगवार यांनी केले आहे.

---

### तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

**रा.मा.क्र./२०/MRC-८१/काटपुर/२०२५-२०२६**

#### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार अब्दुल गणी शेख नबी, रा.काटपुर, ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत-काटपुर ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं. काटपुर येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुउपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्राम पंचायत कार्यालय काटपुर येथे स्वतःचे --दि.१०.०४.१९६८रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरिता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसाचे आत** लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

**दिनांक - २९.१०.२०२५**

शिक्का

**सही /-**
**तहसिलदार, मोर्शी**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९०३/२०२५
**सुभाष -वि- निरंक**
पुढील ता.२७.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Subhash Motiram Aathawale, Age 56 Yrs. Occu.: Agriculturist R/o Roshan Kheda, Pusda, Tq. Dist. Amravati.
2. Sau.Rajkanya Pandurang Warghat, Age 68 Yrs. Occu.: Household R/o Near Sharda Mandir, 188/3 Somwari Qu. Hanuman Nagar, Nagpur.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मोतीराम जयावारु आठवले व वत्सला मोतीराम आठवले** हे अनुक्रमे दिनांक 16.09.1995 & 28.06.2016 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुभाष व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुभाष व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१९.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.एस.भिंगरदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८३६/२०२५
**श्री.चंद्रशेखर अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२०.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Chandrashekhar Balakrishna Pant, Age 56 Yrs. Occu.: Business R/o Namuna Galli No.5, Amravati. Tq. Dist. Amravati.
2. Ashok Balakrishna Pant, Age 60 Yrs. Occu.: Business R/o House No.202, Gupte Plot, Shrihari Nagar, Akola.
3. Smt.Vasudha Rabhunath Pant, Age 55 Yrs. Occu.: Retired (Legal Heir of Raghunath Balkrishna Pant) R/o Ambika Nagar, Near Prasad Colony, Rukhmini Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati.
4. Radhika Shrikant Wajpe, (Legal Heir of Raghunath Balkrishna Pant) Age 39 Yrs. Occu.: Housewife R/o Ward No.5, Takalghat, Nagpur, Tq. Dist. Nagpur.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **बाळकृष्ण विश्वनाथ पंत** हे दिनांक 19.11.2011 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **चंद्रशेखर अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चंद्रशेखर अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.


आज दिनांक **१७.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

# महानगरपालिकेतर्फे मालमत्ता कर शिबिराचे आयोजन



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या वतीने रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी शहरातील नागरिकांसाठी मालमत्ता कर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा उद्देश नागरिकांना मालमत्ता कर भरण्याबाबत सुलभ सुविधा उपलब्ध करून देणे व थकबाकीदारांना एकाच ठिकाणी आवश्यक मार्गदर्शन देणे हा आहे. या शिबिरामध्ये मालमत्ता कर भरणे, थकबाकीची माहिती घेणे, नावात दुरुस्ती, मालमत्तेच्या नोंदी अद्ययावत करणे तसेच कराबाबतच्या तक्रारींचे निराकरण करण्यात येणार आहे. नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपला मालमत्ता कर वेळेत भरण्याचे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. सदर शिबिरात महापालिकेचे कर विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार असून नागरिकांना आवश्यक ती माहिती व मार्गदर्शन देण्यात येणार आहे. वेळेत कर भरल्यास दंड व अतिरिक्त शुल्क टाळता येणार असल्याने नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेने केले आहे.

---

### तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

**रा.मा.क्र./३०/MRC-८१/काटपुर (ममदापुर)/२०२५-२०२६**

#### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार अब्दुल हफीज अब्दुल अजिज, रा.काटपुर (ममदापुर), ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं. काटपुर (ममदापुर) येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुउपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्राम पंचायत कार्यालय काटपुर (ममदापुर) येथे स्वतःचे दि.२४.०१.१९७१ रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरिता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसाचे आत** लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

**दिनांक - ३०.१०.२०२५**

शिक्का

**सही /-**
**तहसिलदार, मोर्शी**

---

### तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

**रा.मा.क्र./३६/MRC-८१/काटपुर (ममदापुर)/२०२५-२०२६**

#### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार नर्गीस बी सय्यद जाफर, रा.काटपुर (ममदापुर), ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं. काटपुर (ममदापुर) येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुउपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्राम पंचायत कार्यालय काटपुर (ममदापुर) येथे स्वतःचे दि.२१.१०.१९७६रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरिता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसाचे आत** लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

**दिनांक - ३०.१०.२०२५**

शिक्का

**सही /-**
**तहसिलदार, मोर्शी**

---

### जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-६, यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २६४/२०२५ ने.ता.२७.०१.२०२६

**अर्जदार -** १. प्रार्थना संगम सोळंके, वय ५ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
२. आराधना संगम सोळंके, वय ५ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
रा.जलाराम नगर, रुक्मिणी न गर, अमरावती
मार्फत अपाक आई रोहिणी संगम सोळंके, वय २५ वर्षे,
रा.जलाराम नगर, रुक्मिणी न गर, अमरावती

-- वि --

**रिस्पांडंट - निरंक**

Application Under Section 8 of The Hindu Minority And Guardianship Act 1956 for Permission to Sale of Minors Share From Property.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नांवे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरीता वि.जिल्हा न्यायाधीश-६, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन पुढीलप्रमाणे--

Description of Property

Mouja Kathora Bk. Pragane Nandgaon Peth, Amravati extract 7/12 (Gao Namuna-7) No.61/1/61/20 total admeasuring 150 Sq.Mtr. (1614 Sq.Ft.) admeasuring as under :-
Towards East - Existing Layout Road Towards West - Other Persons Land
Towards North - Plot No.21, Towards South - Plot No.19

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द व मालमत्तेबाबत कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास/अर्जदारांचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी दि.२७.०१.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा न्यायाधीश-६, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहु अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १७.११.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२६७८/२०२५
**शिवदास व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२१.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Shivdas Rajendra Tayde Age 33 Yrs. Occu.: Labour R/o Budhawara Chowk, Shirala, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुनिता राजेंद्र तायडे** हे दिनांक 26.04.2021 रोजी **शिराळा, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शिवदास व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शिवदास व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

**रा.मा.क्र./२७/MRC-८१/काटपुर (ममदापुर)/२०२५-२०२६**

#### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार अब्दुल खालीक शेख ईब्राहीम, रा.काटपुर (ममदापुर), ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं. काटपुर (ममदापुर) येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुउपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्राम पंचायत कार्यालय काटपुर (ममदापुर) येथे स्वतःचे दि.०१.०९.१९५७ रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरिता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसाचे आत** लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

**दिनांक - ३०.१०.२०२५**

शिक्का

**सही /-**
**तहसिलदार, मोर्शी**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - २८५३/२०२५
स्नेहा विरुध्द निरंक
पुढील तारीख ०९.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** **Sneha Subhashchandraji Tawani**
Age 35 yrs., Occu.- Housewife
R/o. Badnera Road, Behind Tirupati Balaji Apartment
Kailas Nagar, Gopal Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत सुषमा सुभाषचंद्रजी टवानी व सुभाष रामबिलासजी टवानी हे अनुक्रमे दि.१९.०२.२०२२ व २१.०९.२०२५** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार स्नेहा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार स्नेहा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १६.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.७८६/२०२५ ने.ता.२९.०१.२०२६

**अर्जदार -** १. श्री.देविदास रामचंद्र टेकाम,
वय ७८ वर्षे, धंदा - शेती
रा.शिरलस, पो.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचा भाऊ नामे **धनराज रामचंद्र टेकाम** हा अविवाहीत असतांना दि.**०१.०८.२०१८** रोजी त्यांचे राहते घरी, शिरलस, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १८.१२.२०२५

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.एस.भिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३१७/२०२५
**श्रीमती अंजू अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२४.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Anju @ Anjulata Sanjay Agrawal (Salampuria), Age 56 Yrs. Occu.: Household
2. Riya Sanjay Agrawal (Salampuria), Age 31 Yrs. Occu.: Household
3. Krishna Sanjay Salampuria (Agrawal), Age 24 Yrs. Occu.: Education
All R/o Devulkar Market, Pavan Nagar, Gopal Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **संजय दामोधर अग्रवाल (सलामपुरीया)** हे दिनांक 15.08.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अंजू अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अंजू अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९२६/२०२५
**रेखा -वि- निरंक**
पुढील ता.१६.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Rekha Sudhakar Mahore, Age 53 Yrs. Occu.: Household R/o Ward No.2, Ram Mandir Chowk, At Po.Ghatladki, Tq. Chandur Bazar, Dist. Amravati
2. Ranjana Vinayakrao Mahore, Age 52 Yrs. Occu.: Household R/o Kokarda VTC Kokarda, Tq.Anjangaon Surji, Dist.Amravati
3. Rajesh Bapuraoji Makode, Age 50 Yrs. Occu.: Labournt) R/o Ward No.1, Shirala, Tq. Dist. Amravati.
4. Sangita Anil Lonbare, Age 45 Yrs. Occu.: Housewife R/o R.R.Lahoti High School, At Po.Taroda, Tq.Morshi, Dist.Amt.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **बापुराव रुपराव माकोडे व चंद्रकला बापुरावजी माकोडे** हे अनुक्रमे दिनांक 22.03.1997 & 27.02.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रेखा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रेखा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१९.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **बबनराव भिमरावजी गावंडे,** रा.अचलपूर, ता. अचलपूर, जि. अमरावती यांनी दि.२९/०३/२०१० रोजीचे खरेदी दस्त क्र.११६५ नुसार मौजे -परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील नझुल शिट नं.१९-डी मधील नझुल प्लॉट नं.१७०/१ भाग ज्याचे क्षेत्रफळ २६५.७९ चौ.मि. व त्यावरील बांधकाम सह हा मनोजकुमार गुलाबचंदजी जोशी यांचे कडून विकत घेतला आहे.

हयाप्रमाणे सदर खरेदी दि.२९/०३/२०१० रोजीचे दस्त क्र.११६५ चे **मुळ खरेदी दस्त** माझे पक्षकार बबनराव भिमरावजी गावंडे यांचे जवळ आहे. परंतु सदर मालमत्तेचे पूर्वीचे मुळ खरेदी दस्त जसे दि.२५/०४/२००६ रोजी दस्त अ.क्र.१२०५ चे दस्त **अ.क्र.१२०५ चे दस्त, हे या जाहीर सुचनेचा विषय असुन** सदर दस्ताचे मुळ खरेदीखत व त्याची पावती माझे पक्षकार यांचे कडून गहाळ झालेली आहे.

सदर हरविलेल्या दस्ताची रितसर दि.११/१२/२०२५ पोलीस स्टेशन परतवाडा येथे तक्रार दाखल केलेली आहे.

तरी सदर प्लॉट बाबत कोणाचोही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासुन १५ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक १२/१२/२०२५
अमरावती.

ॲडव्होकेट
**राहुल व्ही.मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.क्र.९०९६४६०६७०

---

### जाहीर सूचना/नोटीस

माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन व पुरविलेल्या कागदपत्रांचे आधारे जाहीर नोटिस देण्यात येते की, माझे पक्षकाराने वि.निबंधक चांदूर बाजार कक्षेतील व ग्राम पंचायत ब्राम्हणवाडा थडी हददीतील मौजे ब्राम्हणवाडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील शेत सर्वे नं. /गट नं./भुमापन क्र.४२७, भोगवटदार वर्ग १ एकुण क्षेत्र ०४ हे २८ आर + पो.ख.० हे.१९ आर पैकी क्षेत्र ०३ हे.४७ आर आकारणी रुपये २६.००, शेत जमीन, जी विहिरीसह, झोपडीसह व मंदिरासह तसेच झाडाझुडप, खोडाबारासह या शेताची चर्तुःसिमा :- पुर्वेस - सुभाषराव आवारेचे शेत, पश्चिमेस - सोनार यांचे शेत तसेच उर्वरित शेत, उत्तरेस -कासट यांचे शेत, दक्षिणेस-राजेश पेठे यांचे शेत या चतुर्सिमेतील शेत, राजेंद्र सुखदेवजी चांडक रा. फ्लॅट नं. ५०१, बि विंग, नॅन्सी ब्रम्हा रेसिडेन्सी, एन.डी.ए.पाषाण रोड पुणे यांचे जवळून विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. सबब हया नोटिस व्दारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, ज्या कुणाचा हया शेता संबंधात वारसाहक्काव्दारे, गहाणखताव्दारे, कर्जबोजाव्दारे, जप्तीव्दारे अथवा अन्य कोणत्याही कागदपत्रांव्दारे (नोंदणीकृत/अनोंदणीकृत ) कोणताही हितसंबंध किंवा हक्क वा उजर किंवा ताबा असेल तसेच सरकारी, निमसरकारी किंवा वित्तिय संस्था यांचे कर्ज असेल किंवा अधिकार असेल, अशांनी ही नोटिस प्रकाशित झालेपासुन ०७ (सात) दिवसाचे आत खालील पत्यावर संपुर्ण कागदपत्रांसोबत येऊन माहिती वा हक्क प्रस्थापित करने संबंधित कागदपत्रांचा पुरावा सादर करावा. हयानंतर कोणताही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी व माझे पक्षकार सदर शेता संबंधी खरेदीखत नोंदवुन घेण्यास मोकळे राहतील त्यानंतर येणारा कोणताही दावा चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.प्रविण भुस्कडे**
**जिजामाता शाळेजवळ, नोएल कॉम्प्युटर समोर**
**चांदूर बाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती**
**मो.नं.-९९२३३६६८९८**

---

### जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे **अनुप कृष्णराव चिटकेशवार,** रा.बोराळे अपार्टमेंट समोर, देवदत्त नगर, अमरावती, ता.जि.अमरावती व **संदीप पांडुरंग ताटेवार,** रा.प्रशांत नगर, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी **पांडुरंग रामराव गावले** रा.अमरावती यांचेशी त्यांच्या मालकीची व ताब्यातील खालील वर्णीत स्थावर मालमत्ता (शेतजमीन) विकत घेण्याचा सौदा कायम करीत आहे. स्थावर मालाचे मालमत्तेचे (शेतजमिनीचे) वर्णन-

नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण चांदूर बाजार कचेरीचे कक्षेतील व चांदूर बाजार नगर परिषदेच्या हद्दीतील वाठोडा ग्रामपंचायतच्या हद्दीतील मौजे वाठोडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील भूमापन क्र. व उपविभाग क्र.४०/१/ड, भो.वर्ग-१, क्षेत्रफळ १ हे.०३ आर असून याचा महसुली आकार रु.८.१० पैसे असून सदर सालीम शेतजमीन यातील झाडाझुडपासह, दगडमातीसह, जलपाषाणासह व ईतर तदंगभूत वस्तूंसह, सदर शेतजमिनीची चतुःसिमा- पुर्वेस - शुभम फुके यांचे शेत, पश्चिमेस - बेलोरा शिव रस्ता व मारोती महाराज मंदीर, उत्तरेस - शाळेच्या संस्थेचे शेत, दक्षिणेस - वाठोडा चिंचोली काळे शिव रस्ता.

त्याअर्थी वरील वर्णित मालमत्तेबाबत कोणाचाही गहाण, बोझा, तारण, सावकारी व्यवहार, वारसा हक्क व ईतर अधिकार जे कायदेशीररित्या अडथळा करतील असे व्यवहार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह कळवावे, अन्यथा कोणालाही कुठल्याही प्रकारची हरकत/तक्रार नाही असे समजून सौदा करण्यात येईल व त्यानंतर वरील सर्व प्रकारचे व्यवहार आमच्यावर बंधनकारक राहणार नाही. तथा आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीखत करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कसलाही उजर/अधिकार/हक्क/तक्रार इत्यादी चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

करीता ही नोटीस जाहीर करीत आहे.

**ठिकाण - अमरावती**
**दिनांक १८.१२.२०२५**

आपला,
**(ॲड.निलेश ज.पुंड)**
१०२ गजानन अपार्टमेंट, मोहन कॉलनी, अर्जुन नगर, अमरावती
मो.नं.८४२१७२२१११

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२२४६/२०२५
**भूजंग -वि- निरंक**
पुढील ता.०७.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. भूजंग भाऊराव डंबाळे, वय ५५ वर्षे, व्यवसाय - मजुरी रा.हनुमान मंदिराजवळ, नवीन हनुमान नगर, अमरावती
२. विश्वास भाऊरावजी डंबाळे, वय ४६ वर्षे, व्यवसाय - मजुरी रा.गजानन महाराज मंदिराजवळ, शिव कॉलनी, धामणगांव रेल्वे, जि.अम.
३. निर्मला प्रकाश गावंडे, वय ५७ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.रामकृष्णा नगर पो.कामरगांव, ता.कारंजा लाड, जि.वाशिम
४. प्रमिला मारोतराव गावंडे, वय ६२ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.महादेव कॉलनी, अमर नगर, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत देवकाबाई भाऊरावजी डंबाळे** यांचे दिनांक **०८.१२.२०२३** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार भूजंग भाऊराव डंबाळे व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **भूजंग भाऊराव डंबाळे व ईतर** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०३.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२५५८/२०२५
**हेमंतीनी व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०४.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Hemantini Sumantrao Bonde, Age 85 Yrs. Occu.: Household
2. Seema Rajendra Bonde, Age 61 Yrs. Occu.: Household
3. Saket Rajendra Bonde, Age 36 Yrs. Occu.: Service
All R/o Keshav Colony, Near Vidyabharti College, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **राजेंद्र सुमनतराव बोंडे** हे दिनांक 17.05.2007 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **हेमंतीनी व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **हेमंतीनी व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१४.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १०३
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त



### संत गाडगे महाराज व मातोश्री भीमाई आंबेडकर पुण्यतिथी

**अमरावती-** येथील लुंबिनी बुद्ध विहार, तपोवन परिसरात संत गाडगे महाराज व मातोश्री भीमाई आंबेडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला भिक्खू अमरावती सीलवंसलंकार, भंते गिरिमानंद, नवयुवक पंचशील मंडळ तसेच मातोश्री रमाई महिला संघ यांच्या उपस्थितीत मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात पंचशील व बुद्धवंदना घेऊन झाली. यावेळी संत गाडगे महाराज यांच्या सामाजिक कार्याचा व मातोश्री भीमाई आंबेडकर यांच्या त्यागमय जीवनाचा आढावा घेण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला.समता, स्वच्छता, सेवा व करुणा या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी सामाजिक बांधिलकी जपत समाजहितासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार केला.



### संत शिरोमणी संताजी महाराज पुण्यतिथी

**नांदगाव खंडेश्वर-** श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांची पुण्यतिथी वामनराव गुल्हाने यांच्या अध्यक्षतेखाली तर बंडूभाऊ तऱ्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली याप्रसंगी हभप. चंद्रशेखर वैद्य महाराज (आळंदीकर) यांनी दीप प्रज्वलीत करून कार्यक्रमाची सुरुवात करून महाराजांच्या अष्टपैलू जीवनावर प्रकाश टाकला. यावेळी हुशार विध्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला यात अजिंक्य सुपारे, प्रकाश तऱ्हेकर, स्मिता तऱ्हेकर यांचा समावेश होता. सत्काराप्रसंगी महाराजासह सुरेश तऱ्हेकर, राहुल गुल्हाने, सदानंद जाधव, गजानन तऱ्हेकर. डॉ. सतीश खोडे,, किशोर चकुलेयांची विशेष उपस्थिती होती. यावेळी काल्याचे कीर्तनाचेही आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमोल शिरभाते, डॉ. रघुते, शहाडे, सव्वालाखे, बनारसे, यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन गजानन तऱ्हेकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. सतीश खोडे यांनी केले. कार्यक्रमाला परिसरातील असंख्य भाविक भक्तांनी उपस्थिती दर्शविली होती.




### जि.प.प्राथमिक शाळेत आनंद मेळावा

**लेहेगाव-** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घोटा येथे आनंद बाजार व शालेय कृषी बाजार याला पालकांचा उस्फूर्त प्रतिसाद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घोटा येथे बाल आनंद मेळावा व शालेय कृषी बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांनी अनेक खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते. विद्यार्थ्यांनी शालेय परस बागेमधील व घरच्या बागेमधील भाजीपाला फळे विक्रीस ठेवली होती. आनंद मेळाव्यामधून विद्यार्थ्यांनी नफा तोटा पैशाचे व्यवस्थापन ग्राहक सेवा ,संवाद कौशल्य, जबाबदारी, सहकार्याने काम करण्याची वृत्ती यांचे प्रत्यक्ष धडे या उपक्रमातून आत्मसात केले. आनंद मेळावा मधून गावकरी मंडळी तसेच विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेतला या कार्यक्रमाला यशस्वी करण्यामागे शाळेतील मुख्याध्यापक सुरेश ठाकूर व रत्ना शेगोकर यांनी अथक परीश्रम घेतले.

# सावंगी येथे यशवंत बाबा जन्मोत्सव सोहळा; आज रथयात्रेचे आयोजन

**वरुड-** येथून जवळच असलेल्या सावंगी ता. वरुड येथे परमहंस श्री यशवंत बाबा यांच्या १०७ व्या जन्मोत्सवानिमित्त भक्तिमय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा जन्मोत्सव सोहळा २१ डिसेंबर रोजी करण्यात आला आहे. या जन्मोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे १०७ किलो फुलांनी सजवलेली यशवंत रथयात्रा. पारंपरिक पद्धतीने निघणाऱ्या या रथयात्रेत विशेष आकर्षण सावंगी येथील सुप्रसिद्ध डीजे एसएम आडीवो राहणार असून हनुमान झांकी, टाळ–मृदंगाचा गजर, तसेच पालखी सोहळा यांचा समावेश असून संपूर्ण गावातून ही पदयात्रा भक्तीभावाने काढण्यात येणार आहे. हि पदयात्रा सावंगी येथून मुसळखेड येथे पोहोचणार आहे. त्यामध्ये पंचकृष्ण खंजरी भजन मंडळ, श्री यशवंत बाबा खंजरी भजन मंडळ, परिवर्तन गायन



संच, वारकरी पुरुष व महिला भजन मंडळ, पंचकृष्ण महिला भजन मंडळ, ब्रह्मांडनायक महिला भजन मंडळ, नवदुर्गा महिला भजन मंडळ, जय हनुमान महिला भजन मंडळ तसेच श्री महालक्ष्मी भजन मंडळ सावंगी यांचा प्रामुख्याने समावेश असणार आहे. भजन, अभंग, कीर्तन आणि श्री यशवंत नामाच्या गजरात ही पदयात्रा मुसळखेड कडे मार्गक्रमण करणार असून भाविकांसाठी हा एक अविस्मरणीय आध्यात्मिक अनुभव ठरणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ, वारकरी संप्रदायातील भाविक व यशवंत बाबा भक्त मंडळी परिश्रम घेत आहेत. या पवित्र जन्मोत्सव सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी अबाल वृधांसह संपूर्ण भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आ.तायडे यांनी मिळवून दिला प्रकल्पग्रस्तांना न्याय

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर विधानसभा मतदारसंघातील गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या सिंचन प्रकल्पांचा प्रश्न आ.प्रवीण तायडे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे मांडला होता.यामध्ये बोर्डी नाला प्रकल्प, राजुरा प्रकल्प, राजनापूर्णा बॅरेज प्रकल्प व वासनी मध्यम प्रकल्प असे एकूण चार महत्त्वाचे सिंचन प्रकल्प निधीअभावी अनेक वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत असल्याकडे त्यांनी याकडे शासनाचे लक्ष वेधले होते. प्रकल्पग्रस्तांच्या न्यायासाठी अधिवेशनात लक्षवेधीत शासन स्तरावर न्याय मिळवून दिल्याने प्रकल्पग्रस्तांकडून अचलपूर मतदार संघाचे आ. प्रवीण तायडे यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी मोठ्या प्रमाणात प्रकल्पग्रस्त उपस्थित होते. वासनी मध्यम प्रकल्पावर आतापर्यंत ६४३.५१ कोटी इतका खर्च झाला २०१६-१७ पासून दायित्वाअभावी प्रकल्पाचे काम रखडलेले असल्याने या प्रकल्पासाठी तातडीने ६५.६५ कोटींच्या दायित्वास मंजुरी देणे अत्यावश्यक असल्याची मागणी आ. तायडे यांनी सभागृहात केली होती .त्यानंतर राज्याचे जल संपदा मंत्री गिरीश महाजन, जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आ.प्रवीण तायडे यांची सकारात्मक बैठक संपन्न झाली आणि या प्रलंबित प्रकल्पाला तत्काळ मार्गी लावण्याचे निर्देश जल संपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिले. यामुळे हा महत्वपूर्ण मुद्दा आ.प्रवीण तायडे यांनी निकाली लावल्याने त्यांचे शेतकरी आणि प्रकल्पग्रस्तांनी सत्कार केला. शेतकरी आणि प्रकल्पग्रस्तांचा हक्कांसाठी शेवटपर्यंत लढा देणार असल्याचे मत ही आ.तायडे यांनी व्यक्त केले.

# जिल्ह्यात 'मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते' योजनेला प्रारंभ

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी बारमाही आणि दर्जेदार रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना' सुरू केली आहे. या योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात झाली आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश शेत शिवारातील अतिक्रमित झालेले पाणंद रस्ते मोकळे करणे आणि तेथे दर्जेदार, बारमाही दळणवळणास योग्य रस्ते तयार करणे हा आहे. ग्रामीण भागातील या पायाभूत सुविधेमुळे शेतकऱ्यांना पीक कापणी, मशागत आणि शेतमाल बाजारपेठेत नेणे सोपे होणार आहे. ही कामे पूर्णपणे यंत्रसामग्रीच्या सहाय्याने केली जाणार असून, कामात पारदर्शकता आणि गुणवत्ता राखण्यासाठी इच्छुक मशीनधारक व कंत्राटदारांकडून निविदा मागवण्यात येणार आहेत. या योजनेची कार्यपद्धती आणि निविदा प्रक्रिया कंत्राटदारांना नीट समजावी, यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे बुधवार २४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता अमरावती येथील कार्यकारी



अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांच्या कार्यालयात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत मशिनधारकांशी सविस्तर चर्चा करून खोदकाम, माती, मुरुम वाहतूक आणि रोड रोलरने दबाई करणे यासाठीचा 'प्रति तास दर' निश्चित केला जाणार आहे. बैठकीनंतर जिल्हास्तरावर विधानसभा क्षेत्रनिहाय यंत्रधारकांचे एक पॅनेल तयार करण्यात येईल, जे प्रत्यक्ष रस्त्यांच्या कामासाठी जबाबदार असेल. जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत व इच्छुक मशिनधारकांनी आणि कंत्राटदारांनी या चर्चासत्राला उपस्थित राहण्याचे आवाहन उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी केले आहे.

# तेली समाज राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा ३० ला

## शिवाजी सभागृह मध्ये होणार सोहळा

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा तैलिक समितीच्या वतीने राज्यस्तरीय उपवर वधू परिचय महामेळाव्याचे आयोजन मंगळवार ३० डिसेंबर रोजी सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात करण्यात आले आहे. पूर्वी हा मेळावा संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन मध्ये होणार होता. आता त्याची जागा बदलली आहे, अशी माहिती पत्रकार परिषद मध्ये आयोजकांनी दिली.

११०० उपवधू वर एकत्रित येऊन आपल्या परिचय देणार



आहे. या दरम्यान रेशीमगाठी बंधन व कुर्यात सदा मंगलम पुस्तिकेचा विमोचन करण्यात येणार आहे. दरम्यान तेली समाजाचा प्रलंबित मागण्यांचा ठराव समाजाच्या साक्षीने व स्वाक्षरीने संमत करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात येणार आहे. समाजाच्या काही मागण्या गेल्या काही वर्षापासून प्रलंबित आहे.

या मागण्यांवर चर्चा करून त्याचा प्रस्ताव पाठवून मागण्या पूर्ण करण्याची मागणी करण्यात येणार आहे. समाज बांधवांना मोठे संख्येने मेळावा मध्ये उपस्थित राहण्याचा आवाहन आयोजकांनी केलेला आहे. पत्रकार परिषद मध्ये राजेश शिरभाते, ज्ञानेश्वर शिरभाते, प्रा. केशव गुल्हाने, राजेश हजारे, प्रकाश बनारसे, दीपक गिरोळकर, सुरेश बिजवे, किशोर गाडबैल, दिलीप चौकडे, दिनेश बिजवे, संजय मांडवे, योगेश मावळे, संजय हिंगासपुरे, किशोर जीरापुरे, जयंत औतकर, अविनाश जसवंते, विजय शिरभाते, अखिलेश शिरभाते, प्रशांत साखरकर, चंदू जावरे, अनिता तिखीले, लीना जावरे, प्रणिता शिरभाते, सविता भगत, अश्विनी अजमिरे, अर्चना बुलढाणे आदि उपस्थित होते.

# आरटीओ कार्यालयात वाहन तपासणीचे होणार व्हिडिओ रेकॉर्डिंग

**अमरावती-** प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती येथे वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाची प्रक्रिया आता अधिक पारदर्शक होणार असून, केंद्रीय मोटार वाहन नियमानुसार होणाऱ्या संपूर्ण वाहन तपासणीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परिवहन आयुक्त कार्यालयाच्या मान्यतेनुसार, ही व्हिडिओ रेकॉर्डिंगची प्रक्रिया भाडे तत्त्वावर राबवली जाणार असून, यासाठी अनुभवी व्हिडिओ रेकॉर्डिस्ट आणि पुरवठादारांकडून मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात आली आहेत. प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, इच्छुक अनुभवी व्यक्ती किंवा संस्थांनी आपली दरपत्रके 'प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, कॅम्प, अमरावती - ४४४६०२' या पत्त्यावर सादर करणे आवश्यक आहे. दरपत्रके सादर करण्याची अंतिम मुदत २९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. वाहन चाचणीच्या प्रक्रियेत अचूकता आणि पारदर्शकता राखण्यासाठी हा व्हिडिओ रेकॉर्डिंगचा उपक्रम प्रस्तावित करण्यात आला आहे.

# स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात वडिलांनी किडनी देऊन वाचविले मुलीचे प्राण

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशलिटी) हॉस्पिटल अमरावती. येथे ६४ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली. ३६ वर्षीय सोनल राजू चौधरी यांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे.

सदर रुग्ण ही अमरावती येथील रहिवासी असून मागील काही वर्षापासून डायलिसिस चालु होते. मात्र डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले. त्यावेळी मुलीचे वडील सुरेश रंगराव गुहे (६५वर्ष )यांनी आपली एक किडनी सोनल ला देऊन तिला नवीन जीवन दिले.महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली.सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.



अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. हितेश गुल्हाने ,युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ. राहुल घुले, डॉ. प्रतिक चिरडे, डॉ विशाल बाहेकर,बधिरिकरण तज्ञ- डॉ. रोहित हातगावकर, डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. दिपाली देशमुख, डॉ. रमणिका ढोमणे ,डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे,डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय,डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव,समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी,महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने मधील एम.सी.ओ.डॉ. पायल रोकडे ,डॉ. दिव्यांनी मुंदाने, आशिष तायडे अधीसेविका चंदा खोडके यांच्या सूचनेनुसार ज्योती तायडे, सरला राऊत, नीता कांडलकर, दिपाली तायवाडे, माधुरी सोनटक्के,विवेक तायडे, वैष्णवी निकम, कीर्ती तायडे, अक्षय पवार, मयुरी खेरडे, अनु वडे, योगिश्री पडोळे, वैशाली ढोबळे, कोमल भालेकर, शुभांगी टिंगणे, आर गवई, विशाखा बरवान, अर्चना मढावी, वैष्णवी टाकरखेडे, अनिता गोमकाळे, आहारतज्ञ कविता देशमुख, रश्मिता दिघडे, श्रीधर ढेंगे,औषध विभागामधील योगेश वाडेकर, अमोल वाडेकर, पंकज बेलुरकर, आशिष थुल, गजानन मातकर, अविनाश राठोड, आशिष मिश्रा, शिवा भोंगाळे, रुपेश हरडे,दिपटे, भेंडकर, इंदू पाटील, गजानन चौधरी,प्रशांत थेटे, निलेश आत्राम इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विषेश सहकार्य होते.

# श्रमदानातून बांधला वनराई बंधारा



**अंजनगावसुर्जी/वार्ताहर**

तालुक्यातील अंजनगाव सुर्जी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या घोडसगाव येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जलसंधारणाच्या दृष्टीने बंधारा बांधण्यात आला.

या बंधाऱ्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता वाढणार असून शेतीसाठी मोठा लाभ होणार आहे. कार्यक्रमास कृषी विभागाचे कृषी अधिकारी भारती जाधव उपस्थित होते. तसेच उपकृषी अधिकारी विजय पांडे,उपसरपंच प्रदीप पाटील गोमसे सहाय्यक कृषी अधिकारी गजानन बोंडे,

ग्रामपंचायतीचे सन्माननीय सदस्य,ग्रामपंचायत अधिकारी राजेश उगले व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.बंधारा उभारणीमुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असून पाणी .साठवणुकीच्या माध्यमातून शाश्वत शेतीला चालना मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे गावकऱ्यांकडून स्वागत करण्यात आले.

# श्री.साईबाबा विद्यालयाचा माजी विद्यार्थ्यांचा आज मेळावा

**अमरावती-** साईनगर स्थित श्री. साईबाबा विद्यालयामध्ये माजी विद्यार्थी संघातर्फे रविवार, २१ डिसेंबर या दिवशी सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा शाळेची पहिली बॅच १९९० पासून ते २०२५ पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी असणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राजापेठ पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक मिलिंद हिवरे, जालना येथील न्यायाधीश सुप्रिया पुंड, प्रमुख उपस्थिती संस्थेचे अध्यक्ष जुगलकिशोर गट्टाणी, सचिव राजेश हेडा, शाळेचे माजी मुख्याध्यापक उद्धवराव किटकूले,



जयश्री शिरभाते हे उपस्थित असणार आहे. मुख्याध्यापक राजेश टावरी यांनी माहिती दिली की, 'शाळा सोडून गेल्यापासून विद्यार्थी शालेय जिवन जगू शकत नाहीत. शाळेचे पर्यवेक्षक आशिष पसारकर यांनी सांगितले की, 'माजी विद्यार्थ्यांमध्ये मेळाव्याचा फारच उत्साह आहे. आयोजन आता अंतिम टप्प्यात आले असून, सोशल मीडियाच्या माध्यमातून माजी विद्यार्थ्यांना एकत्र करून नोंदणी करण्यात आली आहे. यावेळी पत्रकार परिषदेला राजेश टावरी, आशिष पसारकर, प्रदीप भगत, नितीन चव्हाळे, आरती मंत्री, ज्ञानेश्वर टाले, रेणुका टवलारे, हुकूमचंद माने, अमित सावलकर, नीलेश शिंदे, प्रसाद पहुरकर, पंकज काकडे हे पदाधिकारी उपस्थित होते.

## डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडा महोत्सवात

# शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूलचा कबड्डी संघाने मारली बाजी

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांच्या वतीने आयोजित विभागीय खेळ व क्रीडा स्पर्धेत शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूल, अमरावती या शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचा नावलौकिक वाढविला आहे.

वयोगट १ ते ४ (प्राथमिक) वर्षातील मुलांनी कबड्डी संघाने अंतिम फेरीत धडक मारली.श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांच्या संस्थास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी आपला प्रवेश निश्चित केला होता. नागपूर, अकोला,दर्यापूर, बुलढाणा, चांदुर रेल्वे, यामध्ये प्राथमिक गट वर्ग १ ते ४ मध्ये मुलांनी अंतिम सामना शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूल अमरावती, आदर्श प्राथमिक शाळा दर्यापूर संघासोबत रंगला.शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूलचा कार्तिक राठोड,समर्थ जाधव यांनी सामना जिकण्यासाठी खूप प्रयत्न केले. पहिला सामना ३०-१० गुणांनी दुसरा सामना ३५-२०, तिसरा सामना ३१- २६ असा रंगला.दोन्ही संघ आपल्या संघाना



जिकण्यासाठी अथक प्रयत्न करत हा सामना ३०-२० बनला. दहा गुणांनी शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूल विजयी होऊन अमरावती विभागाचे नाव क्रीडा स्पर्धेत शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूलचा झेंडा रोवला व विनर ट्रॉपी आपल्या नावाने केली. या सामन्यात मुलांमध्ये समर्थ रणजित जाधव, कार्तिक राठोड, आरुष खडसे, साई पाटील, अभ्यंक ठवकर, प्रयास देशकर,अर्णव थोरात, समरजित राणे, दीप सारबर्डे यांनी उल्लेखनीय यश संपादन व चमकदार कामगिरी करत अमरावती विभागत शाळेचा वरचष्मा सिद्ध केला.या यशासाठी शाळेचे क्रीडा शिक्षक अमर खंडारे, मंदार मडावी, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, संस्थेचे कोषाध्यक्ष तथा शाळा समिती अध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपव्यवस्थापक पंडीत पंडागळे, प्राचार्य सुभाष गावडे सर शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, संत गाडगे बाबा विद्यापीठ चे सदस्य, शाळा निरीक्षक संजीवकुमार खाडे, मधुकराव रोडे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ वैशाली प्रदीप ठाकरे,पर्यवेशक्षिका सौ शारदा फुले, मुख्याध्यापक श्री संदीप इंगोले सर, डॉ. चेतक शेंडे सर, पुष्पलता देशमुख मॅडम बोके मॅडम , सौरभ काळमेघ, शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व संपुर्ण शिव परिवार यांनी शुभेच्छा दिल्या. शाळेच्या या घवघवीत यशाबद्दल सर्व खेळाडूंचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# १२ नगराध्यक्षांसह २७८ सदस्यांच्या भाग्याचा आज फैसला

## १२ ठिकाणी ९३ टेबलांवर मतमोजणी, निकालाकडे सर्वांचे लक्ष



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील दहा नगरपरिषद आणि दोन नगरपंचायतींचे संयुक्त निकाल आज, रविवार दि. २१ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहेत. या निकालांकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून यंदा मतदार नव्या चेहऱ्यांना संधी देतात की अनुभवी उमेदवारांवरच विश्वास दाखवतात, याबाबत उत्सुकता आहे. अनेक ठिकाणी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे. या निवडणुकीत १२ नगराध्यक्ष पदांसह २७८ सदस्य पदांसाठी एकूण १,३२८ उमेदवार रिंगणात उतरले होते. त्यांच्या राजकीय भवितव्याचा फैसला आज होणार आहे.

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेसाठी शनिवारी मतदान शांततेत पार पडले. त्यानंतर आज रविवारी सकाळी ८ वाजल्यापासून जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी एकूण ९३ टेबलांवर मतमोजणीस सुरुवात होणार आहे. ☞(पान २ वर)

## दर्यापूरात झाले ७२ टक्के मतदान


### -दोन महीला मतदारांचे बॅलेट पेपरवर मतदान

**खल्लार/प्रतिनिधीः-** न्यायालयीन कारणांमुळे लांबलेली स्थानिक नगर परिषदेच्या प्रभाग २ अ मधिल एका नगरसेवक पदासाठीच्या निवडणूक प्रक्रीयेत शनिवारी मतदान पार पडले. या प्रभागात एकूण ३१९९ मतदार असून २३०६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानाची टक्केवारी ७२.१ एवढी आहे.

कॉंग्रेस उमेदवार देविदास काळे यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आला होता. मात्र नंतर न्यायालयाने त्यांचा अर्ज वैध ठरवत अपक्ष निवडणूक लढविण्यास पात्र ठरवले होते. त्यामुळे या प्रभागातील एका नगरसेवक पदाची प्रक्रीया थांबवून ती नव्याने २० डिसेंबर रोजी होणार असे जाहीर झाले होते. प्रभाग क्रमांक २ अ हा ओबीसी पुरुष साठी राखीव होता. प्रत्यक्ष एका नगरसेवक पदासाठी निवडणूक रिंगणात ७ उमेदवार कायम होते. प्रचारात राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. तसेच नगरसेवक पदांची ही निवडणूक पक्ष व अपक्ष उमेदवारासाठी अत्यंत चुरशीची ठरली होती. शनिवारी मतदान प्रक्रिये दरम्यान महाराणा प्रताप नगरपरिषद शाळा व शमी आझाद उर्दू स्कूल या दोन केंद्रावर दोन महीला मतदाराचे मतदान झाल्यावरही दुबार ( प्रदंप्त ) मतदान बॅलेट पेपरवर घेण्यात आले आहे. हा प्रकार समोर येताच काही वेळ गोंधळ निर्माण होऊन तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## अंजनगाव सुर्जी नगरपालिकेत ईव्हीएम चोरीची अफवा

### -मतदान केंद्राबाहेर नागरिकांची मोठी गर्दी -प्रशासनाकडून परिस्थिती नियंत्रणात





**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी नगरपालिकेची निवडणूक दि. २० डिसेंबर रोजी एकूणच शांततेत पार पडली असतांनाच मतदानाच्या शेवटच्या टप्प्यात सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास ईव्हीएम मशीन चोरीला गेल्याची अफवा पसरली. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. या अफवेमुळे संबंधित मतदान केंद्रासमोर शेकडो नागरिकांनी गर्दी केली होती. मात्र ही अफवा निराधार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर परिस्थिती निवळली.

सविस्तर वृत्त असे की, ☞(पान २ वर)

## अपघातात आमदार संजय खोडके जखमी

### -भरधाव कारची दुचाकीला धडक



**अमरावती/प्रतिनिधीः-** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांची बैठक घेण्यासाठी दुचाकीने जात असताना राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित पवार गट) वरिष्ठ नेते व आमदार संजय खोडके यांचा शनिवारी (दि. २०) दुपारी अपघात झाला. कठोरा नाक्याजवळील चौफुलीवर एका भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. या घटनेत आमदार खोडके यांच्या पायाला व मणक्याला दुखापत झाली असून, त्यांच्यावर अमरावतीतील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघातानंतर त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी सर्व तपासण्या करून वैद्यकीय अहवाल नॉर्मल असल्याचे स्पष्ट केले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना एक दिवस रुग्णालयात निरीक्षणाखाली ठेवण्यात येणार आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून कोणताही धोका नसल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. दरम्यान, अपघातानंतर आमदार संजय खोडके यांनी स्वतः व्हिडीओ संदेश जारी करून आपण पूर्णपणे सुरक्षित असल्याचे स्पष्ट केले. 'मी सुखरूप आहे. काळजी करण्याचे काहीही कारण नाही,' असे त्यांनी व्हिडीओत सांगितले. हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर समर्थक, कार्यकर्ते व नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे. या अपघातातील कार चालक हा आमदार खोडके यांच्या ओळखीतील☞(पान २ वर)

## बहीरम यात्रेच्या नावाखाली गुटक्याचा काळाबाजार

### ८.४४ लाखांचा मुद्देमाल जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध वाहतुकीविरोधात अमरावती ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई केली. बहीरम यात्रेसाठी आणलेला गुटखा पकडून तस्करीचा पर्दाफाश केला आहे. शिरजगाव कसबा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील बोदड टी-पॉईंट येथे करण्यात आलेल्या नाकाबंदीत तब्बल ८ लाख ४४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. १८ डिसेंबर रोजी मध्यप्रदेशातून करजगावकडे मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा आणला जाणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार शिरजगाव कसबा पोलिसांनी बोदड टी-पॉईंट येथे सापळा रचत नाकाबंदी केली. दरम्यान, संशयास्पद वॅगनआर कार थांबवून तपासणी केली असता महाराष्ट्रात बंदी असलेला गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखू मोठ्या प्रमाणात आढळून आला.

या कारवाईत शेख तौफिक शेख रफिक (वय २५, रा. सौदागरपुरा, करजगाव, ता. चांदुर बाजार) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून हॉटच्या पुड्या, पानपराग, विमल, पानबहार आदी नामांकित कंपन्यांचा ३ लाख ३४ हजार ७५० रुपयांचा प्रतिबांधित गुटखा व पानमसाला, वाहतुकीसाठी वापरलेली ☞(पान २ वर)

## आज सकाळी 'हॅपी स्ट्रीट'

### वेलकम ते बियाणी चौक मार्गावर वाहतुकीत बदल

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वेलकम टी पॉइंट ते बियाणी चौक या राज्य मार्गावर अमरावती महानगरपालिकेच्या वतीने पथवे विकासाचे काम प्रस्तावित असून, मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सुरू करण्यात आलेल्या 'हॅपी स्ट्रीट' उपक्रमाला नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. या पार्श्वभूमीवर डिसेंबर २०२५ मधील २१ व २८ डिसेंबर या दोन रविवारी सकाळी हा उपक्रम पुन्हा राबविण्यात येणार आहे.

महानगरपालिकेच्या शहर अभियंत्यांनी यापूर्वी वाहतूक विभागाकडे सकाळच्या वेळेत एकतर्फी वाहतूक बंद ठेवण्याची मागणी केली होती. त्यानुसार नोव्हेंबर महिन्यात प्रायोगिक तत्त्वावर 'हॅपी स्ट्रीट' ही संकल्पना राबविण्यात आली होती. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभल्याने, आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी ही संकल्पना पुढे सुरू ठेवण्याचे मौखिक निर्देश दिले. वेलकम टी पॉइंट ते बियाणी चौक हा मार्ग तपोवन, विद्यापीठ, चपराशीपुरा, यशोदा नगर, एसआरपीएफ कॅम्प अशा दाट वस्तीला जोडणारा महत्त्वाचा राज्य मार्ग आहे. पर्यायी मार्ग मर्यादित असल्याने दररोज वाहतूक बंद ठेवणे शक्य नसल्याचे पाहणीत स्पष्ट झाले. त्यामुळे फक्त रविवारी सकाळी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहतुकीत बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार रविवार, ☞(पान २ वर)

### मतदान टक्केवारी वाढविण्याकरिता

## नव मतदारांना साद

### मतदानाचा वाढावा टक्का - महानगरपालिकेचा निर्धार पक्का



**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता अमरावती महानगपालिका sveep विभागा मार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नव मतदारांना अवाहन करण्याकरिता आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक ☞(पान २ वर)

## गुंड-बदमाशांवर थेट कारवाई



### -पोलीस आयुक्त राकेश ओला


**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात दादागिरी, गुंडगिरी व दहशत माजविणाऱ्यांसाठी आता पोलिसांचा संयम संपला आहे. कायदा व सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या गुंड, टोळ्या आणि गॅंग चालविणाऱ्यांवर थेट कारवाई करण्याचे कडक आदेश पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी दिले आहेत.'मी केबिनमध्ये बसून आदेश देणारा पोलीस आयुक्त नाही. मी रस्त्यावर उतरून गुन्हेगारांचा बंदोबस्त करणारा अधिकारी आहे,' असा ठणकावून इशारा देत ओला यांनी संपूर्ण पोलिस यंत्रणेला 'ऑन रोड ॲक्शन' मोडमध्ये आणले आहे. राजापेठ आणि एकनाथपूरम परिसरात झालेल्या तोडफोडी, दहशत माजविण्याचे प्रकार आणि दुकाने जबरदस्तीने बंद पाडण्याच्या घटनांना पोलिसांनी कायदा-सुव्यवस्थेवरील थेट हल्ला मानले आहे. यानंतर गुन्हे शाखेला ☞(पान २ वर)

## महापालिकेच्या मालमत्ता कर शिबिरातून विक्रमी वसुली

### एकाच दिवशी मनपाच्या तिजोरीत १.९६ कोटी रुपये जमा

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिके तर्फे आज आयोजित करण्यात आलेल्या विशेष मालमत्ता कर वसुली शिबिराला शहरवासीयांचा मोठा आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराच्या माध्यमातून उत्तर झोन क्र.१ मधील मालमत्ता कर वसुल रु.३७.७७ लाख, मध्य झोन क्र.२ मधील मालमत्ता कर वसुल रू.१.०४ कोटी, पुर्व झोन क्र.३ मधील मालमत्ता कर वसुल रू.२०.४७ लाख, दक्षिण झोन क्र.४ मधील मालमत्ता कर वसुल रु.१०.१६ लाख, पश्चिम झोन क्र.५ मधील मालमत्ता कर वसुल रु.२३.५० लाख असे एकाच दिवशी तब्बल १ कोटी ९६ लाख रुपये इतक्या मालमत्ता कराची वसुली करण्यात महापालिकेला यश आले. त्यामुळे महापालिकेच्या महसूल संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे.

शहरातील करदात्यांना कर भरण्यास सुलभता मिळावी, थकबाकी कमी व्हावी तसेच महापालिकेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा व्हावी या उद्देशाने कर विभागातर्फे हे शिबिर आयोजित



करण्यात आले होते. शहरातील विविध प्रभागांमध्ये स्वतंत्र काउंटरची व्यवस्था करण्यात आली होती. नागरिकांना ऑनलाईन तसेच ऑफलाईन पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

या शिबिरात नियमित करदात्यांसह अनेक थकबाकीदार नागरिकांनीही सहभाग घेतला. दंड व व्याजात सवलतींचा लाभ घेत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात कर भरला. त्यामुळे सकाळपासूनच शिबिरस्थळी नागरिकांची गर्दी पाहायला मिळाली. महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी दिवसभर कार्यरत होते.☞(पान २ वर)

## राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धा उत्साहात

### राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित 'राज्यस्तरीय शालेय आर्चरी (धनुर्विद्या) क्रीडा स्पर्धा २०२५-२६' उत्साहात पार पडली. जिल्हा क्रीडा संकुलातील आंतरराष्ट्रीय आर्चरी रेंजवर १७ ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत या स्पर्धा पार पडल्या.

स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी रिकर्व्ह राऊंडमध्ये खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावले. यातून निवडण्यात आलेला महाराष्ट्राचा चमू आता आगामी ६९व्या राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करेल.राष्ट्रीय स्तरासाठी निवडलेला संघ (रिकर्व्ह राऊंड): १७ वर्षांखालील मुलेमध्ये आदित्य पवार (पुणे विभाग) - ६८६ गुण, ज्ञानेश चेरले (लातूर विभाग) - ६७७ गुण, आर्यन राठोड (क्रीडा प्रबोधिनी) - ६७२ गुण, सिद्धार्थ तिकोणे (पुणे विभाग) - ६६२ गुण.

१७ वर्षांखालील मुलीमध्ये कुमकुम मोहोड (अमरावती विभाग) - ६५७ गुण, मधुरा राठोड (अमरावती विभाग) - ६३९ गुण, प्रगती शिंदे (पुणे विभाग) - ६३६ गुण, संचिता बाबर (कोल्हापूर विभाग) - ६३४ गुण.☞(पान २ वर)

## तहसील कार्यालयातील कर्मचा-याला मारहाण

### -दोन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** तहसील कार्यालयामध्ये कार्यरत कर्मचारी संतोष गणेशराव चपटे यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात चपटे यांच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी आरोपी भास्कर रिठेसह अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार संतोष चपटे शुक्रवारी दुपारी २.३० वाजता तहसील कार्यालयामध्ये आपले काम करत होते. त्यावेळी आरोपी भास्कर रिठे व अज्ञात त्यांच्याजवळ आले. त्यांनी चपटेला शिवीगाळ केली आणि लोखंडी वस्तू खिशातून काढून त्यांच्या चेहऱ्यावर मारली. त्यांन धमकी देऊन आरोपी तेथून पळाले. या प्रकरणात चपटेच्या तक्रारीवरून दोन्ही आरोपी विरुद्ध गाडगे नगर पोलिसांनी कलम १३२,२२१,३५१(२),३(५) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## चिमुकल्यांनी रांगोळी व चित्रकलेच्या माध्यमातून दिला मतदान जनजागृतीचा संदेश





**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्यापैकी नुकतेच हिंदी शाळा क्रमांक ११, भाजी बाजार , मनपा उच्च प्राथमिक शाळा क्रमांक १३ व मनपा उर्दू उच्च प्राथमिक शाळा क्रमांक ०६ चपराशी पुरा येथे विद्यार्थ्यांची रांगोळी स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी मतदान माझा अधिकार यावर आधारित विविध प्रकारच्या रांगोळ्या तसेच चित्रे काढून मतदान जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. तसेच यावेळी स्वीप उपक्रमांतर्गत उपस्थित शिक्षक☞(पान २ वर)

## स्व. अशोक सोमाणी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रक्तदान शिबिर

अमरावती/प्रतिनिधीः-

सोमाणी कुटुंब आणि रक्तदान समितीने गेल्या चार दशकांपासून दिवंगत अशोक मांगीलाल सोमाणी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्याची अनोखी परंपरा सुरू ठेवली आहे. आज रविवार, २१ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता, वर्धमान नगर येथील समितीचे अध्यक्ष महेंद्र भुतडा यांच्या निवासस्थानी 'बी पॉझिटिव्ह' येथे हे शिबिर होणार आहे. या शिबिराला आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, गणेशदास राठी वसतिगृह



समितीचे अध्यक्ष वसंतबाबू मालपाणी, श्री माहेश्वरी पंचायतीचे नवनिर्वाचित अध्यक्ष सुरेश साबू, सचिव अशोक जाजू, बस डेपोच्या पिण्याच्या पाण्याच्या सुविधेचे यशस्वी संचालक आणि ज्येष्ठ समाजसेवक गोपालदास राठी सयतवाले हे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सोमाणी कुटुंब आणि रक्तदान समितीने सर्वांना उपस्थित राहून शिबिरात योगदान देण्याचे आवाहन केले आहे.

# सारांश

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

❑ रविवार, २१ डिसेंबर२०२५ ❑ E-paper - www.janmadhyam.com


सरत्या वर्षाअखेर मराठवाड्याच्या बाबतीत दोन आनंद वार्ता समोर आल्या. या दोन्हीही वार्ता मराठवाड्याचा कायापालट करू शकतात. पहिली म्हणजे लातूर ते कल्याण-मुंबई हा नवीन रस्ता चार ते पाच तासांत मराठवाडा ते मुंबई जोडणारा एक प्रगतिशील मार्ग ठरणार आहे. दुसरा महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर मार्गे पुणे. हा नवीन रस्ता केवळ दोन तासांत पुणे-संभाजीनगर अंतर पार करणार आहे.

# विकासासाठी गडकरींचा पुढाकार

मराठवाड्यातील लातूर-कल्याण-मुंबई असा द्रुतगती महामार्ग उभारण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. या द्रुतगती महामार्गामुळे लातूर ते मुंबई हा प्रवास केवळ चार ते पाच तासांत शक्य होणार आहे. याचबरोबर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मराठवाड्याच्या बाबतीत आणखी एक आनंद वार्ता दिली. छत्रपती संभाजीनगर ते पुणे या मार्गावर १६,३१८ कोटी रुपयांचा नवीन एक्स्प्रेस वे बांधला जाणार आहे. यातील पहिला टप्पा पुणे-अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर असा असणार आहे. या मार्गाची दुरुस्ती आणि



उड्डाणपूल बांधण्यासाठी दोन हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर दुसरा मार्ग हा शिक्रापूर ते अहिल्यानगर बाहेरून बीड जिल्ह्यातून काढण्यात येणार आहे. त्या मार्गावर फक्त टोलचे काम शिल्लक राहिले आहे. या मार्गामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगर दोन तासांत आणि छत्रपती संभाजीनगर ते नागपूर हे अंतर अडीच ते पावणेतीन तासांत शक्य होणार आहे. भविष्यात मराठवाड्याचा कायापालट करणारे हे दोन मोठे प्रकल्प लवकर पूर्ण होण्याची गरज आहे. विदर्भातील हे दोन्ही नेते मराठवाड्याला पावले आहेत. प्रत्यक्षात मराठवाड्यात असणाऱ्या खंडीभर नेत्यांच्या डोक्यातही न येणारी कल्पना नितीन गडकरी व देवेंद्र फडणवीस यांनी बोलून दाखविली. त्यामुळे या दोन्ही नेत्यांच्या बाबतीत मराठवाड्यात शब्दरूपी गौरव होत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना 'रोडकरी' असे म्हटले जाते. ते या रूपाने नक्कीच दिलेला शब्द पूर्ण करतील, असे मानले जाते, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एक कर्तबगार मुख्यमंत्री म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांनी दिलेला शब्द हा मराठवाड्यासाठी अंतिम ठरणार आहे. या दोन्ही नेत्यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी पुढाकार घेतल्याने त्यांचे मराठवाड्यात मोठे कौतुक केले जात आहे.

**डॉ. अभयकुमार दांडगे**

सरत्या वर्षाअखेर मराठवाड्याच्या बाबतीत दोन आनंद वार्ता समोर आल्या. या दोन्हीही वार्ता मराठवाड्याचा कायापालट करू शकतात. पहिली म्हणजे लातूर ते कल्याण-मुंबई हा नवीन रस्ता चार ते पाच तासांत मराठवाडा ते मुंबई जोडणारा एक प्रगतिशील मार्ग ठरणार आहे. ४४२ किलोमीटरच्या या अंतरासाठी सद्यस्थितीला दहा ते बारा तास लागतात; परंतु हा मार्ग चार ते पाच तासांवर आल्यास दळणवळणाच्या सुविधांमुळे लातूर, धाराशिव या दोन जिल्ह्यांचा औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास मोठ्या प्रमाणात होणार आहे. दुसरा महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर मार्गे पुणे. हा नवीन रस्ता केवळ दोन तासांत पुणे-संभाजीनगर अंतर पार करणार आहे. असे झाल्यास मराठवाड्यातील नागरिकांना छत्रपती संभाजीनगरवरून केवळ दोन तासांत पुणे गाठता येणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राज्यातील रस्ते, पूल, एक्स्प्रेस वे आणि इतर विकासकामांसाठी येत्या वर्षात दीड लाख कोटी रुपयांची कामे मंजूर करण्यात आल्याची माहिती दिली. या कामांमध्ये छत्रपती संभाजीनगर ते पुणे या प्रकल्पाचाही समावेश आहे. हे दोन्ही मार्ग मराठवाड्याचा भविष्यात नक्कीच कायापालट करतील. केवळ जाहीर केल्याप्रमाणे हे दोन्ही मार्ग ठरल्यावेळेत पूर्ण झाले तर येत्या पाच वर्षांत मराठवाड्याचा प्रगतीचा आलेख उंचावणारा राहणार आहे.

कुठल्याही भागाचा विकास हा रस्ते, पाणी, वीजपुरवठा यावर अवलंबून असतो. औद्योगिक विकासासाठी या तीन गोष्टींची पूर्तता झाली की मोठे - मोठे उद्योग, व्यापार तसेच व्यवसायाच्या निमित्ताने त्या भागाचा विकास होत असतो. मुंबई-पुणे-नाशिक या मोठ्या शहरांच्या धर्तीवर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर वगळता अन्य जिल्ह्यांची अवस्था उद्योगाच्या बाबतीत केविलवाणीच आहे; परंतु भविष्यात मराठवाड्यात रस्त्यांची पुणे व मुंबईला जवळीकता निर्माण झाल्यास आपोआपच मराठवाडा हा सर्व दृष्टीने सुखदायी भाग म्हणून समोर येऊ शकतो.

यापूर्वी मराठवाड्यातील अनेक नेते केंद्रात तसे राज्यात मोठ्या पदांवर मंत्री म्हणून होते; परंतु त्यांनी मराठवाड्याचा कायापालट होईल, असा एकही निर्णय घेतला नाही; परंतु विदर्भातील नितीन गडकरी व देवेंद्र फडणवीस या दोन्ही नेत्यांनी मराठवाड्याचा कायापालट करण्यासारखा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मराठवाड्यात राहून राज्यात व केंद्रात मराठवाड्याचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांवर प्रसारमाध्यमातून टीकेची झोड उठत आहे. विदर्भातील या दोन्ही नेत्यांच्या माध्यमातून पुणे व मुंबईला जोडणारा अतिशय जवळचा द्रुतगती महामार्ग मिळणार आहे.

यामुळे मराठवाड्यात सरत्या वर्षात जल्लोष करण्यासारखीच वेळ आहे. एकीकडे द्रुतगती महामार्ग व दुसरीकडे रेल्वेसेवा या दोन्हींमुळे परिसराचा मोठा विकास होतो. त्या दृष्टीने मराठवाड्यात रेल्वेचे जाळे विस्तारण्यावर केंद्र व राज्य सरकारचा भर आहे. मराठवाड्यातील बीड हा जिल्हा रेल्वेसेवेच्या बाबतीत थोडा कमनशिबीच आहे. बीड जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी बीड ते वडवणी या रेल्वे मार्गावर १३२ किलोमीटर ताशी याप्रमाणे यशस्वी चाचणी घेण्यात आली. त्यामुळे आता अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ या नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाला फलश्रुती प्राप्त झाली आहे. या प्रकल्पातील बीड ते वडवणी या ३२ किलोमीटर लांबीच्या टप्प्याची वैधानिक सुरक्षा तपासणी नुकतीच यशस्वी झाली. या मार्गावर ताशी १३२ किलोमीटर वेगाने रेल्वे धावली. त्यामुळे आता बीडच्या पुढे वडवणीपर्यंत रेल्वे धावण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मराठवाड्याला बळ देणाऱ्या अहिल्यानगर ते बीड या १६८ किलोमीटर मार्गावर यापूर्वीच प्रवासी सेवा सुरू झाली. आता बीड ते वडवणी या टप्प्याची तपासणी पूर्ण झाल्यामुळे लवकरच या नवीन मार्गावर रेल्वे वाहतुकीसाठी परवानगी मिळणार आहे. त्यामुळे परळी वैजनाथच्या दिशेने हा प्रकल्प वेगाने पुढे सरकत आहे. मराठवाड्यासाठी ही रेल्वे सेवा गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. ती नवीन वर्षात मार्गी लागणार आहे.

बीड जिल्ह्याचे नेतृत्व त्या ठिकाणी रेल्वे सुविधा ओढून आणण्यात नक्कीच कमी पडले. मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांची तुलना करताना बीड जिल्ह्याला रेल्वेच्या सुविधा खूप कमी मिळाल्या, हे आजवरच्या कामांवरून दिसून येते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी हे पंतप्रधान झाल्यानंतर भाजपच्या माध्यमातून संपूर्ण देशाचा तीव्रतेने विकास होत आहे. त्याचाच फायदा मराठवाड्याला या रूपाने होत आहे.

मराठवाड्यातील गेल्या कित्येक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रकल्प मार्गी लागत आहेत. याचे श्रेय भाजपला तसेच यासाठी कार्यरत असणाऱ्या प्रत्येकालाच जाते. येत्या नवीन वर्षात लातूर- कल्याण या द्रुतगती महामार्गासह छत्रपती संभाजी नगर - पुणे या मार्गाच्या कामाला सुरुवात झाली तर नवीन वर्ष मराठवाड्यासाठी शुभकारक ठरणार आहे, यामध्ये शंकाच नाही.

# उधळलेला बांगलादेश

बांगलादेशातील कट्टरवाद्यांनी ढाक्यातील भारतीय उच्चायुक्तालयावर मोर्चा काढला. शेख हसीना यांचे प्रत्यार्पण करण्याच्या मागण्या करतानाच भारतविरोधी घोषणा दिल्या गेल्या. काही तास अगोदरच त्यांच्या परराष्ट्र मंत्रालयातील एका अधिकाऱ्याने चमत्कारिक दावा केला. बांगलादेश मुक्ती संग्रामात भारतीय लष्कराने बजावलेल्या भूमिकेबद्दलच त्यांनी शंका उपस्थित केली. आमच्या लोकांनीच आमचा देश मुक्त केला, असे त्यांचे म्हणणे होते. फेब्रुवारी महिन्यात त्या देशात निवडणुका होणार आहेत. त्याचाच हा परिणाम आहे.

बांगलादेशच्या तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांच्या कार्यकाळात भारताच्या विरोधात सौम्य आवाजात जी कुजबूज व्हायची त्याची जागा आता गदारोळ आणि निदर्शनांनी घेतली आहे. आतापर्यंत तेथील सत्तेबाहेरचे घटक विशेषत: जिहादी गट भारताच्या विरोधात बोलत असत. आता सरकारमधील घटकही बोलू लागले आहेत. हा निवडणुकीच्या राजकारणात शिरकावाचा एक भाग आहे. एका पक्षाच्या नेत्याने भारताच्या ईशान्येकडील राज्यांना ज्यांना भारतात सात भगिनी म्हणून अथवा सेव्हन सिस्टर्स म्हणून ओळखले जाते त्यांना भारतापासून तोडण्याची दर्पोक्ती केली आहे.

भारताने अद्याप यावर कोणतीही मोठी प्रतिक्रिया अथवा इशारा दिलेला नाही. सौम्यपणे ज्या स्तरावर जे समजावून सांगायचे आहे ते सांगितले आहे. मालदीवबाबतचा पूर्वानुभव जमेस असल्यामुळे भारताला बांगलादेशात असे होणे अपेक्षित आहे. पण ज्या बांगलादेशाच्या मुक्तीसाठी भारताने निर्णायक भूमिका बजावली, ज्या बांगलादेश मुक्ती युद्धाचा विजय दिन भारतात अभिमानाने साजरा केला जातो, ज्या बांगलादेशच्या मुक्ततेसाठी इतक्या वर्षांनंतरही भारताचे फिल्ड मार्शल माणेकशॉ यांची आणि देशाच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची प्रशंसा केली जाते, त्यांना दुर्गा संबोधले गेले त्या बांगलादेशीयांना भारताबद्दल अचानक एवढा तिरस्कार निर्माण होण्याचे कारणच काय? पाकिस्तान सतत भारताला पाण्यात पाहतो ते सगळे समजू शकतात.

पाकिस्तानचे स्वत:चे काही नव्हते. जे काही मिळाले होते किंवा आहे ते त्यांनी आपलेच ओरबाडून घेतले आहे. तथापि, बांगलादेशींना ते बंगाली आहेत म्हणून पाकिस्तानकडून होणाऱ्या अत्याचारापासून भारताने मुक्त केल्यावरही ते भारताविरुद्ध विषच ओकत असतील तर हा प्रकार सर्वसामान्य भारतीयांना चक्रावणारा आहे. अर्थात, त्यात फार गंभीर व्हावे अशी आज स्थिती नाही. मात्र, भविष्यात तसे होऊ नये याची दक्षताही घ्यावी लागणार आहे. भारतविरोधी जनभावना निर्माण होण्याच्या कारणांपैकी असलेले प्रमुख कारण म्हणजे तेथील राजकारण. सत्ताधारी पक्षाने विरोधी पक्षाला त्रास देण्याची तेथील परंपरा आहे. तशी ती सगळीकडेच असते. मात्र, येथे संघर्षाचा प्रकार रक्तरंजित वगैरे असतो. शेख हसीना सलग तिसऱ्या टर्मसाठी सत्तेवर होत्या.

त्यांनी बांगलादेशात जे काही केले ते भारताच्या सांगण्यावरून अथवा भारताच्या पाठबळावरूनच केले असा समज सध्या तेथील लोकांचा करून देण्यात आला आहे. विशेषत: त्यांनी कट्टरवाद्यांना जे वेसण घातले त्याचा राग कट्टरवाद्यांच्या गटांकडून आता काढला जातो आहे. तशी संधी त्यांना आता मिळाली आहे. पलायन केल्यानंतर हसीना यांनी भारतातच आश्रय घेतल्यामुळे हा समज आणखी दृढ झाला. बांगलादेशातील प्रमुख विरोधी पक्षाच्या नेत्या खालिदा झिया यांची प्रकृती गंभीर आहे तर मुलगा परदेशात आहे. अशा स्थितीत जे फुटकळ पक्ष पाच टक्के मतांपर्यंत जेमतेम मजल मारू शकत होते ते आणि त्यांचे कथित नेते उधळले आहेत. शेख हसीना यांच्याकडून झालेल्या कथित दडपशाहीच्या विरोधात जनमत एकत्रित करण्यासाठी भारताचा वापर केला जातो आहे. मालदीवमध्येही असेच घडले होते.

निवडणुकांच्या वेळी विरोधात असलेल्या मोहम्मद मोइज्जू यांनी भारतावर गरळ ओकण्यास सुरुवात केली. त्यांच्या देशातील तत्कालीन सरकार भारताकडे कसे झुकले आहे हाच त्यांनी प्रमुख मुद्दा बनवला आणि एवढ्यावरच न थांबता 'इंडिया आउट'चा नाराही दिला. आपण जास्तीत जास्त चीनधार्जिणे असण्याचा आणि दिसण्याचाही प्रयत्न त्यांनी केला. त्यावेळीही भारताने सबुरीचेच धोरण स्वीकारले. मोइज्जू यांचे सरकार आल्यावर त्यांनीच भारतासोबत संबंध सुरळीत करण्यासाठी पुढाकार घेतला आणि आज जवळपास पहिल्यासारखीच स्थिती आहे. बांगलादेशच्या संदर्भातही चीनचा एक पैलू आहेच. तेथील विद्यमान सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूसही चीनच्या संदर्भात जास्तच स्नेह दाखवण्याच्या प्रयत्नात फार पुढे निघून गेले. वास्तविक युनूस राजकारणात आउटसाइडर आहेत.

त्यांना राजकारणात भविष्य नाही, मात्र, त्यांनी भारताच्या विरोधात वातावरण निर्माण करण्याला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष संमती दर्शवून देशाचे नुकसानच केले. चीनसोबतच पाकिस्तानबद्दल त्यांचे ममत्व विशेष दिसून आले. वास्तविक आपण अगोदर बंगाली आहोत मग मुसलमान आहोत यातूनच त्याकाळी संघर्ष सुरू झाला होता आणि पाकिस्तानचा भाग असलेल्या आताच्या बांगलादेशींच्या पूर्वजांना त्रास आणि अत्याचार सहन करावा लागला होता. त्याच बांगलादेशात आता ते अगोदर मुसलमान आहेत आणि नंतर बंगाली असे ठसवले जात आहे किंवा त्यांनी ठसवून घेतले असून त्यातूनच भारताला खलनायक म्हणून रंगवण्याचा प्रयत्न होतो आहे. शेख हसीनांच्या राजवटीबाबत तेथील विरोधकांचे लाख आक्षेप असू शकतात, मात्र त्यांनी कट्टरपंथीयांना, दहशतवाद्यांना तोडले होते.

त्या कट्टरवाद्यांना आता पुन्हा संधी दिसत आहे. त्याची परिणती म्हणूनच भारतीय उच्चायुक्तालयावर काढलेल्या मोर्चाकडे पाहता येईल. जाणकारांच्या म्हणण्यानुसार, सध्या जो काही भारतविरोधी प्रचार सुरू आहे ती राजकीय भूमिका आहे व ती पुढच्या दिवसांत आणखी वाढलेली दिसेल. त्यावर भारताने फार आक्रमक होण्याची गरज नाही. बांगलादेशातील राजकीय नेत्यांना चीनधार्जिणा अथवा पाकधार्जिणा दिसण्याची किंवा भासवण्याची आवश्यकता वाटत असेल. त्यातून कदाचित ते सत्तेपर्यंत पोहोचूही शकतील, मात्र परिस्थिती फार काळ सारखी राहात नाही. बदल होतो, मालदीवमध्ये झाला, श्रीलंकेत झाला आणि नेपाळमध्येही झाला.

# रुपयाची घसरण: अर्थव्यवस्थेचा कोंडला श्वास

अलीकडील काळात रुपयावरील वाढत्या दबावामागे अनेक कारणे आहेत, ज्यात डॉलरची मजबुती, जागतिक अनिश्चितता वाढणे आणि मजबूत परदेशी मागणी यांचा समावेश आहे. यापूर्वी अशी लक्षणीय घसरण २०२२ मध्ये दिसून आली होती. गेल्या काही दिवसांपासून बाजारातील अनिश्चितता वाढत आहे. डॉलर मजबूत होत आहे. परिणामी, गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक पर्याय शोधत असून डॉलरकडे वळत आहेत. याव्यतिरिक्त परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारपेठेतून पैसे काढण्याचा वेग वाढवला आहे. परिणामी, रुपया कमकुवत होत असून डॉलरची मागणी वाढत आहे. रुपया ९० च्या पुढे जाणे हे देखील बाजारातील बदल दर्शवते. अमेरिकन धोरणांचाही रुपयावर परिणाम होत आहे. अमेरिकेने भारतावर ५० टक्के कर लादला आहे. शिवाय, भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करारात होणारा विलंब, अमेरिकेची आर्थिक धोरणे आणि अमेरिकन 'फेडरल रिझर्व्ह'च्या व्याजदराबद्दल वाढत्या अटकळींमुळे रुपयावर दबाव वाढत आहे. रुपयाच्या कमकुवतपणामुळे केवळ आयात किमती वाढत नाहीत, तर पेट्रोल आणि डिझेल, यंत्रसामग्री, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक्स आणि अगदी परदेशी प्रवासाच्या किमतीही वाढतात. रुपया ऐतिहासिक नीचांकी पातळीवर पोहोचला असताना दबाव कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँक डॉलर्सची विक्री करू शकते. तथापि, रिझर्व्ह बँकेच्या हस्तक्षेपाचा मर्यादित परिणाम होईल, कारण सध्या रुपयावर मोठा दबाव आहे. बाजार अजूनही रिझर्व्ह बँकेच्या पुढील पावलांवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. अमेरिकेसोबतच्या एका मोठ्या व्यापार कराराला अंतिम स्वरूप देण्यास झालेल्या विलंबामुळे भारतीय रुपयात मोठी घसरण झाली आहे.

'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार गेल्या काही आठवड्यांमध्ये रुपया वाचवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने फारसा हस्तक्षेप केलेला नाही आणि परदेशी गुंतवणूकदार शेअर बाजारातून पैसे काढत आहेत. या दोन्ही घटकांमुळे रुपयावरही दबाव येत आहे. आयात महाग होत असल्याने सामान्य माणसाच्या खिशावर महागाईचा भार आणखी वाढू शकतो. मोठ्या कंपन्या, आयातदार आणि परदेशी गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणात डॉलर खरेदी करत आहेत. म्हणूनच रुपया सतत कमकुवत होत आहे. या व्यतिरिक्त, कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडत आहेत. त्यामुळे गुंतवणूकदारांचा मूड आणखी बिघडत आहे. याचा अर्थ डॉलरची मागणी खूप जास्त आहे आणि पुरवठा कमी आहे. परिणामी, सतत घसरण होत आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढण्याची भीतीदेखील आहे. त्याचा थेट परिणाम आपल्या खिशावर होईल. एरव्ही बाजारात डॉलर्स विकून रिझर्व्ह बँक रुपयाला घसरण्यापासून वाचवत असते; परंतु या वेळी रुपया थोडा मजबूत झाला, तेव्हा रिझर्व्ह बँकने स्वतः डॉलर्स खरेदी केले. भारताची अर्थव्यवस्था खूप मजबूत आहे. जीडीपीची वाढ ८.२ टक्के आहे. तथापि, डॉलरची मागणी वाढल्यामुळे, हे सकारात्मक पैलू झाकोळले गेले असून रुपया कमकुवत दिसत आहे. याचा अर्थ, प्रत्यक्षात परिस्थिती चांगली आहे; परंतु डॉलर्सची भूक जास्त आहे. चलनातील घसरणीचे कारण परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारां(एफपीआय) कडून दररोज होणारी विक्री हे आहे. गेल्या आठ महिन्यांपासून रुपया घसरत आहे आणि आता तो एका नवीन नीचांकावर पोहोचला आहे. बराच काळ स्थिर असलेल्या रुपयाने गेल्या वर्षीच ८५-९० चा टप्पा ओलांडला आहे. अलीकडे डॉलरच्या तुलनेत रुपया २५ पैशांनी घसरून ९०.२१ च्या नवीन नीचांकावर बंद झाला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी एक डॉलर एका रुपयाच्या बरोबरीचा होता असे अनेकदा ऐकायला मिळते. ही कल्पना चांगली वाटते; परंतु आर्थिक तथ्ये आणि ऐतिहासिक नोंदी वेगळेच सांगतात. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीचा विचार केल्यास भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी एक रुपया एक डॉलरच्या बरोबरीचा होता, हा दावा खरा नाही. केंद्रीय बँकेच्या 'आरबीआय, द १९९१ प्रोजेक्ट डेटा' या दस्तावेजानुसार स्वातंत्र्याच्या वेळी, भारतीय रुपया अमेरिकन डॉलरशी नव्हे, तर ब्रिटिश पौंड स्टर्लिंगशी जोडलेला होता. रुपयाचा विनिमय दर पौंड या चलनाद्वारे निश्चित केला जात असे. त्या वेळी एक पौंड १३.३३ रुपयांच्या बरोबरीचा होता. त्या वेळी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ब्रिटिश पौंडचे मूल्य ४.०३ डॉलर होते. १९६६ मध्ये भारतीय चलनाची पहिली मोठी घसरण झाली. या काळात डॉलरच्या तुलनेत रुपया ४.७६ वरून ७.५० वर आला. हे त्या काळातील अशांत काळामुळे झाले. चीन (१९६२) आणि पाकिस्तान (१९६५) सोबतच्या युद्धांमुळे देश समस्यांशी झुंजत होता. या युद्धांमुळे अर्थव्यवस्था बिघडली. १९६५-६६ मध्ये देशात तीव्र दुष्काळ पडून अन्नधान्य उत्पादनात घट झाली आणि महागाई गगनाला भिडली. या कठीण काळात भारताला परकीय मदतीची नितांत आवश्यकता होती. जागतिक बँक आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांनी निर्यात वाढवण्यासाठी भारताने आपल्या चलनाचे अवमूल्यन करावे असा आदेश दिला. त्यानंतर डॉलरच्या तुलनेत रुपया ७.५० वर घसरला.

**कैलास ठोळे**

१९९१ हे वर्ष रुपयाच्या घसरणीच्या दृष्टीने देशासाठी महत्त्वाचे ठरले. आर्थिक आव्हानांना तोंड देत देशाने आर्थिक उदारीकरणाला सुरुवात केली. या वेळी रुपया २१ वरून २६ च्या आसपास घसरला. हा भारताच्या आर्थिक इतिहासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा होता. देयकांच्या संतुलनाच्या संकटामुळे भारताकडे आयात (तेल, आवश्यक वस्तू) खरेदी करण्यासाठी फक्त तीन आठवड्यांचा परकीय चलन साठा होता. दुसरीकडे, आखाती युद्ध किंवा इराक-कुवेत युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या. त्यामुळे भारताचे आयात बिल लक्षणीयरीत्या वाढले. यामुळे रुपया आणखी कमकुवत झाला. राजकीय अस्थिरतेने देशाला वेढले आणि गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होत गेला. या संकटावर मात करण्यासाठी तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग आणि पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी अर्थव्यवस्था उदार करण्याचा आणि निर्यात स्वस्त करण्यासाठी आणि परकीय चलन आणण्यासाठी दोन टप्प्यात रुपयाचे अवमूल्यन करण्याचा निर्णय घेतला. १९९१ नंतर देशात आघाडी सरकारांचा काळ आला. १९९१ ते २००८ दरम्यान रुपया ३९ रुपयांपर्यंत कमकुवत झाला. २००८ च्या मंदीनंतर रुपया घसरून डॉलरच्या तुलनेत ५१ रुपये झाला. तथापि, ही घसरण जागतिक घटकांमुळे होती. अमेरिकेतील लेहमन ब्रदर्स बँकेच्या पतनामुळे जागतिक मंदी आली. जोखीम टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या परदेशी गुंतवणूकदारांनी भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठांमधून पैसे काढून घेण्यास सुरुवात केली. डॉलरची मागणी वाढल्याने रुपया आणखी कमकुवत झाला. रुपयात शेवटची मोठी घसरण २०१३ मध्ये झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेवर येण्यापूर्वी डॉलरच्या तुलनेत रुपया ५५ वरून ६८.८० वर आला. या वर्षी, अमेरिकन 'फेडरल रिझर्व्ह'ने त्याचा प्रवाह कमी करण्याची घोषणा केली.

# बॉलीवूड क्विन माधुरी दिक्षित साकारणार नवी भूमिका



बॉलीवूडची ग्लॅमर्स अभिनेत्री माधुरी दीक्षित साकारणार हटके भूमिका. दू वर चर्चेत असणारी वेब सिरीज म्हणजेच Mrs Deshpan, अखेर हि वेब सिरीज आज प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. माधुरी दीक्षित यांनी २०२२ मध्ये 'द फेम गॅमे' ह्या वेब सिरीज मध्ये उत्कृष्ट काम केले होते. यामुळेच Mrs Deshpan या वेब सिरीज साठी प्रेक्षक उत्सुक आहेत.

माधुरी दीक्षित हि वेब सिरीज १९ डिसेंबर २०२५ ला हॉटस्टार वरती रिलीझ होणार असून या वेब सिरीज मध्ये माधुरी दीक्षित एका वेगळ्याच रूपात दिसणार आहे. ही सिरीज क्राइम आणि थ्रिलर असून, माधुरी दीक्षित यात सीरिअल किलरची भूमिका साकारणार आहे, आजपर्यंत साकारलेल्या सोज्वळ भूमिकांपासून थेट सिरीअल किलर ची भूमिका खूपच आगळी वेगळी असणार आहे.

या सीरिजचं दिग्दर्शन नागेश कुकुनूर यांनी केलं आहे. ही सीरिज फ्रेंच मिनीसीरिज 'ला मांटे'चे अधिकृत रूपांतरण आहे. 'ला मांटे' ही सीरिजची निर्मिती एलिस चेगरे-ब्रेग्नोट, निकोलस जीन आणि ग्रेगोइरे डेमाइसन यांनी केली होती. ह्या सिरीज चे एकूण ६ एपिसोड आहेत आणि ते एकत्रच म्हणजेच १९ डिसेंबर मध्य रात्री रिलीझ होणार आहे. या सीरिजमध्ये माधुरी दीक्षितसोबत मराठी अभिनेता सिद्धार्थ चांदेकरही महत्त्वाची भूमिका साकारतोय. तर प्रियांशु चटर्जी आणि दीक्षा जुनेजा हे कलाकारही वेगवेगळ्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत.

# बॉलीवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टीला दणका



बॉलीवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि ती तिचा पती राज कुंद्रा यांच्या अडचणीत कायम वाढ होताना दिसत आहे. पाहिलं म्हणजे २०११ मध्ये सुरू झालेले अश्लील चित्रपट निर्मितीचे प्रकरण ज्यात तो अटक झाला आणि त्याचे जामीन अर्ज फेटाळले गेले; दुसरे म्हणजे सध्या (२०२५ मध्ये) सुरू असलेले ६० कोटी रुपयांच्या आर्थिक फसवणुकीचे प्रकरण, ज्यात अंमलबजावणी संचालनालय आणि मुंबई पोलिसांची कारवाई सुरू आहे, या कारवाईचा दरम्यान १८ डिसेंबर ला आयकर विभागाने शिल्पाच्या मुंबईतील जुहू येथील घरावर छापा टाकला. हि कारवाई बंगळुरू यामधील तिच्या प्रसिद्ध हॉटेल बॅस्टियन गार्डन सिटीशी संबंधित एका प्रकरणासंदर्भात करण्यात आली आहे. आयकर विभाग मुंबईतीलच नव्हे तर बंगळुरूच्या हॉटेलच्या ठिकाणीही छापा टाकून शोध मोहीम राबवण्यात येत आहे.रेस्टॉरंट आणि त्याचाशी संबंधित कंपन्यांच्या आर्थिक नोंदी तपासल्या जात असून, हॉटेल व्यवसायात गुंतवणूक, उत्पन्न आणि कर भरण्यात अनियमितता असल्याचा आयकर विभागाला संशय असलयाने हि धडक कारवाई केली

# 'नायक नही खलनायक हु मैं!

चित्रपट सृष्टीत नेहमीच नायकाचा बोलबाला असतो, पण सध्या प्रदर्शित झालेला 'धुरंधर' हा चित्रपट वेगळ्याच कारणाने चर्चेत आला आहे. या चित्रपटात अभिनेता अक्षय खन्ना याने साकारलेला खलनायक प्रेक्षकांच्या मनावर राज्य करत आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटात मूळ नायकापेक्षा अक्षय खन्नाच्या अभिनयाची आणि त्याच्या करारी भूमिकेची चर्चा जास्त रंगताना दिसत आहे.



जेव्हा 'व्हिलन' ठरतो चित्रपटाचा चेहरा हिंदुस्थानी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात असे अनेक चित्रपट आहेत जिथे खलनायकाचे व्यक्तिमत्त्व नायकापेक्षा जास्त प्रभावशाली ठरले आहे. मग तो 'मिस्टर इंडिया'मधील अजरामर 'मोगॅम्बो' असो किंवा 'शान'मधील हायटेक 'शाकाल'. या भूमिकांनी केवळ नायकाला आव्हान दिले नाही, तर प्रेक्षकांना सिनेमागृहाकडे खेचून आणले.

**नावात आणि कामातही 'खलनायक'ची चर्चा**

काही वर्षांपूर्वी आलेल्या 'गझनी' चित्रपटाचे उदाहरण बोलके आहे. या चित्रपटाचा नायक आमीर खान असला तरी चित्रपटाचे नाव मात्र खलनायकाच्या नावावरून (गझनी) ठेवले गेले होते आणि तो चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला. तसेच 'डर' चित्रपटात शाहरुख खानने साकारलेला वेडा प्रेमी असो, 'पानिपत'मधील अहमद शाह अब्दालीच्या भूमिकेत दिसलेला संजय दत्त असो किंवा अलीकडेच 'शैतान'मध्ये आपल्या थरारक अभिनयाने प्रेक्षकांना घाबरवणारा आर. माधवन असो; या सर्वांनी 'हिरो'च्या तोडीस तोड लोकप्रियता मिळवली.

सध्याच्या काळात प्रेक्षक केवळ पडद्यावरचा चांगुलपणा पाहत नाहीत, तर भूमिकेची खोली आणि कलाकाराचा अभिनय पाहतात. त्यामुळेच 'धुरंधर'मधील अक्षय खन्नाच्या निमित्ताने हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की, जर खलनायक भक्कम असेल, तर चित्रपट प्रेक्षकांच्या कायमस्वरूपी स्मरणात राहतो.

# हर्ष लिंबाचिया आणि भारती सिंग यांना पुन्हा एकदा पुत्ररत्न

मुंबईतील लोकप्रिय विनोदी अभिनेत्री भारती सिंग आणि हर्ष लिंबाचिया यांना पुन्हा एकदा पुत्ररत्नाचा लाभ झाला आहे. भारतीने आज (१९ डिसेंबर) एका गोंडस बाळाला जन्म दिला असून लिंबाचिया कुटुंबाचा वंश वाढला आहे.'लाफ्टर शेफ्स सीझन ३'च्या सेटवर शूटिंग करत असताना भारतीला प्रसूती वेदना सुरू झाल्या आणि तिला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान तिने एका निरोगी, गोंडस बाळाला जन्म दिला असून भारती आणि तिचे बाळ दोघांचीही प्रकृती उत्तम आहे.



भारती आणि हर्ष या जोडप्याला आधीच लक्ष उर्फ गोला नावाचा तीन वर्षांचा मुलगा आहे. मात्र भारती आणि हर्ष यांना यावेळी मुलीची इच्छा होती. पण त्यांना पुन्हा एकदा मुलगा झाला आहे. तरी संपूर्ण कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे. तसेच भारती आणि हर्षच्या चाहत्यांनाही आनंद झाला आहे. दरम्यान गरोदरपणातून ती सुंदर सुंदर फोटोशूट करून आपले आईपण साजरे करताना दिसत होती.

अलीकडेच भारती म्हणाली की, अतिरिक्त वजन कमी केल्यामुळे तिला आरोग्याच्या समस्यांवर मात करण्यास मदत झाली असून नैसर्गिकरित्या गर्भधारणा करण्याचा तिचा आत्मविश्वास वाढला. तिच्या एका व्लॉगमध्ये, भारती ने एक गोड क्षण शेअर केला आणि तिच्या चाहत्यांना सांगितले की, तिचा मुलगा गोलाने त्याच्या लहान भावंडासाठी आधीच एक टोपणनाव निवडले आहे.

हर्ष आणि भारतीची या दोघांची भेट २००९ मध्ये 'कॉमेडी सर्कस'च्या सेटवर झाली आणि अखेरीस त्यांनी २०१७ मध्ये लग्न केले.

भारती आणि हर्ष 'हुनरबाज: देश की शान', 'खतरा खतरा खतरा', 'हम तुम और देम' आणि 'लाफ्टर शेफ्स' सारख्या कार्यक्रमांमधील त्यांच्या कामासाठी लोकप्रिय आहेत.

# 'डिअर पँथर' मराठी शॉर्टफिल्मची परदेशातही चर्चा

ऑस्कर नामांकित चित्रपट महोत्सवा साठी पात्र ठरलेला मराठी लघुपट 'डिअर पँथर' याची लंडन इथल्या प्रतिष्ठित लिफ्ट-ऑफ ग्लोबल नेटवर्क – लंडन लिफ्ट-ऑफ फिल्म फेस्टिव्हल २०२५ मध्ये अधिकृत निवड झाली आहे. जागतिक स्तरावरील उदयोन्मुख चित्रपट निर्मात्यांसाठी हा महोत्सव एक महत्त्वाचा आणि विश्वासार्ह मंच मानला जातो.



सामाजिक वास्तवाचे प्रभावी व संवेदनशील चित्रण करणारा 'डिअर पँथर' हा लघुपट आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष चर्चेचा विषय ठरत आहे. या लघुपटाची कथा एका पीएच.डी. विद्यार्थ्याभोवती फिरते, जो आपल्या हक्काच्या घरासाठी स्थानिक महानगरपालिकेशी झुंज देतो. ही केवळ वैयक्तिक लढाई नसून, शासकीय अन्याय, व्यवस्थात्मक दुर्लक्ष आणि वाढत्या सामाजिक विषमतेविरुद्धचा व्यापक संघर्ष आहे. 'असलेले' आणि 'नसलेले' यांच्यातील वाढती दरी अधिक तीव्र होत असताना, 'पँथर' हे पात्र दडपल्या गेलेल्या वर्गाचा आवाज बनून पुढे येते.

# 'होमबाऊंड' निघाला ऑस्करला

ऑस्कर २०२६ साठी हिंदुस्थानी चित्रपट 'होमबाऊंड'ची निवड झाली आहे. ९८ व्या ऑस्कर पुरस्कारांमध्ये बेस्ट इंटरनॅशनल फीचर फिल्म कॅटेगरीसाठी या चित्रपटाला शॉर्टलिस्ट करण्यात आले आहे. द अकॅडमी ऑफ मोशन पिक्चर्स आर्टस् ॲण्ड सायन्सेसने १२ कॅटेगरीमधील शॉर्टलिस्ट जाहीर केल्या. इंटरनॅशनल फीचर फिल्म कॅटेगरीमध्ये १५ चित्रपट शॉर्टलिस्ट झाले असून त्यापैकी अंतिम फेरीत केवळ ५ चित्रपटांची निवड केली जाणार आहे. दिग्दर्शक नीरज घायवान यांच्या 'होमबाऊंड'ला ९८ व्या अकॅडमी अवॉर्ड्सच्या बेस्ट इंटरनॅशनल फीचर फिल्म कॅटेगरीत शॉर्टलिस्ट करण्यात आले आहे.




चित्रपटाच्या गौरवास्पद कामगिरीबद्दल निर्माता करण जोहरने भावनिक पोस्ट शेअर केली.

करण जोहर म्हणाला, 'होमबाऊंड'चा प्रवास किती अभिमानाचा आणि आनंदाचा आहे, हे शब्दांत सांगणे कठीण आहे. आमच्या फिल्मोग्राफीचा भाग म्हणून या चित्रपटाचा आम्हाला अभिमान आहे. नीरज, आमची स्वप्नं सत्यात उतरवल्याबद्दल धन्यवाद. कान्सपासून ऑस्कर शॉर्टलिस्टपर्यंतचा हा प्रवास अद्भुत होता. संपूर्ण कास्टसाठी प्रेम. ईशान खट्टर, विशाल जेठवा आणि जान्हवी कपूर यांनीही सोशल मीडियावर पोस्ट लिहून आनंद व्यक्त केला.

ऑस्कर २०२६ साठी अंतिम नामांकन २२ जानेवारी २०२६ रोजी जाहीर होणार आहेत. यंदा ऑस्कर सोहळ्याचे सूत्रसंचालन कॉमेडियन कॉनन ओ'ब्रायन करणार असून १५ मार्च २०२६ रोजी पुरस्कार सोहळा होणार आहे.

# सेलिना जेटलीने पतीकडे मागितले १०० कोटी

बॉलीवूड अभिनेत्री सेलिना जेटली हिने तिचा पती पीटर हॅगविरोधात कोर्टात याचिका दाखल केली असून १०० कोटी रुपयांची नुकसानभरपाई मागितली आहे. तसेच दर महिन्याला १० लाख रुपये मेंटेनेन्सची मागणी केली आहे. सेलिनाने पतीवर मारहाण आणि आर्थिक शोषण केल्याचा आरोप केला आहे. सेलिनाच्या या याचिकेवर कोर्टाने दोघांनाही २७ जानेवारीपर्यंत उत्पन्नाचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच कौटुंबिक हिंसाचारांतर्गत तक्रारीवर उत्तर मागवले आहे. लग्न झाल्यापासून मागील १५ वर्षांच्या काळात पतीने शारीरिक, मानसिक आणि भावनात्मक शोषण केल्याचा आरोप सेलिना जेटली हिने केला आहे. पतीने आर्थिक स्वातंत्र्य दिले नाही. प्रोफेशनल कामात पीटरने हस्तक्षेप केला. त्यामुळे मला पूर्णपणे पतीच्या पैशांवर अवलंबून राहावे लागले, असे गंभीर आरोप सेलिना जेटली हिने केले आहेत. याचिकेत म्हटले की, पीटरने सेलिना आणि मुलांना ऑस्ट्रेयाच्या एका गावात सोडले.

एका शेजा-याच्या मदतीने सेलिना तेथून निघाली. पीटरने ऑस्ट्रेयाच्या कोर्टात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे.

# 'माझ्याबरोबर कधीच', गोविंदाबद्दल माधुरी दीक्षितचे वक्तव्य

माधुरी दीक्षितने तिच्या करिअरमध्ये अनेक स्टार्सबरोबर काम केलं. माधुरीने ९० च्या दशकात अनिल कपूर व जॅकी श्रॉफ यांच्याबरोबर बरेच चित्रपट केले. माधुरीची या दोघांबरोबरची केमिस्ट्री प्रेक्षकांना खूप आवडली होती. माधुरीने हे दोन्ही अभिनेते सेटवर वेळेवर यायचे असं म्हणत त्यांचं कौतुक केलं. 'मी देवाचे आभार मानते, की मी अशा लोकांबरोबर काम केलं जे नेहमी वेळेवर यायचे. हे दोन अभिनेते म्हणजे अनिल कपूर आणि जॅकी श्रॉफ होय. गोविंदा सेटवर उशीरा यायचा, असं माझ्याबरोबर कधीच घडलं नाही,' असं माधुरी दीक्षित मिड-डेला दिलेल्या मुलाखतीत म्हणाली. गोविंदा सेटवर उशीरा यायचा असं म्हटलं जातं. त्याच्याबरोबर काम करण्याचा अनुभव कसा होता, हे विचारलं असता माधुरीने हे उत्तर दिलं.



माधुरी दिक्षीतने अनिल कपूबरोबर तेजाब, किशन कन्हैया आणि खेल, बेटा, टोटल धमाल, पुकार या हिट चित्रपटांमध्ये काम केलं. तर जॅकी श्रॉफबरोबर त्रिदेव, खलनायक, देवदासमध्ये काम केलं होतं. गोविंदाबरोबर माधुरीने पाप का अंत, इज्जतदार, महा संग्राम, बडे मियां छोटे मियां हे चित्रपट केले. बडे मियां छोटे मियांमध्ये अमिताभ बच्चन देखील होते.

**सेटवर उशीरा येण्याबद्दल गोविंदा म्हणाला**

मुकेश खन्ना यांना अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत गोविंदाने सेटवर नेहमी उशिरा येण्याच्या आरोपावर स्पष्टीकरण दिलं. 'मी सेटवर कधीही वेळेवर पोहोचत नव्हतो. मी दिलीप कुमार साहेबांचा फॉलोअर होतो. मी उशिरा जायचो नाही. पण जोपर्यंत माझा मूड निट व्हायचा नाही तोवर जायचो नाही, त्यासाठी मला थोडा वेळ लागायचा,' असं गोविंदा म्हणाला.

**दिलीप साहेबांनी २५ चित्रपट सोडायला लावले**

गोविंदाने दिवंगत दिग्गज अभिनेते दिलीप कुमार यांच्याबरोबरची एक आठवण सांगितली. 'माझे एकाच वेळी ४०-४९ चित्रपट सुरू असायचे. मी एका सेटवरून दुसऱ्या सेटवर प्रवास करायचो. मी अशिक्षित माणूस या फिल्म इंडस्ट्रीतल्या लोकांच्या तावडीत सापडलो. जर मला दिलीप कुमार साहेब भेटले नसते, तर या लोकांनी मला जास्त काम करायला लावून माझा जीव घेतला असता. दिलीप साहेबांनी मला जवळपास २५ चित्रपट सोडायला लावले.

# तोंडाची दुर्गंधी टाळण्यासाठी हे करून पहा



तोंडाची दुर्गंधी टाळायची असेल तर स्वच्छ दात घासण्यासोबत जीभ स्वच्छ ठेवायला हवी. कारण जिभेवर दुर्गंधी साचल्यास तोंडाचा वास येऊ शकतो. दररोज सकाळी जीभ क्रॅपरने स्वच्छ करावी तसेच दिवसभर पुरेसे पाणी प्यावे.

अँटीसेप्टिक माऊथवॉश वापरल्याने जिभेवरील बॅक्टेरिया कमी होतात. कोमट पाण्यात अर्धा चमचा मीठ मिसळून गुळण्या केल्याने जंतूंचा नाश होतो. श्वास ताजा राहतो.

सफरचंद, गाजर यांसारखी कडक फळे व ताज्या भाज्या खाल्ल्याने जीभ नैसर्गिकरीत्या स्वच्छ होण्यास मदत होते.

# ब्रेन फॉग छळतोय, लक्षात राहात नाही?



घरातल्या महिलांच्या मागे हजार कामं असतात. घर, ऑफीस, मुलं, त्यांच्या शाळा, सणवार, पाहुणे, घरातल्यांची आजारपणं... अशा कित्येक पातळ्यांवर त्यांना एकाचवेळी लढावं लागतं.

त्या लक्षात ठेवून बऱ्याच गोष्टी करतात. पण तरीही छोटी- मोठी कामं विसरून जातात. वेळ गेल्यावर मग लक्षात येतं की अमूक एक काम करायचंच राहिलं.. त्यामुळे मग ताण वाढत जातो. असं तुमच्याही बाबतीत होत असेल तर पुढे सांगितलेले काही उपाय करून पाहा..


कामांसाठी टाईम बॉक्स तयार करा. म्हणजेच घरातली कामं दिवसाच्या अमूक अमूक वेळेत करायची आहेत. मग काही झालं तरी तो वेळ घरातल्या कामांसाठीच ठेवा. आपोआप कामं सुचत जातील.

एक छोटी डायरी आणि पेन घ्या. किंवा कॅलेंडरवर तुमच्या कामांची यादी लिहून ठेवा. काम झालं की लगेच त्यावर टिकमार्क करा. म्हणजे काय झालं आहे ते ही कळेल आणि काय राहीलं आहे याची पुन्हा रिव्हिजन होईल.

मोबाईलचा वेळ ठरवून टाका. कारण आपण मोबाईल हातात घेतला की त्यात पुढचा कित्येक वेळ रमून जातो आणि मग लक्षात असलेली कामंही विसरून जातो. त्यामुळे मोबाईलवर सोशल मीडिया ठराविक वेळेतच पाहायचं हे ठरवून घ्या.

सकाळी उठल्यानंतर चहा घेऊन झाल्यावर थोडा वेळ डोळे मिटून शांत बसा आणि मनातल्या मनात आज काय काम करायचं आहे, याची उजळणी करा. कामं दिवसभर लक्षात राहतील.

# अनोळखी व्यक्तीने केवायसीचा कॉल केल्यास




सध्या ऑनलाईन फ्रॉड मोठय़ा प्रमाणात वाढले आहेत. बँकेतून बोलत असल्याचे सांगून केवायसी अपडेट न केल्यास बँक खाते बंद केले जाईल, असे सांगितले जाते.


जर तुम्हाला असा कॉल आला तर लगेच कॉल डिस्कनेक्ट करा. त्यांच्याशी बोलू नका किंवा कोणतेही बटन दाबू नका.

कोणतीही बँक कधीही फोनवर ओटीपी, पिन, सीव्हीव्ही किंवा पासवर्ड विचारत नाही. केवायसी अपडेट करायची असेल तर थेट बँकेत जाऊन चौकशी करा.

जर अनोळखी व्यक्तीने केवायसीबद्दल विचारणा केल्यास किंवा फसवणूक झाल्यास तत्काळ राष्ट्रीय सायबर क्राइम किंवा हेल्पलाइन नंबर १९३० वर तक्रार करा.

फोनवर आलेल्या मेसेज किंवा ई-मेलमधील कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नका. केवायसी ब्लॉक केली जाईल, असे सांगितले तरीही त्यांचे ऐकू नका.

# भांडणानंतर बायको रडत राहते आणि नवरा झोपी जातो



आताच एक रील पाहिला, ज्यात भांडण झाल्यावर बायको रडतेय आणि नवरा घोरत झोपलाय. अनेकांनी त्यावर लाफ्टर दिले पण कॉमेंट सेक्शन वाचल्यावर लक्षात आले, घरोघरी मातीच्या चुली. अर्थात भांडणं सगळीकडे होतात आणि त्यानंतर नवरा निद्राधीन होतो तर बायको अश्रूधीन! पण असे का होते? त्यामागची कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न करू.

या प्रश्नाचे उत्तर मानसशास्त्र आणि नैसर्गिकरित्या येणाऱ्या भावनिक प्रतिक्रिया यांच्याशी संबंधित आहे. भांडणानंतर बायको रडते आणि नवरा झोपी जातो, यामागे काही सामान्य कारणे आणि जैविक भेद असू शकतात:

भावनिक अभिव्यक्ती आणि प्रक्रियेतील फरक -स्त्रिया त्यांच्या भावना अधिक सहजपणे आणि सार्वजनिकरित्या व्यक्त करतात. रडणे हा दु:ख, निराशा किंवा ताण बाहेर टाकण्याचा एक नैसर्गिक मार्ग आहे. याला 'तणावमुक्ती' चा प्रकार मानले जाते. भांडणानंतर रडल्याने त्यांना भावनिक आधार मिळतो आणि मन मोकळे होते.

# फोटो एडिट करणे सोपे

चॅटजीपीटीच्या मदतीने आता फोटो एडीट करणे आणखी सोपे होणार आहे. चॅटजीपीटीने इमेज १.५ लाँच केले आहे. या फीचरच्या मदतीने नवीन फोटो बनवणे आणि जुने फोटो एडीट केले जाऊ शकतात. फोटोला ३डीमध्ये बदलणे, स्केच बनवणे, प्लश टॉय डिझाइन करणे, डूडल बनवणे यांसारखी कामे केली जाऊ शकतील. ओपनएआयचे सीईओ सॅम अल्टमन यांनी दिलेल्या माहितीनुसार, इमेज १.५ हे लाँच केले असून एपीआयद्वारे उपलब्ध आहे. या फीचरमध्ये जबरदस्त क्वॉलिटीचे फोटो, वेगवान रिझल्ट आणि नवीन एडिटिंग टूल मिळतील. या फीचरचा वापर करणे खूपच सोपे आणि मजेदार आहे, असे अल्टमन यांनी म्हटले आहे.




# हिवाळ्यात भिजवलेली किंवा भाजलेली मनुका खा

हिवाळ्याच्या दिवसांत सर्दी, खोकला, नाक वाहणं अशा तक्रारी वाढतात. त्यामुळे या काळात आरोग्याकडे विशेष लक्ष देणं गरजेचं असतं. बदलत्या हवामानात योग्य आहार घेतला, तर शरीर निरोगी राहायला मदत होते. तज्ज्ञांच्या मते, हिवाळ्यात मनुका खाणं खूप फायदेशीर ठरतं. भिजवलेली किंवा हलकी भाजलेली मनुका पोषक घटकांनी भरलेली असून ती शरीराला उष्णता आणि ऊर्जा देते. हिवाळ्यात मनुका का आहे सुपरफूड?

हिवाळ्यात शरीराला जास्त ऊर्जा आणि पोषणाची गरज असते. मनुकामध्ये आयर्न, कॅल्शियम, फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. हे घटक शरीर आतून मजबूत करतात आणि थंडीचा त्रास कमी करतात.



**पचनसंस्था ठेवते निरोगी**

रात्री भिजवून सकाळी खाल्लेली मनुका पचन सुधारते. त्यातील फायबरमुळे बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो. हिवाळ्यात पचन मंद होतं, अशा वेळी भिजवलेली मनुका खूप उपयोगी ठरते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते**

मनुकामधील जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स इम्युनिटी मजबूत करतात. नियमित सेवन केल्यास सर्दी-खोकला आणि संसर्गाचा धोका कमी होऊ शकतो.

**रक्त आणि हाडांसाठी फायदेशीर**

मनुका हा आयर्नचा चांगला स्त्रोत आहे, त्यामुळे हिमोग्लोबिन वाढायला मदत होते. त्याचबरोबर कॅल्शियम आणि बोरॉनमुळे हाडं मजबूत राहतात आणि सांधेदुखीचा त्रास कमी होतो.

**ऊर्जा आणि त्वचेसाठी लाभदायक**

सकाळी उपाशीपोटी भिजवलेली मनुका खाल्ल्याने लगेच ऊर्जा मिळते आणि थकवा कमी होतो. तसेच त्वचेला आतून पोषण मिळाल्याने हिवाळ्यातील कोरडेपणा कमी होतो.

एकूणच, हिवाळ्यात भिजवलेली किंवा भाजलेली मनुका आहारात समाविष्ट करणं आरोग्यासाठी सोपं आणि प्रभावी उपाय आहे.

# हिवाळ्यात आरोग्यासाठी सर्वोत्तम आल्याची बर्फी

हिवाळा सुरू झाला की आरोग्याची विशेष काळजी घेणं गरजेचं असतं. या ऋतूत तापमानातील बदलांमुळे सर्दी-खोकला, घशात खवखव आणि पचनाच्या तक्रारी वाढतात. आयुर्वेदात आल्याला रामबाण औषध मानलं जातं. चहात टाकून तर आपण आल घेतोच, पण आल्याची बर्फी हा त्याचा स्वादिष्ट आणि आरोग्यदायी प्रकार आहे. आयुष मंत्रालयानुसार आल्याची बर्फी ही केवळ चविष्ट मिठाई नाही, तर एक आयुर्वेदिक औषधही आहे. ती शरीराला उष्णता देते, रोगप्रतिकारशक्ती वाढवते, भूक वाढवते आणि सर्दी-खोकल्यापासून संरक्षण करते.



**लागणारे साहित्य:**

ताजं आल, देसी गूळ, देसी तूप, सोंठ, जिरे, काळी मिरी, वेलची, दालचिनी, तेजपत्ता, पिपळी, धणे पावडर. इच्छेनुसार तीळही घालू शकता.

**बनवण्याची पद्धत:**

प्रथम गूळ मंद आचेवर वितळवून घट्ट पाक तयार करा. त्यात किसलेलं अदरक घालून ५ ते ७ मिनिटे परतून घ्या. नंतर तूप घालून ५ ते १० मिनिटे शिजवा. त्यानंतर सर्व मसाल्यांची बारीक पावडर टाकून मिश्रण सतत ढवळत ८ ते १० मिनिटे शिजवा. मिश्रण कढई सोडू लागल्यावर तुप लावलेल्या ताटात पसरवा. थंड झाल्यावर चौकोनी वड्या कापा. पूर्ण थंड झाल्यावर हवाबंद डब्यात ठेवा. ही बर्फी साधारण एक महिना टिकते.

**आल्याच्या बर्फीचे फायदे**

आल्याची बर्फी खाल्ल्याने पचन सुधारतं, भूक वाढते, घशातील खवखव कमी होते आणि सर्दी-खोकल्यात आराम मिळतो. तसेच शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते. हिवाळ्यात रोज १-२ छोटे तुकडे खाल्ल्यास थंडीपासून बचाव होतो आणि सांधेदुखीही कमी होते.

**काळजी घ्या**

आल्याची तासीर उष्ण असल्याने त्याचं अति सेवन टाळावं.

# झुरळांचा त्रास कमी करण्यासाठी...

घरात स्वयंपाकघर, सिंक किंवा कपाटांमध्ये झुरळं दिसतात. झुरळं दिसणे चांगले नसते. झुरळांमुळे खाद्यपदार्थ दूषित होतात आणि त्यामुळे आजार पसरतात.झुरळे घालवण्यासाठी घरात असलेल्या लिंबाचा वापर केल्यास दीर्घकाळ फायदा होऊ शकतो. झुरळांमध्ये सायट्रिक ऑसिडचे प्रमाण खूप जास्त असते. त्यामुळे झुरळे त्यापासून लांब राहतात.झुरळांचा प्रवेश हा ड्रेनेज पाईपमधून होतो. या पाईपमध्ये दर २-३ दिवसांनी लिंबांचा रस आणि कोमट पाणी रात्री झोपण्यापूर्वी टाकल्यास झुरळांचा त्रास कमी होण्यास मदत मिळते.



# दिवसभरातील ५ सवयी नकळत वाढवतात तुमचा स्ट्रेस! आरोग्याचे बिघडण्याऐवजी करा बदल...


आपल्याला अनेकदा असे वाटते की, स्ट्रेस हा फक्त एखाद्या मोठ्या घटनेनंतरच येतो, पण सत्य परिस्थिती अशी आहे की आपल्या डेली रुटीनमधील नेहमीच्या सवयी देखील हळूहळू आपली स्ट्रेस लेव्हल वाढवत राहतात आणि याची आपल्याला जाणीवही होत नाही. या सवयी वेळीच ओळखणे आणि त्या बदलणे खूप गरजेचे असते, कारण सतत टिकून राहणारा स्ट्रेस हा शरीर आणि मन या दोन्हीसाठी हानिकारक असतो.

याबद्दल, यशोदा हॉस्पिटल्सच्या कन्सल्टंट सायकॉलॉजिस्ट डॉ. प्रग्या रश्मी यांनी आपल्या दिवसभरातील काही अशा कॉमन सवयी सांगितल्या आहेत, ज्या अगदी नकळतपणे आपल्यावरील स्ट्रेस वाढवतात. आपण अशा ५ वाईट सवयींबद्दल जाणून घेणार आहोत, ज्या नकळतपणे तुमचा स्ट्रेस वाढवू शकतात.

१. सतत स्क्रीन पाहणे :-

सतत मोबाईल किंवा सोशल मिडिया बघत राहणे हे स्ट्रेस येण्याचे एक मोठे कारण आहे. वारंवार येणारे नोटिफिकेशन, ईमेल किंवा बातम्यांचे अपडेट्स पाहिल्यामुळे मेंदू कायम अलर्ट किंवा अ?क्टिव्ह राहतो आणि त्याला विश्रांती मिळत नाही. डॉ. प्रग्या रश्मी सांगतात की, यामुळे शरीरात कोर्टिसोल हार्मोन्सची पातळी मोठ्या प्रमाणावर वाढते, ज्यामुळे थकवा आणि चिडचिडेपणा येतो. जर तुम्ही दिवसातील ठरलेल्या वेळीच मोबाईल पाहिला आणि डिजिटल डिटॉक्स केले, तर तणावाचे प्रमाण खूप कमी करता येऊ शकते.

२. झोपेची कमतरता :-झोपेची कमतरता किंवा झोपेच्या वाईट सवयी देखील स्ट्रेस वाढवतात. रात्री उशिरापर्यंत जागे राहणे किंवा झोपेची योग्य वेळ निश्चित न करणे यामुळे शरीराचा सर्कॅडियन रिदम बिघडतो. परिणामी, मूड खराब होतो आणि चिंता वाढते. दररोज एकाच वेळी झोपण्याची आणि उठण्याची सवय लावल्यास मानसिक शांतता मिळण्यास मदत होते.३. गरजेपेक्षा जास्त काम करणे :-



प्रत्येक कामासाठी 'हो' म्हणणे ही देखील स्ट्रेस वाढवणारी एक सवय आहे. जास्त जबाबदाऱ्या घेतल्यामुळे स्वतःसाठी वेळ शिल्लक राहत नाही, ज्यामुळे मेंदू थकलेला आणि अस्वस्थ, बेचैन वाटू लागतो. त्यामुळे कामाच्या मर्यादा निश्चित करणे, विश्रांतीसाठी वेळ काढणे आणि 'नाही' म्हणायला शिकणे आवश्यक आहे.

४. शारीरिक हालचालींची कमतरता :-शारीरिक हालचालींची कमतरता असणे हे देखील स्ट्रेस वाढण्याचे एक मुख्य कारण आहे. डॉ. प्रग्या रश्मी यांनी सांगितले की, जेव्हा आपण कमी चालतो-फिरतो किंवा हालचाल कमी करतो तेव्हा शरीरात एंडोर्फिन कमी प्रमाणात तयार होतात, ज्यामुळे आपला मूड खराब होतो. रोज थोडे मॉर्निंग वॉक, योग किंवा व्यायाम केल्याने मन हलके राहते आणि स्ट्रेस कमी होतो.५. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी :-चुकीचा आहार देखील स्ट्रेस वाढवतो. खूप जास्त साखर, सतत चहा, कॉफी पिणे किंवा जेवण वगळणे अशा सवयी रक्तातील साखर असंतुलित करतात आणि मज्जासंस्थेला उत्तेजित करतात.

# ऑस्ट्रेलियाची अनोखी सोशल बंदी

**जगभराच्या सायबर विश्वाचे लक्ष सध्या ऑस्ट्रेलियाकडे लागलेले आहे. ऑस्ट्रेलियाने तिथल्या किशोरांवर जगात सर्वात जास्त कडक मानली गेलेली बंदी लादली आहे. यापुढे ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांखालील मुलांना स्नॅपचाट या लोकप्रिय सोशल प्लॅटफॉर्मसोबत इतर दहा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापरता येणार नाहीत. सरकारच्या या बंदीनंतर तिथे प्रचंड मोठे वादळ उठले असून अशा बंदीविरोधात अनेक मुले, काही मानवी हक्क संघटना, सुरक्षा विषयातील तज्ज्ञ आवाज उठवत आहेत, तर अनेक पालक या बंदीचे समर्थन करत असल्याचा सरकारचा दावा आहे.**

इंटरनेटवरील घातक मजकूर, फोफावत चाललेली अश्लीलता, सायबर बुलिंग, लहान मुलांचे इंटरनेटच्या माध्यमातून केले जाणारे विविध प्रकारचे शोषण या सगळ्यापासून त्यांना संरक्षण देण्यासाठी ही बंदी आवश्यक असल्याचे सरकारने नमूद केले आहे. या बंदीमुळे मुलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यात सुधारणा घडून येईल असा दावादेखील सरकारने केला आहे, तर दुसरीकडे ही बंदी मोडली गेल्यास मुले अथवा पालक यांना कोणत्याही प्रकारच्या शिक्षेची तरतूद नाही. मात्र मुलांकडून ही बंदी मोडली जाणार नाही याची जबाबदारी बंदी घातलेल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर टाकण्यात आलेली आहे.




ऑस्ट्रेलियाने घातलेल्या या बंदीचे काय परिणाम होतात, मुले त्याला कसा प्रतिसाद देतात याकडे जगभरातील सर्व मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांचे लक्ष लागलेले आहे. पुढेमागे इतर देशांतदेखील असे नियम घातले गेल्यास त्याचा व्यापारावर जो परिणाम होईल त्याची चिंता त्यांना लागून राहिलेली आहे. दुसरीकडे अनेक सायबर सुरक्षा तज्ज्ञ आणि काही मुलेदेखील या बंदीवर चिंता व्यक्त करत आहेत. कुठेतरी आपल्या अधिकाराची पायमल्ली होत आहे अशी भावना त्यांना वाटू लागली आहे.

बंदी तर घातली, पण ती यशस्वी होईल का? ही सगळ्यात मोठी चिंता आता सुरक्षा तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

या बंदीची घोषणा २०२४ च्या नोव्हेंबरमध्येच करण्यात आली होती. मात्र ती लागू करण्याची तारीख १० डिसेंबर २०२५ ठरवण्यात आली होती. सध्या या बंदीनंतर अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स आपल्या युजर्सना नोटिफिकेशन पाठवून वयाचा पुरावा सादर करण्यास सांगत आहेत. मात्र काही हुशार मुलांनी यावरदेखील उपाय शोधून काढला आहे. वयाचा पुरावा घेताना काही सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स फेस रेकग्नेशन अर्थात चेहरा स्कॅन करून त्या आधारे वयाचे मोजमाप करतात. मात्र १६ वर्षांखालील काही मुलांनी या स्कॅनरसमोर आपल्या आई किंवा वडिलांचा फोटो धरून सहजपणे त्याला फसवल्याची काही उदाहरणेदेखील समोर आली आहेत.

या बंदीवर मात कशी करावी, वयाचे खोटे पुरावे कसे सादर करावेत आणि आपले खाते पुढे कसे चालू ठेवावे यासंदर्भात अनेक सल्ले देणा-या पोस्ट इंटरनेटवर येत आहेत. त्यांचा वाचक वर्गदेखील मोठा आहे. अनेक पालक या बंदीचे समर्थन करत असले तरी अशा प्लॅटफॉर्म्सवर बंदी घातल्यास मुले दुसरे मार्ग निवडतील किंवा इतर ॲप्सकडे वळतील आणि ती ॲप्स पूर्ण सुरक्षित असतील अशी खात्री नसल्याची भीती अनेक पालकांना वाटत आहे. मुले जर इंटरनेट चाटरूमसारख्या पर्यायाकडे वळली तर तो सर्वात मोठा धोका असणार आहे. किशोरावस्थेतील मुलांचे सर्वात जास्त शोषण अशा चाटरूम्सच्या माध्यमातून होत असते हे अनेकदा सिद्ध झाले आहे.

सध्या तरी मुलांचे वय जाणून घेण्यासाठी कोणते अचूक तंत्रज्ञान वापरावे आणि लादलेले नियम पूर्णपणे अमलात आणण्यात अपयश आले तर होणा-या दंडाचे काय करावे अशी दुहेरी चिंता सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सला लागलेली आहे. यासाठी कागदपत्र आणि ओळखपत्रांची मागणी करणे हे अचूक निदान असणार आहे.

मात्र आपली संवेदनशील कागदपत्रे सादर करण्यास लोक तयार होतील का? हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. सध्या तरी दोन्ही बाजूंनी यावर सावध भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. पुढे काय होते ते बघणे सर्वच देशांसाठी महत्त्वाचे असणार आहे.

प्रसाद ताम्हणकर

---

**७० च्या दशकातील अमेरिकेतील सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचे चपखल चित्र दर्शवणारा ‘दी एक्सॉर्सिस्ट’ हा चित्रपट भयपटाच्या इतिहासातही तितकाच मोलाचा ठरला. विल्यम फ्रिडकिन दिग्दर्शित ‘दी एक्सॉर्सिस्ट’ हा न्यू हॉलीवूड काळातील असा सिनेमा आहे, ज्याने भयपटाची व्याख्या बदलून टाकली. १९७० च्या दशकात सामाजिक, राजकीय अस्थिरता होती आणि व्हिएतनाम युद्ध, वॉटरगेट स्कँडल, सांस्कृतिक बदल यामुळे अमेरिकन प्रेक्षकांमध्ये एक अस्वस्थता निर्माण झाली होती.**

# न्यू हॉलीवूड भय आणि श्रद्धा यांचा संगम



७० च्या दशकातील अमेरिकेतील सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचे चपखल चित्र दर्शवणारा ‘दी एक्सॉर्सिस्ट’ हा चित्रपट भयपटाच्या इतिहासातही तितकाच मोलाचा ठरला. विल्यम फ्रिडकिन दिग्दर्शित ‘दी एक्सॉर्सिस्ट’ हा न्यू हॉलीवूड काळातील असा सिनेमा आहे, ज्याने भयपटाची व्याख्या बदलून टाकली. १९७० च्या दशकात सामाजिक, राजकीय अस्थिरता होती आणि व्हिएतनाम युद्ध, वॉटरगेट स्कँडल, सांस्कृतिक बदल यामुळे अमेरिकन प्रेक्षकांमध्ये एक अस्वस्थता निर्माण झाली होती. त्या पार्श्वभूमीवर ‘दी एक्सॉर्सिस्ट’ने धर्म, विश्वास, विज्ञान आणि दुष्टशक्ती यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. हा सिनेमा ७० च्या दशकातील सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचे चपखल चित्र आहे.

चित्रपटाची कथा साधी वाटली तरी त्याचे परिणाम खोलवरील दिसतात आहेत. रेगन नावाची १२ वर्षांची मुलगी अचानक विचित्र वर्तन करू लागते, तिच्या आईकडून आधुनिक वैद्यकीय उपचारांचा प्रयत्न होतो, पण काहीच निष्पन्न होत नाही. शेवटी चर्चचा आधार घेतला जातो आणि दोन पाद्रींवर तिच्या अंगातील दुष्टशक्तीशी सामना करण्याची जबाबदारी येते. वरकरणी ही एक्झॉर्सिझमची पारंपरिक कहाणी असली तरी तिच्या मांडणीत फ्रिडकिनने जो वास्तववाद आणला, ते भयपटाच्या इतिहासात मोलाचे आहे.

फ्रिडकिन आणि लेखक विल्यम पीटर ब्लॅटी यांनी हा सिनेमा फक्त अंधश्रद्धा किंवा गॉथिक भयावर आधारलेला ठेवला नाही, तर त्यांनी धर्मशास्त्र, मानसशास्त्र आणि शरीरशास्त्र यांचा संगम घडवून प्रेक्षकांना अस्वस्थ केले. हॉलीवूडमध्ये भयपट सहसा दुय्यम प्रकार मानला जात असे, पण ‘दी एक्सॉर्सिस्ट’ने हा प्रकार मुख्य प्रवाहात आणला. एखाद्या भयपटाने बेस्ट पिक्चरसह दहा ऑस्कर नामांकने मिळवली, असे पहिल्यांदाच घडले.

फ्रिडकिनचा दृष्टिकोन पूर्णपणे डॉक्युमेंटरी शैलीकडे झुकलेला होता. वैद्यकीय तपासणीचे प्रसंग, त्यात रेगनच्या शरीरावर होणा-या चाचण्या, सुई टोचण्याचे क्लोज-अप यामुळे भय ‘परलौकिक’ वाटण्याऐवजी ‘ख-या’ जीवनात शिरते. त्याच वेळी रेगनच्या अंगातून येणारा वेगळा आवाज, पलंग हवेत तरंगणे, थंड हवेत धुराचे ढग ही सगळी दृश्ये सिनेमाच्या भयपट-परंपरेतील आयकॉनिक प्रतिमा बनली. मात्र ‘दी एक्सॉर्सिस्ट’ इतका प्रभावी ठरला यामागे केवळ तांत्रिक कौशल्य नाही, तर सांस्कृतिक प्रश्नही होते.

या सिनेमावर प्रेक्षकांची प्रतिक्रिया अत्यंत तीव्र होती. काही जण थिएटरमध्ये बेशुद्ध पडले, काहींना उलट्या झाल्या, अनेक चर्च व त्यासंबंधित संस्थांनी हा चित्रपट दाखवणं बंद करण्याची मागणी केली. पण याच विवादामुळे ‘दी एक्सॉर्सिस्ट’ अधिक लोकप्रिय ठरला. हा सिनेमा अमेरिकन संस्कृतीतील ‘दुष्टता’ या संकल्पनेवर नवा विचार करायला भाग पाडतो- दुष्टता बाहेरून येते की आपल्या आतच दडलेली असते? त्यामुळेच तर हा चित्रपट आजही प्रभावी ठरतो. कारण तो मानवी भयाचा, श्रद्धेच्या ढासळण्याचा आणि असहायतेचा शोध घेतो. या सा-यातून हा केवळ भूतबाधा दाखवणारा चित्रपट न राहता तो आधुनिक समाजाने आपला आत्मा गमावल्याची भीती दृश्य रूपात सूचकरीत्या दाखवतो.

अक्षय शेलार

न्यू हॉलीवूड चळवळ प्रामुख्याने वास्तववाद, सामाजिक राजकारण आणि पात्रांच्या गुंतागुंतीवर आधारित होती. ‘दी एक्सॉर्सिस्ट’ने भयपट या प्रकाराला त्यात सामील करून घेतले. एका अर्थाने हा सिनेमा न्यू हॉलीवूडचा धाडसी प्रयोग होता. कारण त्याने भयपटाला बौद्धिक चर्चेचा विषय बनवले. पुढच्या काळात ‘हॅलोवीन’ (१९७८), ‘द शायनिंग’ (१९८०) यांसारख्या चित्रपटांना सिनेमाच्या इतिहासात जे स्थान मिळाले, त्याची पायाभरणी ‘दी एक्सॉर्सिस्ट’ने केली. ‘दी एक्सॉर्सिस्ट’चा प्रभाव केवळ सिनेमापुरता मर्यादित राहिला नाही.

पुढच्या दशकात भयपटाचे स्वरूपच बदलले. या सिनेमामुळे पहिल्यांदा हॉरर सिनेमा गंभीर प्रेक्षक व समीक्षकांकडूनही मान्यता मिळवू शकतो, हे सिद्ध झाले. ‘हॅलोवीन’, ‘द शायनिंग’, ‘पोल्टरगाईस्ट’ (१९८२) यांसारख्या सिनेमांनी या पायवाटेवर चालत वेगळे प्रयोग केले.

याखेरीज या सिनेमाचा परिणाम सांस्कृतिक पातळीवर आणखी खोलवर गेला. ७० च्या दशकात अमेरिकन समाज जे प्रश्न विचारत होता, ते प्रश्न ‘दी एक्सॉर्सिस्ट’ने थेट पडद्यावर आणले. ते प्रश्न म्हणजे- धर्मावर विश्वास ठेवायचा की नाही? विज्ञानाने सर्वकाही समजावून सांगता येते का? दुष्टशक्ती खरोखर बाहेर आहे की ती आपल्या आतल्या भीतीतूनच जन्म घेते? म्हणूनच तो सिनेमा एका काळाचा आणि सिनेमाच्या इतिहासातील महत्त्वाच्या संक्रमणाचा दस्तऐवज ठरतो. न्यू हॉलीवूड चळवळीने समाजशास्त्रीय, राजकीय वास्तवाला स्पर्श करणारे सिनेमे दिले, तर ‘दी एक्सॉर्सिस्ट’ने या मालिकेत भय आणि श्रद्धा या शाश्वत विषयाला हात घालून स्वतचे वेगळे स्थान निर्माण केले.

---

**आजची जेन झी तरुणाई आचारविचारांच्या बाबतीत स्वतंत्र आहे खरी, पण स्वतच्या मानसिक आरोग्याबाबत जास्तीत जास्त जागरूक राहण्याची गरज आहे. स्वतला मानसिकदृष्ट्या सक्षम बनवणं हे या पिढीचे आव्हान आहे.**

# सुरवंटाचे फुलपाखरू होताना

नयनासाठी आजची सकाळही प्रसन्न नव्हती. तिचा मुलगा यश (दोघांची नावे बदलली आहेत) सकाळी साडेसहाला झोपला होता. रात्रभर तो तिच्या कुशीत रडतच होता. विशीत असलेल्या यशला हमसाहमशी रडताना पाहून नयनालाही गलबलून येत होतं. त्याची हतबलता पाहून तिचा जीवही जळत होता, पण तीही काही करू शकत नव्हती. कारण त्या प्रसंगावेळी ती तिथे उपस्थित नव्हती. झालं असं होतं, यश सुट्टीत त्याच्या आजोळी राहायला गेला होता. सुट्टी आणि आजी-आजोबांचं घर हे त्याचं नेहमीचं वेळापत्रक ठरलेलं होतं. त्यात नुकतंच मामाचं लग्न झालेलं होतं. नवीन मामी दिसायला आणि बोलायला खूपच छान होती. एकुलता एक मामा आणि मामाला एकुलता एक भाचा यश अशी मामा-भाच्याची जोडी आधीच घट्ट होती. त्यामुळे नव्या मामीशीही यशची जोडी जमायला फारसा वेळ लागला नाही. त्यामुळे यंदा यश आधीपेक्षाही आजीकडे जायला उत्सुक झाला होता. जशी कॉलेजची परीक्षा संपली तसा तो थेट आजीकडे उतरला. दुपारची वेळ होती. मामी ऑफिसला तब्येत बरी नसल्याने गेली नव्हती. घरी आराम करत होती. मामा ऑफिसला गेला होता. यश थेट मामीला भेटायला म्हणून तिच्या बेडरूममध्ये शिरला आणि जागच्या जागी खिळला. मामी गाढ झोपली होती. तिचं पांघरूण तिच्या अंगावरून बाजूला झालेलं होतं आणि नेमका गाऊन तिच्या ढोपरापर्यंत वर गेला होता. कोणीतरी आल्याची चाहूल लागताच ती दचकून जागी झाली, पण यश तिच्याकडे नेमका एकटक बघत होता. तिने पटकन स्वतचे कपडे सावरले आणि ती जोरात त्याच्यावर ओरडली. यश भानावर आला आणि अत्यंत शरमेने खाली मान घालून निघून गेला. मामीही त्याच्या मागोमाग बाहेर आली ती त्याच्यावर ओरडतच. आजी-आजोबाही सुनेचा ओरडण्याचा आवाज ऐकून घाबरले. यश तेव्हाही मान खाली घालून उभा होता. मामीच्या बोलण्यावरून त्या दोघांनाही काय घडलं होतं हे समजलं. आजी मामीला समजावत तिला घेऊन आत निघून गेली. आजोबा बाहेर त्याच्याजवळ थांबले. यशला आतमधून मामीच्या रडण्याचा, आजीच्या समजावण्याचा आवाज येत होता. तोही पुरता घामाने भिजून गेला होता. त्याला मान करून आजोबांकडे पाहण्याचीसुद्धा लाज वाटत होती. काही वेळाने आजीने यशला आतून हाक मारली. तो घाबरला, पण आत गेला. आजीने त्याला सणसणीत थप्पड दिली. ‘असा कसा रे वागलास तू?’ आजीने रागारागाने विचारलं. यशच्या डोळ्यांतून पश्चातापाचे अश्रू वाहत होते. ‘आजी, मामीष्ठमी मुद्दाम नाही केलं. मीष्ठमीष्ठ मला काय करू हे सुचलंष्ठनाहीष्ठमला मामीबद्दल रिस्पेक्ट आहे.’ हुंदके देत देत तो बोलला खरा पण आजीने त्याला पुन्हा सुनावलं. ‘अरे कोणी बाई माणूस एकटी खोलीत असेल तर दरवाजा वाजवून आत जायचं आणि हे काही वाटेल तसं वागायला तुझं घर नाही हेही साधं कळत नाही का तुला? इतका कसा निर्लज्ज वागलास तू?’ ‘काही कळत नाही की कळवून घ्यायचं नाही?’



नयना एव्हाना घरी आलेली होती आणि यशची वाट पाहत होती. यश एक तासाने घरी आला. आईला दारात पाहून त्याला पुन्हा भरून आलं. तिच्या कुशीत शिरून त्याने स्वतला मोकळं केलं. ‘आई, मी शपथ घेऊन सांगतो. मामीबद्दल माझ्या मनात काहीही नव्हतं. मला तिला तसं पाहून काहीही सुचलं नाही. मी फ्रीझ झालो.’ हुंदके देत तो स्वतची बाजू मांडत होता. नयना त्याला समजावत होती खरी पण तीही या अनपेक्षित प्रकाराने हादरली होती आणि तिच्या माहेरच्या लोकांनी तिच्या मुलाबाबत केलेल्या टीकेमुळे प्रचंड दुखावली होती.

ती रात्र यशला समजावण्यात गेली, पण तो प्रचंड तणावात होता. त्या वेळीच तिने त्याच्यासाठी समुपदेशन घेण्याचं नक्की केलं आणि ती यशला घेऊन क्लिनिकला आली. यश त्या वेळीही शांत, मलूल बसून होता. एक प्रकारचा अपराधगंड त्याच्या चेह?यावर आलेला होता. ‘यश, तुला माहीत आहे ना की तू चुकीचा नव्हतास. मग इतका त्रास कशाला करून घेतो आहेस?’ असं विचारताच तो पटकन म्हणाला, ‘पण माझ्या आजीच्या नजरेतून मी उतरलोय ना?’ आणि त्याच्या डोळ्यांतून पाणी आलं.

यश भरपूर संवेदनशील आणि भिडस्त असा मुलगा होता. त्याला दुनियेचे छक्केपंजेही माहीत नव्हते. अभ्यास, घर आणि आजोळ हेच त्याचं विश्व होतं. त्याचा स्वभाव त्याच्या घरी आणि आजोळी सगळ्यांना माहीत होता. तसंच तो एकुलता एक मुलगा, नातू असल्याने सगळ्यांचा लाडकाही होता. सगळे जण त्याला जपायचे, पण त्याला अशा जपण्यामुळे ‘स्वतला इतरांकडून गोंजारून घेण्याची सवय’ लागत चालली होती. नयनाचे यजमान हे कामानिमित्त बाहेरगावी असायचे. ती एकटीच यशला सांभाळत होती. त्यामुळे आपसूकच तिच्या माहेरच्या लोकांनीही यशला पहिल्यापासून सांभाळलं होतं. या सगळ्यामध्ये त्याची सारासार विवेकबुद्धी विकसितच होत नव्हती.

‘खरंय तुमचं निदान’ नयना म्हणाली.

दिव्या सौदागर

---

# समाजभान- सुजाण पालकत्व



मुले आणि आपलं कुटुंब आनंदी व तितकंच सक्षम राहण्यासाठी पालक म्हणून आपण सुजाण असणे ही सध्याची गरज. आजच्या परिस्थितीत पालकत्व हे कोणत्याही आव्हानापेक्षा कमी नाही. म्हणूनच मुलांच्या वर्तमान आणि भविष्यासाठी आपण सजग असायला हवे.

आपल्या आदर्श नीतिमूल्यांची जपणूक आपण करायला हवी. आम्हाला वडीलधा?यांनी जे काही चांगले शिकविले, ज्या-ज्या गोष्टी आमच्याकडून आयुष्य घडवण्यासाठी करून घेतल्या त्या-त्या आम्ही आमच्या मुलांकडून करून घेणे अपेक्षित आहे. यातून मुले धीट बनतील, त्यांना शिस्तीचे महत्त्व कळेल. हे सगळे आपल्या मुलांसाठी, त्यांच्या सुरक्षित भल्यासाठी आणि सशक्त समाजासाठी आवश्यकच आहे. आदर्श पालक होण्यापेक्षा आनंदी पालक होण्यासाठी प्रयत्न करा. जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असावा यासाठी मुलांना ‘काउंसिलिंग क्लासेस’ सुरू करण्याची आज गरज आहे. पूर्वजांनी म्हटलेच आहे, ‘टीचर इज अ सेकंड मदर.’ शिक्षिका ही विद्यार्थ्यांची दुसरी आई असते. त्यामुळे बालमनाला आकार अशा प्रकारे देता येणे शक्य आहे.

घरातील मुलांमध्ये किंवा नातेवाईकांच्या मुलांमध्ये तुलना अजिबात करू नका. तुलनेमुळे मुलांमध्ये न्यूनगंड निर्माण होऊन ते मानसिकदृष्ट्या खचण्याचा संभव असतो. त्यामुळे त्यांची दुस?या कोणाशीही तुलना करू नका.

मुलांच्या यशात वाटेकरी होणारे पालक कधी-कधी मुलांच्या अपयशाला सर्वस्वी त्यांनाच जबाबदार ठरवतात. यामुळे मुलांमध्ये अपराधीपणाची भावना वाढीस लागते.

मुलांच्या जवळ बसून परीक्षेचा रिझल्ट काहीही लागला तरी तो आपण सर्व जण मिळून स्वीकारू असा विश्वास मुलांना देणे गरजेचे आहे. भारतासारख्या खंडप्राय आणि प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात कोणत्याही क्षेत्रात स्पर्धा असणे साहजिकच आहे. त्यामुळे कोणतेही क्षेत्र निवडताना त्यात शंभर टक्के देऊ शकतो का? याचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

परीक्षेनंतर रिझल्टचं टेन्शन मुलांपेक्षा पालकांना आलेलं असतं. यातूनच दिवसा-रात्री कधीही किती मार्क्स मिळतील रे, अशी विचारणा करून मुलांना भंडावून सोडू नका. यापेक्षा त्याला रस असलेली क्षेत्रं जाणून घ्या. पालक-मुलं यांच्यातला संवाद चांगला असेल तर काही अडचणींवर सहज मात करता येते. पालकांनीही आपल्या मुलाचं भवितव्य लक्षात घ्यावं.

लोक काय म्हणतील ही तुम्हाला वाटणारी भीती मुलांवर लादू नये. मुलांच्या हिताचा जो निर्णय घ्याल त्यात त्यांना सहभागी करा. चर्चेनंतरच निर्णय फायनल करा. तुमच्या मुलांना तुम्ही नकारात्मक प्रतिाढिया देण्यापेक्षा जास्त वेळा त्यांची स्तुती करण्याची सवय लावण्याचा प्रयत्न करा. तुमची मुले काही चुकीचे करत असताना त्यांना सांगणे महत्त्वाचे असले तरी त्यांना सकारात्मक भावना निर्माण करण्यात मदत करणेदेखील महत्त्वाचे आहे.